ऑनलाइन आवृत्ती

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
८ ऑगस्ट २०२०
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ६०)

१ ऑगस्ट २०२० : १०० वा जन्मदिन

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक



VISIT…

१ ऑगस्टला प्रकाशित झाला

'साधना साप्ताहिका'चा

लोकमान्य टिळक

विशेषांक



ध्येयवादी पत्रकारितेला मोठी प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे,
भारतीय असंतोषाचे जनक मानले गेलेले
आणि ज्यांच्या नावाने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील
एक पर्व ओळखले जाते, त्या लोकमान्य टिळक
यांचे स्मृति शताब्दी वर्ष १ ऑगस्ट २०२० रोजी संपत आहे,
त्या निमित्ताने काढलेला विशेषांक.

संपर्क

साधना साप्ताहिक

४३१, शनिवार पेठ, पुणे 411030

Ph 02024451724

weeklysadhana@gmail.com

अनुक्रम

टिळकांना समजून घ्यायचे ते यामुळे..!
संपादकीय

कै. न्या. महादेव गोविंद रानडे
बाळ गंगाधर टिळक

महापुरुषांचे जीवाश्म होऊ नये म्हणून...
सदानंद मोरे
(संवादक : सचिन परब)

जुन्या-नव्या पर्वांचा दुवा
कुमार केतकर

काळकोठडी मंडाले
अरविंद व्यं. गोखले

टिळकांचे गणित प्रेम
शैलेश माळोदे

टिळक हरवल्याचा शोध
सदानंद मोरे

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
८ ऑगस्ट २०२०
वर्ष ७२ / अंक – ५१
संपादक :
विनोद शिरसाठ
सहयोगी संपादक मंडळ :
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
Ph.: 020-24451724 /
Mob.: 7028257757
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)
Ph. : 020-24459635
वार्षिक वर्गणी :
एक वर्षांसाठी : ८०० रुपये
दोन वर्षांसाठी : १६०० रुपये
तीन वर्षांसाठी : २४०० रुपये

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634,** **IFSC MAHB 0000001**, **बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

अनुक्रम

४ **अण्णा भाऊंचे स्मरण का करायचे?**
संपादकीय

७ **माझा रशियाचा प्रवास : मुंबई ते मॉस्को**
अण्णा भाऊ साठे

१२ **नवे संशोधक-समीक्षक अण्णा भाऊंना न्याय देतील...**
अर्जुन डांगळे (संवादक : महेंद्र भवरे)

१८ **कॉम्रेड अण्णा भाऊ साठे**
उत्तम कांबळे

काळाच्या पुढचे पाहणारा लेखक
३० राजन गवस

शंकर भाऊच्या आठवणीतील अण्णा भाऊ
३६ मनोहर जाधव

प्रगतिशील लेखक-नाट्य चळवळ आणि अण्णा भाऊ साठे
४२ लक्ष्मीकांत देशमुख

वारणेचा वाघ : कादंबरी आणि तिच्यावरील सिनेमा
५० राजा शिरगुप्पे

अण्णा भाऊंचा पुतळा रशियात उभारला जातोय त्याची गोष्ट
५५ संजय देशपांडे

स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधना । करिती साधना त्यांना ठेवी उत्स्फूर्त साधना ।।

संपादकीय

अण्णा भाऊंचे स्मरण का करायचे?

अण्णा भाऊ साठे (१ ऑगस्ट १९२० – १८ जुलै १९६९) यांना फक्त ४९ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यातील अखेरची तीन दशके त्यांच्या साहित्यिक व सामाजिक कार्याची होती. सांगली जिल्ह्यातील एका लहान खेड्यात व गावकुसाबाहेर ठेवलेल्या समाजात त्यांचा जन्म झाला. त्यांना शालेय शिक्षण मिळाले ते जेमतेम अक्षरओळख होईल इतपतच. वयाच्या अकराव्या वर्षी ते कुटुंबीयांसोबत मुंबईत गेले, चार-पाच वर्षांनी कुटुंबासह गावात परत आले आणि पुन्हा चार-पाच वर्षांनी ते मुंबईत गेले. त्यानंतरची जवळपास तीन दशके मुंबईतच राहिले, पण त्या काळात त्यांचे आपल्या गावाला जाणे-येणे चालूच राहिले. त्यांचे बालपण, कुमारवय आणि तारुण्य या तिन्ही अवस्था बऱ्याच धकाधकीच्या व वेगवान म्हणाव्यात अशा होत्या. अकाली प्रौढत्व येणे हा शब्दप्रयोग त्यांच्याबाबत थिटा म्हणावा लागेल. आपल्या सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे नको तितके भान, नको तितक्या लवकर त्यांना आले आणि राजकीय समज-उमजही फारच लवकर आली. म्हणजे त्यांच्या कारकिर्दीची अखेरची तीन दशके समजून घ्यायची असतील, तर त्यांच्या जडण घडणीची आधीची दोन दशके उकलून बघावी लागतील.

वयाच्या वीस-बावीसपर्यंतच्या कालखंडात म्हणजे बाल आणि तरुणवयात त्यांनी ग्रामीण भाग आणि तेथील उपेक्षित व वंचित समाजघटक पाहिले. मधली कुमारवयातील वर्षे मुंबईत राहिल्यामुळे तिथल्या तळाच्या समाजघटकांचे जीवन पाहिले; खरे तर पाहिले व अनुभवले असे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. त्या दोन्ही ठिकाणी ते त्या समाजजीवनाचा भाग होते. त्यामुळे त्या समाजाचे सर्व बरे-वाईट हलाहल त्यांनी पचवले. तिथे केवळ दुःख व दैन्य नव्हते, लहान-मोठ्या विद्रोहाच्या ठिणग्याही होत्या. मुद्दा होता- त्यातून भडका उडण्याचा, वणवा लागण्याचा. पण तटबंदी इतकी भक्कम होती की, क्रांतीची मशाल अशी इतक्या सहज पेटणार नव्हती. मात्र अण्णा भाऊ ते स्वप्न पाहात होते. कारण तारुण्यात असतानाच ते कम्युनिस्ट पक्षाच्या संपर्कात आले होते.

अण्णा भाऊंनी कोणते व किती साहित्य लिहिले? तब्बल ३२ कादंबऱ्या आणि २० कथासंग्रह (म्हणजे शे-सव्वाशे कथा) ही माहिती छाती दडपून टाकणारी आहे. त्यात दोनेक डझन पोवाडे, तितकेच लोकनाट्य/तमाशे, त्याहून अधिक लावण्या आणि अन्य किरकोळ लेखन यांचा विचार केला तर कोणीही थक्क व्हावे. शिवाय या सर्वांमधून कोणीही न हाताळलेले विषय आणि कोणाचेही लक्ष गेलेले नाही असे कानाकोपऱ्यातील समाजघटक, त्यांनी शब्दबद्ध केले. त्या सर्वांचा आशय कमालीचा प्रागतिक व क्रांतिकारी आहे. संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि कम्युनिस्ट चळवळ यासाठी शाहिरी व कलापथके यांच्याद्वारे त्यांनी निर्माण केलेला झंझावात वेगळाच. आणि हे सर्व कोणत्या आर्थिक परिस्थितीत व ओढग्रस्त कौटुंबिक-सामाजिक जीवनात हे लक्षात घेतले तर, बुद्धिमत्ता आणि कर्तृत्व यांच्या प्रचलित व्याख्या खुज्या वाटायला लागतात.

अशा या अण्णा भाऊंच्या जन्मशताब्दी वर्षाची अखेर होत असताना साधनाचा हा विशेषांक येत आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व व कार्य यांना इतके आयाम आहेत की, त्या सर्वांवर प्रकाशझोत टाकणे एका अंकातून शक्य नाही. म्हणून त्यांच्या साहित्याविषयी कुतूहल निर्माण व्हावे, त्या साहित्याच्या दालनात प्रवेश करण्याची इच्छा नव्या वाचकांस

व्हावी आणि ज्यांना ते दालन किती मोठे आहे याची कल्पना नाही त्यांना ती यावी, इतकाच माफक उद्देश हा अंक काढताना होता. त्यानुसार आठ लेख या अंकात घेतले आहेत.

अण्णा भाऊंच्या लेखनाची खुमारी कळावी यासाठी त्यांची एक कथा किंवा त्यांच्या कादंबरीतील एखादा तुकडा या अंकात घ्यावा असा विचार होता. मात्र त्यांच्या एकमेव प्रवासवर्णनातील पहिला भाग घेतला आहे, याचे कारण ते त्यांचे विशेष महत्त्वाचे पण तुलनेने दुर्लक्षित पुस्तक आहे. १९६१ मध्ये त्यांनी रशियाचा दौरा केला होता, तिथल्या ४० दिवसांच्या वास्तव्याचा आलेख सांगणारे 'माझा रशियाचा प्रवास' हे जेमतेम ६० पानांचे पुस्तक, एकाच बैठकीत वाचून होईल इतके वाचनीय आहे. त्यातून त्यांना रशिया कसा दिसला हे तर रोचक शैलीत आले आहेच, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यातून त्यांच्या कलंदर व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. भाषा, शैली आणि विचारांची बैठक या दृष्टीने तर ते वाचायला हवेच, पण त्यातील मार्मिक निरीक्षणे त्यांच्या तल्लख बुद्धिमत्तेची ओळख करून देतात.

अण्णा भाऊंची वैचारिक जडणघडण कशी झाली किंवा त्यांचा राजकीय विचार कसा आकाराला येत गेला, यावर काही कवडसे टाकणे आवश्यक होते. या अंकातील अर्जुन डांगळे यांची मुलाखत त्यासंदर्भात विशेष उपयुक्त ठरणारी आहे. त्याचप्रमाणे अण्णा भाऊ यांचा सामाजिक परिसर आणि त्यांच्या साहित्याचे पर्यावरण नीट समजून घ्यायचे असेल तर उत्तम कांबळे यांचा लेख खूपच महत्त्वाचा आहे.

'अण्णा भाऊंच्या साहित्याची उपेक्षा झाली' अशी खंत अनेक जाणकार लहान-थोर व्यक्तींकडून ऐकायला मिळत असते. ती खंत कितपत बरोबर आहे आणि असेल तर त्याचे कारण काय, या दोन्ही प्रश्नांच्या उत्तराची दिशा राजन गवस यांच्या लेखात आहे. काळाच्या पुढचे पाहणारा लेखक, या शीर्षकातून त्यांनी तेच ध्वनित केले आहे. लक्ष्मीकांत देशमुख यांचा लेख तोच धागा पुढे घेऊन जातो आणि प्रेमचंद ही प्रेरणा असलेल्या प्रगतिशील लेखक संघात त्या वेळी मराठी साहित्यातील अण्णा भाऊ हेच एकमेव का होते, याचे वेगळे कारण शोधायची गरज त्यामुळे भासत नाही.

इतके पैलू असणाऱ्या व इतकी अलौकिक घडण असलेल्या अण्णा भाऊ यांचे व्यक्तिगत व कौटुंबिक जीवन कसे होते, याबद्दल भल्याभल्यांना कुतूहल वाटणे साहजिक आहे. अशा व्यक्तींच्या कुटुंबातील एखाद्याने लिहिलेले पुस्तक गूढतेचे वलय कमी करते, ती व्यक्ती तुमच्या-आमच्यासारखीच सामान्य होती, हे त्यातून पुढे येते. ते वाचून काही बाबतीत अपेक्षाभंग होतो, क्वचित निराशाही येते. मात्र महान कार्य घडवून आणलेल्या व्यक्ती अखेर हाडामासाची माणसेच होती, हा संदेश जाणे केव्हाही चांगले. यासंदर्भात अण्णा भाऊंचे धाकटे बंधू शंकर भाऊ साठे यांनी लिहिलेल्या पुस्तकाची संयत व नेमकी ओळख मनोहर जाधव यांच्या लेखातून झाली आहे.

अण्णा भाऊ यांच्या सात कादंबऱ्यांवर मराठी चित्रपट आले आहेत. 'फकिरा' हा चित्रपट वगळता उर्वरित सर्व त्यांच्या मृत्यूनंतर आलेत. ते चित्रपट फार चालले नाहीत, त्याला अनेक कारणे आहेत. पण त्या कादंबऱ्यांवर चित्रपट करताना त्यांचे पटकथा व संवाद लिहिण्याचे काम मराठीतील नामवंत लेखकांकडे (उदा. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील) सोपवले होते आणि 'फकिरा'साठी ख्वाजा अहमद अब्बास सहभागी झाले होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर त्यांच्या साहित्याची ताकद किती होती, याबाबत शंका राहात नाही. कारण ताकदीचे कथानक असणे ही त्या काळातील (चालणाऱ्या) चित्रपटांची प्रमुख गरज होती. आणि म्हणून विस्मरणात गेलेले ते चित्रपट व त्या कादंबऱ्या यांच्यावर प्रस्तुत अंकात एक विशेष विभाग करण्याचा विचार केला होता. मात्र त्या चित्रपटांची उपलब्धी (आणि तेही या कोरोना संकटाच्या लॉकडाऊन काळात) अवघड होती. म्हणून 'वारणेचा वाघ' ही कादंबरी आणि त्याच नावाचा चित्रपट यांच्यावरील लेख राजा शिरगुप्पे यांना लिहायची विनंती केली होती. हा लेख वाचून एवढी तरी जाणीव होते की, आपले किती तरी सांस्कृतिक संचित नीट न जपल्यामुळे अक्षरशः वाया गेले आहे.

या अंकातील समारोपाचा छोटा पण महत्त्वाचा लेख अगदी शेवटच्या क्षणी अनपेक्षितपणे जुळून आला आहे. अण्णा भाऊ रशियात गेल्यावर मॉस्कोमध्ये ज्या हॉटेलात राहिले होते, तिथे राहण्याचा योग आल्यावर आणि त्या हॉटेलमध्ये वास्तव्य करून गेलेल्या जगप्रसिद्ध व्यक्तींची तैलचित्रे पाहिल्यावर संजय देशपांडे यांना तिथे अण्णा भाऊंचे

तैलचित्र लावण्याचे सुचणे, ती कल्पना प्रत्यक्षात येणे आणि नंतर अण्णा भाऊंचा पुतळा तिथल्या प्रतिष्ठित ग्रंथालयात बसविला जाण्याचा निर्णय होणे इथपर्यंतचा प्रवास त्यांनी या लेखात भरभर सांगितला आहे. मात्र सव्वा वर्षातील ती प्रक्रिया आणखी रोचक असणार.

असा हा अंक वाचून एवढे तरी निश्चित होईल की, आपण अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे दालन पाहिलेच नाही, असे अनेक चांगल्या वाचकांना वाटेल. बऱ्याच दिवसांपासून मनात आहे, पण या ना त्या कारणाने वाचायचे राहून जाते आहे ते वाचकही लवकर वळतील. पण हे इतके पुरेसे नाही. हे खरे आहे की, साहित्याचे असो वा सामाजिक बदलांचे प्रवाह हळूहळू वाहत राहतात आणि मग व्यापक बनतात. पण हळूहळू म्हणजे तरी किती? आपल्याकडे ती गती लाजीरवाणी म्हणावी इतकी कमी आहे. जे सामाजिक स्थित्यंतर एका पिढीत व्हायला हवे, त्यासाठी चार-चार पिढ्या जाव्या लागतात.

वस्तुतः अण्णा भाऊंना जाऊन ५१ वर्षे झाली आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर काही वर्षे त्यांच्या साहित्याची उपेक्षा झाली, मात्र १९९० नंतरच्या पाव शतकात परिस्थिती झपाट्याने बदलत गेली. महात्मा फुले यांची स्मृतिशताब्दी आणि डॉ.आंबेडकरांची जन्मशताब्दी हा टर्निंग पॉइंट ठरला. त्यानंतर तळागाळातल्या समूहांचे नायक पुढे आले. अर्थातच ग्रामीण भागातून व बहुजन समाजातून शिक्षण घेऊन पुढे आलेल्या पिढ्यांनी शिक्षण, प्रशासन, साहित्य व राजकारण ही क्षेत्रे पादाक्रांत सुरुवात केली होती, त्याचा हा परिणाम होता. त्यामुळे इतर अनेकांप्रमानेच अण्णा भाऊ यांचे साहित्यही पुन्हा चर्चेत येऊ लागले. इतके की त्यांच्या नावाने स्वतंत्र साहित्य संमेलन भरू लागले. आज स्थिती अशी आहे की, उपेक्षित व शोषित यांच्यासाठी प्रबोधन व संघर्ष करणारे कोणतेही प्रमुख गट-तट अण्णा भाऊंच्या साहित्याला जाहीरपणे नाकारत नाहीत. ही किमया व्यक्तीची नाही, तिच्या विचारांची व कार्याची आहे.

मात्र इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, अजूनही साहित्याच्या मध्यवर्ती प्रवाहातील वाचक, लेखक, समीक्षक व साहित्य संस्था आणि प्रसारमाध्यमे हे सर्वजण अण्णा भाऊंच्या साहित्यापासून कोसो दूर आहेत. त्यातील काही विशिष्ट प्रकारच्या आकसातून वा श्रेष्ठत्वाच्या कल्पनेतून वा तुच्छतावादाच्या भावनेतून बाहेर आलेले नाहीत, हे खरे आहे. पण त्याच प्रवाहातील बहुसंख्य लोक आकलनाच्या अभावातून अण्णा भाऊ व या प्रकारच्या साहित्याकडे वळलेले नाहीत. या बहुसंख्य लोकांपर्यंत हे साहित्य जावे यासाठी अधिक प्रयत्न व्हायला हवेत, आताचा काळ त्यासाठी अधिक अनुकूल आहे. तसे झाले तर अण्णा भाऊ किती मोठे होतील हा भाग बाजूला ठेवला तरी साहित्याचा प्रवाह रुंदावत जाईल. (अर्थात साहित्याचे केंद्र सरकत चालले आहे व साहित्याचा मध्यवर्ती प्रवाह बाजूला ढकलला जातो आहे.)

अर्जुन डांगळे यांनी मुलाखतीत असे म्हटले आहे की, नव्या पिढीतील संशोधक व समीक्षक अण्णा भाऊंना न्याय देतील. इथे काहींच्या मनात असा प्रश्न येईल की, म्हणजे काय करायचे? अण्णा भाऊंच्या साहित्याला मध्यवर्ती व प्रतिष्ठेचे स्थान मिळणे हा त्याचा एक अर्थ आहे. पण त्याचा खरा अर्थ, त्यांनी जे विषय व जे समाजघटक चित्रित केलेत त्यांची दखल घेणे, त्यांच्यावरील अन्याय्यासाठी लढत राहणे असा आहे. पूर्वीच्या तुलनेत परिस्थिती खूप बदलली आहे, मात्र या देशातील शेकडो समाजघटक आणि कोट्यवधी लोक अद्यापही शोषित व उपेक्षित आहेत. त्यांचे जीवन अद्याप दृष्टीआडच आहे, त्या जीवनाचे चित्रण होणे बाकी आहे. मात्र असे घटक व अशी माणसे फक्त दुर्गम भागात व डोंगर-दऱ्यांत आहेत, असे मानणे म्हणजे वास्तवापासून दूर जाणे. तो शोध घेण्यासाठी दूरवर जाण्याची आवश्यकता नाही. आपल्या सभोवताली डोळे उघडे ठेवले तरी ती पाहायला मिळतात, भले आपण शहरात राहत असू वा खेड्यात. आणि ही माणसे व समाजघटक फक्त या देशात नाहीत, जगातल्या प्रत्येक देशात ती कमी-अधिक संख्येने व भिन्न प्रकारांमध्ये आहेत, त्यांच्यात नित्य भर पडतेच आहे, पडत राहणारच आहे.

✠

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

माझा रशियाचा प्रवास : मुंबई ते मॉस्को

अण्णा भाऊ साठे

आपण वाटेल ते करून एक वेळ सोव्हिएत संघराज्य पाहावं, असं मला फार-फार वाटत होतं. ती आशा माझ्या मनात दिवसेंदिवस सारखी प्रबळ होत होती. रशियातील ते कामगार-राज्य कसे असेल, तिथं कॉम्रेड लेनिननं केलेली क्रांती व मार्क्सचे महान तत्त्वज्ञान कसे साकार झाले असेल... ती नवी दुनिया, नवी संस्कृती, नवी सभ्यता कशी फुलत असेल- या विचारानं माझं मन भारावलं होतं. मी वेडाच झालो होतो.

मी सन १९३४ च्या दरम्यान अनेक जप्त पुस्तके वाचली होती. रशियन क्रांतीचा इतिहास, कॉम्रेड लेनिनचे चरित्र या पुस्तकांनी माझ्या मनावर खूप परिणाम केला होता आणि म्हणूनच मी रशिया पाहण्यासाठी उत्सुक होतो. कसंही करून एकदा रशियाकडं सरकावं, असा माझा विचार झाला होता. मी खटपट करीत होतो. मी दोन वेळा पासपोर्ट मिळावा म्हणून अर्ज करून पाहिला. पण त्या वेळचे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री भलतेच कडक होते! त्यांनी मला विश्वासात घेऊन सुनावले, ''बाबा, तू आमचा वैरी आहेस. खरोखरी सांगतो की, आम्ही चांगली माणसं म्हणून तू बाहेर आहेस, नाही तर या वेळी तुझी जागा तुरुंगात...'' तो काळ १९४८ चा होता. त्या वेळी माझे मित्र सिनेनट श्री.बलराज सहानी यांनी माझी पॅरिसपर्यंतची तिकिटेही काढली होती; कारण पॅरिस येथे भरणाऱ्या जागतिक शांतता परिषदेचे मला

मी 'सोव्हिएत स्काय' या आलिशान
हॉटेलात पोचलो. तेव्हा तिथं मला
कॉ.बारनिकोव भेटले. त्यांनी एकदम पुढं येऊन
माझा हात धरला नि शुद्ध हिंदी भाषेत बोलायला
आरंभ केला, ''-मी बारनिकोव.
मी लेनिनग्राडचा आहे. तुम्ही येणार म्हणून
मला मुद्दाम तुमच्यासाठी बोलावलं आहे.
आता एक महिना मी आपल्याबरोबर असणार-
म्हणजे आपल्या दुभाष्याचे काम करणार!''
कॉ. बारनिकोवचे ते शुद्ध हिंदी, मोकळा नि गोड
स्वभाव पाहून मला आनंद झाला. नंतर मी
आपल्या खोलीत गेलो आणि पुन्हा
कॉ. बारनिकोव यांनी येऊन विचारले,
''उद्या काय काय पाहणार आहात?''
''प्रथम रशियातली माणसं!'' मी उत्तर दिले
आणि कॉ.बारनिकोव गालात हसले.

निमंत्रण आले होते, पण जमले नाही.

पुढे १९६१ मध्ये माझ्या 'फकिरा' या कादंबरीला राज्य सरकारचे पहिले पारितोषिक मिळाले आणि याच वेळी इंडो-सोव्हिएत कल्चर सोसायटीनं मी रशियास जावं, असं ठरवलं. त्या संस्थेचे मला पत्र मिळताच मी पुन्हा प्रयत्न करू लागलो; पण जवळ एक पैसाही नव्हता.

जेव्हा मी रशियाला जात आहे, ही गोष्ट महाराष्ट्राला समजली, तेव्हा एक चमत्कार घडला. माझ्यावर पैशांचा पाऊस पडला. एकाच दमात माझा अर्धा खर्च निवारला! त्यामुळे पुढं अनेक भानगडीतनं जाऊन मला रशियाला जाण्याचा पासपोर्ट मिळाला. माझी तयारी झाली. मला गगन ठेंगणं वाटू लागलं. न पाहिलेला रशिया माझ्या डोळ्यांपुढं तरळू लागला.

शाहीर द.ना. गव्हाणकर यांनी मला कित्येक तास बसून रशियात कुठं काय आहे, कसं वागायचं, कसं बोलायचं, याचे धडे दिले. कारण मुंबई ते सातारा हा प्रवासही मी कधी एकटा करीत नाही- तो मी मॉस्कोला जाणार! हा प्रसंग माझ्या दृष्टीनं मोठा कठीण होता. देश, आप्त, घर सोडून मी एकट्यानं इतकं दूर जायचं म्हणजे माझ्याबाबतीत फारच अवघड होतं.

दुसऱ्या महायुद्धात सोव्हिएत जनतेने पराक्रमाची शर्थ केली होती. त्यामुळे मी उत्स्फूर्त होऊन स्टालिनग्राडच्या लढाईवर एक पोवाडा लिहिला होता. माझी प्रतिभा लाल सैन्याबरोबर बर्लिनपर्यंत गेली होती आणि आता मी स्वतः मॉस्कोपर्यंत जाणार होतो.

इंडो-सोव्हिएत कल्चरल सोसायटीच्या शिष्टमंडळात माझा समावेश झाला होता, पण मुंबईहून दिल्लीपर्यंत एकटा जाऊन मग मला इतर सभासद भेटणार होते. त्यांपैकी एकालाही मी ओळखत नव्हतो.

घरापासून विमानतळापर्यंत माझ्या अनेक मित्रांनी-आप्तांनी मला फुलांत बुजवलं. आशीर्वाद दिले. विमानतळावर अनेक दोस्त आले होते. त्यांना आनंद झाला होता. मी मात्र मनात खचलो होतो. मॉस्कोचा प्रवास नि तोही विमानानं- या कल्पनेनं मला धडकी भरली होती. माझे मित्र मला एक-एक सूचना करीत होते. एक म्हणाला, ''तुम्ही रशियात झोपड्या किती आहेत, तेवढ्या पाहून या बरं का!''

एकानं सांगितलं, ''पुलाखाली किती लोक राहतात, याची काळजीपूर्वक तपासणी करा.''

एक जण गंभीर चेहरा करून म्हणाला, ''पोलादी पडद्याची जाडी किती आहे, याची नोंद करून लवकर या!''

एकानं 'देव निर्वासित झाले आहेत, ते कुठं राहतात, त्यांची परिस्थिती काय आहे, हे न चुकता तुम्हीच' अशीच सूचना केली. आणखीही कित्येक सूचना आल्या. वर्णभेद, व्यक्तिस्वातंत्र्य, बेकारी- म्हणजे सर्व रशियाचे संशोधन करून मी यावे, असेच त्यांचे मत होते आणि मी ऐकत होतो. माझ्यापुढं ते विमान शांत उभं होतं, पण माझा आत्मा उडाला होता. काळीज धडधडत होतं. त्यामुळे मी बोलत नव्हतो. फक्त 'हुं' म्हणून मुंडी डोलवून वेळ काढीत होतो.

सूचना, उपदेश, फुले, हार, आशीर्वाद हे सर्व घेऊन मी दि. १२ रोजी रात्री अकरा वाजता दिल्लीकडे विमानातून भरारी मारली. त्या वेळी महाराष्ट्राची भूमी अंधारात गडप झाली होती. ती दिसावी म्हणून मी धडपडत होतो. मी विमानाकडे जातेवेळी हात उंचावून उभी असलेली माझी आप्तमंडळी, शंकरभाऊ, शांता, शकू, शाहीर द. ना. गव्हाणकर, गणपत सातपुते, श्री.वैराळे, श्रीमती जयवंताबाई या सर्वांच्या मूर्ती माझ्या डोळ्यांपुढून हलता हलत नव्हत्या. गणगोत, देश, घर सोडून दूरदेशी जाताना किती दुःख होतं, याचा मला त्या वेळी अनुभव आला.

सकाळी पाच वाजता पालम विमानतळावर माझ्या विमानानं पाय टेकले नि माझा जीव भांड्यात पडला.

अगदी सूर्योदयापूर्वीच मी खासदार एस.ए. डांगे यांच्या बंगल्यावर दाखल झालो. तेव्हा 'डी.' झोपले होते. सौ.उषाताई डांगे यांना मी आल्याचं समजताच त्या हसत पुढं झाल्या. ''आमचा अण्णा मॉस्कोला निघाला!'' असं म्हणून त्यांनी माझ्या पाठीवरून हात फिरवला. तेव्हा मला माझ्या आईची आठवण झाली.

उषाताईनं घाई केली. पैसे घेऊन त्या माझी तयारी करायला तयार झाल्या, पण मी मुंबईहून निघताना सर्व तयारी केली होती.

ताईनं विचारलं- ''अण्णा, कपडे?''

''घेतले आहेत-'' मी उतरलो.

''बूट...?'' ताईनं दुसरा प्रश्न केला.

''आहेत.'' मी उत्तर दिले. हे ऐकून ताई निर्धास्त होऊन हसल्या आणि माझ्यासाठी काय काय खरेदी करावे, याचा विचार करू लागल्या. दुपारीच ताश्कंदपर्यंतचं जाण्या-येण्याचं तिकीट आणि व्हिसा माझ्या हाती पडल्यानं मी विवंचनामुक्त झालो.

दुसऱ्याच दिवशी पुढं जायची तयारी करू लागलो. कपडे करून आवराआवर केली. तोच कॉम्रेड डांगे शांतपणे माझ्याकडे आले. माझा तो साहेबी पोशाख पाहून गालात हसले. मग त्यांनी माझा गळबंध सरळ बांधला. अंगातील कोटावरून स्वतः ब्रश फिरविला आणि पाठीवर थाप मारली! ज्या हातांनी कामगारांच्या अनेक पिढ्या घडवल्या नि लढवल्या, ते हात पाठीवरून फिरताच माझं काळीज डोंगराएवढं झालं! मुंबईत आचार्य अत्रे आणि दिल्लीत कॉम्रेड डांगे यांचे आशीर्वाद घेऊन 'चितोडकी रानी' या भारतीय विमानातून मी आकाशात झेप घेतली. त्या वेळी मातृभूमी सोडण्याचे दुःख आणि सोव्हिएत देश पाहण्याचे सुख यांचा विलक्षण संगम माझ्या अंतःकरणांत निर्माण झाला होता. मी पुनःपुन्हा आपली धरती पाहत होतो आणि तिचे दर्शन घेत होतो. मी लवकरच परत येणार आहे, हे मी विसरलो होतो....

विमान सारखं उंच चढत होतं. 'चितोडकी रानी' हे अत्यंत सुंदर नि सुसज्ज विमान पाहून मी चकित झालो होतो. ते विमान हिमालयाला बगल देऊन भरारी मारीत होते. खाली डोंगर टेकडीसारखे दिसत होते. नद्यांना ओघळीचं स्वरूप आलं होतं. एखाद्या शहरातील इमारती काड्याच्या पेट्यांएवढ्या दिसत होत्या.

दिल्लीच्या पालम विमानतळावर शेवटचा प्रवासी म्हणून मी 'चितोडकी रानी' या विमानात चढलो, तेव्हा माझे सहप्रवासी मला पाहून गालात हसले. 'हा एक महामूर्ख आहे, बरं का!' असा त्यांचा चेहरा बोलला. मी आपला गुमान विमानात बसलो. कुणी माझी दाद घेतली नाही. रंग काळा, पोशाख साधा, गळ्यात टाय नीट नाही– मग मला शहाणा कोण म्हणणार?

परंतु त्याच विमानात सिलोनचे युवक प्रतिनिधी होते. त्यांत एक सिलोनी कम्युनिस्ट पार्टीच्या मुखपत्राचे संपादक आणि सिलोनी लोकसभेचे एक सभासद होते. त्यांना माझा पत्ता लागला. त्याच महिन्यात 'मनोहर'मध्ये माझा परिचय आला होता. तो सौ.मीनाक्षीबाईंनी लिहिला होता आणि 'खापऱ्या चोर' या माझ्या तमाशातील माझे चित्र छापले

होते. विमानात तो अंक कोणी तरी दाखवला आणि हा 'खापऱ्या चोर या विमानात आहे, ओळखा' अशी चर्चा सुरू झाली. शेवटी काहींनी मला हेरलं नि मग मी आपल्या सिलोनी मित्रांत दंग झालो. ताश्कंदपर्यंत आमच्या शिष्टमंडळानं माझी दाद घेतली नाही.

परंतु ताश्कंदला पोहोचताच त्यांचे डोळे उघडले आणि मीही एक चांगला माणूस आहे, अशी त्यांची खात्री झाली. मद्रासचे जॉन माझ्या गळ्यात पडले. म्हणाले, ''साठेजी, आमचे सारेच चुकले, माफ करा... आम्ही तुम्हाला वेगळे ठरवले होते, परंतु आता आमची खात्री झाली की तुम्ही फार चांगले आहात.''

बरोबर पाच वाजता 'चितोडकी रानी' हे विमान उझबेकिस्तानची राजधानी ताश्कंद येथे उतरले. तेव्हा अनेक उझबेकी मित्रांनी फुले देऊन आमचे स्वागत केले. एक उझबेकी मित्र पुढं येऊन म्हणाला, ''आता तुम्ही थोडा आराम करा. न्याहारी करा. कारण तुमच्यासाठी सोव्हिएतचे जेट विमान तयार आहे.''

''परंतु 'चितोडकी रानी'मध्ये असलेल्या आमच्या सामानाचं काय?''

मी विचारलं. तो सद्गृहस्थ हसून म्हणाला, ''ते सर्व ठीक होईल. तुम्ही काही काळजी करू नका.''

ताश्कंद येथे आम्ही प्रथम आपली घड्याळं अडीच तास मागं घेतली आणि बरोबर सात वाजता सोव्हिएत विमानात चढलो. 'ए' क्लासमध्ये आमची सोय केली होती.

माझे विमान चाळीस हजार फूट उंचीवरून ताशी आठशेपन्नास किलोमीटर्स वेगाने धावत होते. त्या विमानातील आतील व्यवस्था साधीच वाटत होती. प्रत्येक ठिकाणी वेलवेटचे लाल नि जांभळे पडदे लटकत होते. त्या पडद्यांमुळे आमची मोठी पंचाईत झाली होती. प्रत्येक पडद्यामागे काही तरी असे. निरनिराळ्या जागी निरनिराळे पडदे लोंबत होते. कुठं शौचकूप होते, तर कुठे स्वयंपाकगृह होते. कुठं नोकरांचे विश्रांतिस्थान होते नि त्या प्रत्येकाच्या दारापुढे ते पडदे लटकत होते. प्रत्येक दारापुढे रशियन भाषेत त्या स्थानाचे नाव लिहिले होते आणि ते आम्हाला समजत नव्हते. त्यामुळे आमची परिस्थिती कठीण झाली होती.

आमच्या शिष्टमंडळात बंगालचे चतर्जी या नावाचे एक वृद्ध वकील होते. ते विमानात चढले की झोपत आणि जागे झाले की, प्रथम शौचकूपाची चौकशी करीत. एक तास विमानाचे भ्रमण झाले आणि श्री.चतर्जी एकाएकी जागे झाले. त्यांनी प्रथम सर्वत्र नजर टाकली. निरनिराळ्या पाट्या वाचून पाहण्याची खटपट करून पाहिली, पण शौचकूप कुठे आहे, याचा पत्ता लागेना. मग त्यांनी अनेक पडदे वर करून पाहणी केली, पण काहीच पत्ता लागला नाही. अखेर त्यांना हवाई सुंदरीची मदत घेणे भाग पडले.

विमानाची ती भयंकर दौड पाहून माझा मीच स्तंभित झालो होतो. अनेक विचारांनी माझं डोकं सुन्न झालं होतं. अंतराळातून माझे विमान उडत होते. ते ढगांच्या राशीतून मार्ग काढीत होते. खाली निरनिराळी शहरे दिसत होती. म्हणजे अनंत दिव्यांच्या पुंजक्यांवर खाली एखादे शहर असावे, असं मी समजत होतो. माझं मन स्वदेशात घुटमळत होतं. विमानाने मुंबई ते मॉस्को या दरम्यान मी भरारी मारीत होतो. माझ्या चक्षूंपुढं मुंबई दिसत होती. माझ्या आईच्या प्रतिमेपुढं शांता नि शकुंतला यांनी एक निरांजन लावले होते, ते मी परत येईपर्यंत जळणार होते, त्याचा मी विचार करीत होतो. ते निरांजन जळत असेल, तेवत असेल...

'आला, आला' म्हणत मॉस्को विमानतळ आला. आम्हाला सिगारेट ओढू नका, कमरेला पट्टे लावा, मॉस्को आले, अशा सूचना मिळाल्या. मी खिडकीतून खाली पाहिले. ते मॉस्कोचं पहिलं दर्शन घडताच मन विचारमुक्त झाले. ती मॉस्को नगरी मी प्रथम आकाशातून पाहिली आणि तिची कीर्ती आठवली.

विमानानं एक जंगी झेप घेऊन धरणीवर पाय टेकले. मी सावध झालो. निःश्वास टाकून ऊर रिकामं केलं. विमानाच्या दारात तशा रात्री अनेक मित्र फुले घेऊन आले होते. बाहेर थंडी मी म्हणत होती. थंड वारे सर्वत्र धावत होते. अंगाला चावत होते. माणसांच्या नाका-तोंडांतून वाफेचे लोट निघत होते.

मी पार गांगरलो होतो. मला भानच उरले नव्हते. माझा चेहरा पडला होता. मी कुठं तरी पाहत होतो. त्या गडबडीत आपला ओव्हरकोट अंगात घालायचा मला विसर पडला होता. सर्वांच्या शेवटी मी पाय ओढीत चालत होतो. मी आपला ओव्हरकोट काखेत दाबून धरला होता आणि चोरासारखा सर्वत्र पाहत होतो. समाजसत्तावादी माणसं न्याहाळीत होतो. भयंकर थंडी वाजत होती, त्याची मला जाणीव नव्हती. थोडक्यात, मी भांबावूनच गेलो होतो.

''तुम्हाला थंडी वाजत नाही?'' कझकीना नावाची एक महिला जवळ येऊन म्हणाली. त्यामुळे मी अधिकच

गोंधळून गेलो नि उत्तरलो– ''छे, कुठे आहे थंडी–?'' पण त्या वेळी माझ्या नाकातोंडातून वाफेचे लोट बाहेर पडत होते. ते पाहून मी स्वतःच पुन्हा घोटाळ्यात पडलो नि कझकीना मोठ्यानं हसल्या. ओव्हरकोट अंगात घालायचं विसरून हा माणूस थंडीनं कुडकुडत आहे, हे लक्षात येऊन त्या हसत होत्या. त्यांनी मला थांबावलं. उभं करून मग माझा कोट घेऊन त्यांनीच तो माझ्या अंगात घातला. मग मला बरं वाटलं. मी भानावर येऊन चालू लागलो. कझकीनाबाई अगदी नम्रपणे म्हणल्या– ''ही आमची मॉस्को नगरी. ती तुम्ही उद्या पाहालच...''

''हं.'' करून मी चौफेर नजर टाकली आणि पुन्हा कझकीना म्हणाल्या, ''हे मॉस्को आमचं हृदय आहे.'' ते उद्‌गार ऐकून मी आश्चर्यानं चमकलो. ''खरं आहे तुमचं म्हणणं.'' असं म्हणून मी ढेंगा टाकू लागलो. कझकीना म्हणाल्या, ''हे वातावरण तुम्हाला कसं वाटतं?'' ...''अगदी आमच्या दिल्लीसारखं–'' मी उत्तर दिले. आता माझा पडलेला चेहरा बराच उठला होता.

विमानतळाहून आम्ही मोटारीनं शहराकडे जात होतो. आमच्या मोटारी वेगानं दौड मारीत होत्या. आमचे शिष्टमंडळाचे सभासद दबक्या आवाजात आपसात बोलत होते. त्या चार मोटारी वळणं घेत होत्या. माझ्याबरोबरचे मद्रासचे श्री.जॉन बसले होते. हे जॉन पियानोचे दर्दी म्हणून त्यांची या शिष्टमंडळात निवड झाली होती. ते फारच शांत स्वभावाचे नि प्रेमळ होते. मी मोटारीच्या खिडकीच्या काचा खाली करून बाहेरची दिव्यांची झुंबरं पाहत होतो. थंड वारा मोटारीत शिरून अंगाला चावत होता. त्या चावऱ्या वाऱ्यानं जॉनच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहत होत्या. त्या पाहून मी विचारले,

''काय मित्रा, रडू का येतंय?–''

''मुळीच नाही–'' जॉन चिडक्या सुरात म्हणाला, ''मी कधीच रडत नाही, पण एक विचारू?''

''अरेच्या, त्याला परवानगीची काय गरज आहे?'' मी म्हणालो, ''विचारा ना?''

''एवढ्या कडाक्याच्या थंडीतही तुम्ही खिडकीची काच खाली केली आहे, याचं कारण काय सांगाल का?''

''त्याचं असं आहे,'' मी म्हणालो, ''आपण इकडे आलो आहोत ते सर्व काही पाहण्यासाठी. तेव्हा माझं असं मत आहे की, आपण जे काही पाहायचं ते कसलीही काच न लावता पाहू या. आता रडता का?''

''मिस्टर साठेजी'' जॉन म्हणाला, ''तुमचं अर्ध म्हणणं मला मान्य आहे. आपण सर्व काही सरळ पाहावं, पण या थंडीत माझ्या डोळ्यांना त्रास होतोय. मी रडतोय, हा समज चुकीचा आहे.''

मी त्या राजरस्त्यानं मॉस्कोकडे जात होतो. आनंद झाला होता, पण आता भाषेची अडचण पडून आपला हा रशियाचा प्रवास व्यर्थ होणार, याची मला बोचणी लागली होती. आमच्या या शिष्टमंडळात बंगाल, मध्य प्रदेश, गुजरात, मद्रास अशा निरनिराळ्या प्रांतांतील लोक होते. सर्व जण वेगवेगळ्या व्यवसायातील होते. सर्वांना इंग्रजी येत होते; परंतु मी एकटाच असा होतो की, मला कोणतीही परकी भाषा येत नव्हती. थोडीशी हिंदी आडवी-तिडवी बोलता येत होती, एवढंच.

मी 'सोव्हिएत स्काय' या आलिशान हॉटेलात पोचलो. तेव्हा तिथ मला कॉ.बारनिकोव भेटले. त्यांनी एकदम पुढं येऊन माझा हात धरला नि शुद्ध हिंदी भाषेत बोलायला आरंभ केला,

''–मी बारनिकोव. मी लेनिनग्राडचा आहे. तुम्ही येणार म्हणून मला मुद्दाम तुमच्यासाठी बोलावलं आहे. आता एक महिना मी आपल्याबरोबर असणार– म्हणजे आपल्या दुभाष्याचे काम करणार!'' कॉ. बारनिकोवचे ते शुद्ध हिंदी, मोकळा नि गोड स्वभाव पाहून मला आनंद झाला. नंतर मी आपल्या खोलीत गेलो आणि पुन्हा कॉ. बारनिकोव यांनी येऊन विचारले, ''उद्या काय काय पाहणार आहात?''

''प्रथम रशियातली माणसं!'' मी उत्तर दिले आणि कॉ.बारनिकोव गालात हसले.

अण्णा भाऊ साठे

(१९६१ मध्ये अण्णा भाऊ साठे यांनी रशियाचा दौरा केला होता. त्या चाळीस दिवसांच्या दौऱ्यावरील अनुभव-कथन करणारे 'माझा रशियाचा प्रवास' हे छोटे पण मार्मिक पुस्तक महत्त्वाचे आहे. सुरेश एजन्सी पुणे यांनी प्रकाशित केलेल्या, त्या पुस्तकातील हे पहिले प्रकरण आहे.)

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

नवे संशोधक-समीक्षक अण्णा भाऊंना न्याय देतील...

अर्जुन डांगळे

प्रश्न – अण्णा भाऊ साठे यांचं हे जन्मशताब्दी वर्ष. आपण अण्णा भाऊंच्या जडण-घडणीच्या आणि उमेदीच्या काळाचे साक्षीदार आहात. त्यामुळे मी असे विचारतो की, अण्णा भाऊ साठे यांचा राजकीय जीवनात, चळवळीत प्रवेश कसा झाला? त्यासाठी कोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या?

– माझे आजोबा कॉम्रेड शंकर नारायण पगारे हे आईचे सख्ये मामा त्या काळात कम्युनिस्ट पार्टीचे नेते होते. ज्या लेबर कॅम्पात अण्णा भाऊ वाढले, तिथे कम्युनिस्ट पक्षाचे स्टडी सर्कल होते. कॉ. के. एम. साळवी, कॉ. शंकर नारायण पगारे, कॉ.आर. बी. मोरे, कॉ. विश्राम गांगुर्डे, कॉ. तुकाराम सरतापे ही काही त्यांतली प्रमुख नावे आहेत. या वस्तीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'शेड्युल्ड कास्ट फेडरेशन' आणि 'कम्युनिस्ट' असे दोनच राजकीय पक्ष प्रामुख्याने होते. त्या वेळी बाबासाहेबांचा संपूर्ण समाजावर प्रचंड प्रभाव असताना महार समाजातील अनेक कार्यकर्ते कम्युनिस्ट चळवळीत होते. कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते.

लेबर कॅम्पमधील इराण्याचे हॉटेल 'लेबर रेस्टॉरंट' म्हणजे सगळ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांचा अड्डा होता. ह्या परिसराच्या बाजूलाच 'एस्ट्रेला बॅटरीज' नावाची कंपनी होती. तिच्या बाजूला झोपडपट्टीत अण्णा भाऊ राहत होते. त्या वेळेस झोपडपट्टीतील डासांवर अण्णा भाऊंनी पोवाडा लिहिला आणि त्या हॉटेलसमोर बसलेल्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना ऐकवला. सारे कार्यकर्ते तो पोवाडा ऐकून प्रभावित झाले. त्यांनी अण्णा भाऊंचे शब्दसामर्थ्य हेरले. कम्युनिस्टांचे कसे आहे एक टॅलेंट सापडले की, त्याला ते वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करतात. कॉम्रेड शंकर नारायण पगारे यांनीच अण्णा भाऊंना पार्टीमध्ये आणण्याचे काम केले आणि पार्टीला लोककलेच्या माध्यमातून मिळालेली साथ याचे खरे श्रेय कॉ. पगारे यांचेच आहे. त्यांना आंबेडकरी जलशाच्या सामर्थ्याचे भान होते. ते पार्टीचे 'कार्ड होल्डर' होते. कम्युनिस्ट चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचवायची असेल, तर आपणदेखील हातात ढोलकी-तुणतुणे घेतले पाहिजे, ही त्यांची धारणा होती. लेबर कॅम्पात आंबेडकरी जलसे व्हायचे. मनोरंजनातून प्रबोधन हे आंबेडकरी जलशांचे उद्दिष्ट होते. त्यातून आंबेडकरी चळवळीचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविले जात. आर. एच. अडांगळे, भीमराव कर्डक, दादासाहेब पगारे, केरूजी धेगडे, दीनानाथ भोसले या मंडळींचे जलसे मी पाहिलेले आहेत.

मी लाल बावट्याच्या चाळीत राहायचो. कॉ. पगारे यांनी अण्णा भाऊंना लिहिते करण्यासाठी, कम्युनिस्ट पार्टीच्या माध्यमातून भाडेकरू संघाच्या एका खोलीत सोय केली. (परळच्या दळवी बिल्डिंगमध्ये अण्णा भाऊंच्या कलापथकाचा कार्यक्रम झाला. तेथे कॉ.गंगाधर अधिकारी, कॉ.पी.सी.जोशी. कॉ.बी.टी.रणदिवे उपस्थित होते.) ती

खोली 'लाल बावट्याची खोली' म्हणून प्रसिद्ध होती. तिथेच 'प्रथम मायभूच्या चरणा' हा गण अण्णा भाऊंनी लिहिला. एका लोककथेच्या आधारे– जी कथा बापू साठे यांनी अण्णा भाऊंना सांगितली होती, त्याआधारे– 'अकलेची गोष्ट' हा वग लिहिला. हा वग ऐकून कॉ. बी. टी. रणदिवे फारच प्रभावित झाले. अण्णा भाऊंचे सामर्थ्य पार्टीला जाणवले. अण्णा भाऊंना लिहिते ठेवण्याचे कार्य पार्टीने केले. त्याला कॉ. पगारे कारणीभूत ठरले.

प्रश्न – १९३७–१९४५ या कालखंडाचा विचार केला, तर या काळात भारतीय पातळीवर मार्क्सवादी प्रभावातून लेखकांची एक फळी उभी राहिलेली दिसते. त्यांच्याशी अण्णा भाऊंचे काही नाते होते का?

– मी ज्या लाल बावट्याच्या चाळीत राहायचो, तिथे शंकर शैलेंद्र, बलराज साहनी, सरदार जाफरी, ए. के. हंगल अशा दिग्गज लोकांचे मुशायरे, सभा व्हायच्या. अण्णा भाऊंना ढोलकी–तुणतुण्याचा वारसा होता. ते काही पुस्तकं वाचून

त्यांनी लढणाऱ्या लोकांच्या कथा लिहिल्या. १९५८ मध्ये लिहिलेल्या 'माकडीचा माळ'मधून भटक्या–विमुक्ताचे जीवन पहिल्यांदाच चित्रित केले. त्याच वेळेस मराठीत 'चक्र', 'माहिमची खाडी' या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या होत्या. मात्र अण्णा भाऊंवर फार मोठा अन्याय झाला आहे. मराठी कादंबरीच्या इतिहासाने त्यांना उपेक्षित ठेवले. इतरांचे जाऊ देत, परंतु कुसुमावती देशपांडे ह्या डाव्या विचारांच्या प्रभावाखाली वाढल्या; पण त्यांनीही 'मराठी कादंबरी– पहिले शतक' या इतिहासात अण्णा भाऊंची दखल घेतली नाही. वैजयंता, चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ ह्या त्यांच्या श्रेष्ठ कादंबऱ्या आहेत.

मार्क्सवादी झाले नाहीत. मार्क्सवाद आणि पंडित नेहरू यांच्या विचारप्रभावातून साहित्यात डाव्या विचाराची एक पिढी उदयाला आली. प्रगतिशील लेखक संघ निर्माण झाला.

सन १९४४ मध्ये टिटवाळा येथे झालेल्या शेतकरी परिषदेत 'लाल बावटा कलापथका'ची स्थापना झाली. सत्यशोधक जलसे, आंबेडकरी जलसे आणि कलापथक यांचे एक सांस्कृतिक नाते आहे. अमर शेख, अण्णा भाऊ आणि गव्हाणकर हे तीन शाहीर लाल बावटा कलापथकाच्या माध्यमातून एकत्र आले. त्या काळात मोरारजी देसाईंनी तमाशावर बंदी घातली होती. त्या वेळी अण्णा भाऊंनी सादरीकरणाचा नवा फॉर्म शोधला. त्यांनी जाहीर केले, 'तमाशावर बंदी आहे. आपण आज नवे काही सादर करणार आहोत. आपण लोकनाट्य सादर करीत आहोत.' अशा प्रकारे लोकनाट्य हा प्रकार उदयाला आला. त्यात शेतकरी आला, कामगार आला. अशा प्रकारे अण्णा भाऊंनी महाराष्ट्राला लोकनाट्याची देणगी दिली. अण्णा भाऊंचा संबंध इप्टाशी (इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन) आला. त्यात बलराज साहनी, कैफी आझमी, इस्मत चुगताई अशी महान मंडळी होती. इप्टाच्या माध्यमातून अण्णा भाऊंच्या 'इनामदार' या नाटकाचा प्रयोग १९५८ मध्ये दिल्ली येथे झाला. त्यात मुख्य भूमिका ए. के. हंगल यांनी केली.

प्रश्न – अण्णा भाऊंचा लेखनप्रपंच आणि त्यांच्या जीवनाची वाटचाल याबाबत काय सांगाल?

– अण्णा भाऊंची पहिली कथा 'माझी दिवाळी'. मशाल या साप्ताहिकात १९४९ मध्ये ती प्रसिद्ध झाली. त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण पोवाडे लिहिले. स्टालिनग्राडचा, पंजाबचा पोवाडा यात जातीय दंग्याचे वास्तव रेखाटले आहे. हिंदुत्ववादी कसे वर्तन करायचे, याचा उल्लेख यात आहे. इतरांना हिंदुत्ववादी कसे कमी लेखायचे, याचे वर्णन आहे. बंगालची हाक, अमळनेरचे हुतात्मे असे अनेक पोवाडे लिहिले. मुंबईवर अनेकांनी लिहिले; मात्र अण्णा भाऊंनी जी मुंबईची लावणी लिहिली, ते मुंबईचे खरे वर्णन आहे. मुंबईच्या लावणीवर त्या काळी बंदी आणली होती. लेबर कॅम्पात मी अण्णा भाऊंची अनेक वगनाट्ये पाहिली आहेत. सगळ्या चाली मला पाठ आहेत. माझी मैना, मुंबईची लावणी, जग बदल घालुनी घाव– अशा किती तरी. लोक काहीही चुकीचं सांगतात, तेव्हा कसे तरीच वाटते. 'माझी मैना'चं रोमँटिक चित्र रंगवतात. वास्तविक बेळगाव, कारवार महाराष्ट्रात येऊ शकले नाही, याबद्दलची खंत त्यातून

व्यक्त केली आहे. त्यांच्या गीतरचनाही फार सुंदर होत्या. 'पानापानांत नाचे हा वारा । जिंदगी निघाली भरभरा' यासारख्या. शिवाजीमहाराजांवरील पोवाड्यात काय वर्णन आहे शिवाजीमहाराजांचं!

त्यांनी लढणाऱ्या लोकांच्या कथा लिहिल्या. १९५८ मध्ये लिहिलेल्या 'माकडीचा माळ'मधून भटक्या-विमुक्ताचे जीवन पहिल्यांदाच चित्रित केले. त्याच वेळेस मराठीत 'चक्र', 'माहिमची खाडी' या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या होत्या. मात्र अण्णा भाऊंवर फार मोठा अन्याय झाला आहे. मराठी कादंबरीच्या इतिहासाने त्यांना उपेक्षित ठेवले. इतरांचे जाऊ देत, परंतु कुसुमावती देशपांडे ह्या डाव्या विचारांच्या प्रभावाखाली वाढल्या; पण त्यांनीही 'मराठी कादंबरी- पहिले शतक' या इतिहासात अण्णा भाऊंची दखल घेतली नाही. वैजयंता, चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ ह्या त्यांच्या श्रेष्ठ कादंबऱ्या आहेत.

अण्णा भाऊ हे त्यांचे अनुभवविश्व, परिसर, भाषा यांच्याशी शेवटपर्यंत प्रामाणिक राहिले. अजिबात तडजोड केली नाही. ते महाराष्ट्राची परंपरा वगैरे मानायचे. ज्ञानेश्वर, तुकाराम आदी परंपरेच्या चौकटीतील आदर्श स्वीकारले, जे आज आपण नाकारतो; त्या काळात त्यांनी ते स्वीकारले होते. त्यांची भाषा वारणेच्या परिसराची अस्सल गावरान मराठी होती. त्या परिसराशी अण्णा भाऊंनी इमान राखलं. त्यांनी आपल्या कथेतून जगप्रसिद्ध लेबर कॅम्प उभा केला. दलित साहित्याचं बीजारोपण केलं. नंतर त्याला गती देण्याचं काम बाबूराव बागुल, म. ना. वानखेडे, म. भि. चिटणीस या सर्वांनी केले. या प्रोसेसमध्ये मी होतो.

प्रश्न – त्या काळात १६ डिसेंबर १९५६ ला दलित साहित्य संमेलनाच्या संदर्भात एक बातमी प्रसिद्ध झाली होती. ते संमेलन संपन्न झाले का?

– हे संमेलन १९५८ मध्ये संपन्न झाले. दलित लेखकांचे हे पहिले संमेलन होय. याचे श्रेय भाऊसाहेब अडसूळ, दिनेश लखमापूरकर यांना दिले पाहिजे. त्यांच्यासोबत अप्पासाहेब रणपिसे, चोखा कांबळे, शरद महातेकर, तळवटकर ही सर्व मंडळी होती. त्या काळात 'प्रबुद्ध भारता'तून लोक लिहीत होते. पण ते फडके-खांडेकरी वळणांनी लिहीत होते. दि.२ मार्च १९५८ रोजी या संमेलनाचे उद्घाटन आचार्य अत्रे करणार होते. परंतु ते वेळेवर उपलब्ध होऊ शकले नाहीत, म्हणून वेळेवर अण्णा भाऊंना विनंती करण्यात आली. मोरबाग रोड, दादर येथे झालेल्या या संमेलनाचे उद्घाटन अण्णा भाऊ साठे यांनी केले. याच उद्घाटकीय भाषणात ''पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून, दलितांच्या तळहातावर तरलेली आहे'' असे उद्गार त्यांनी काढले होते. हे भाषण प्रबुद्ध भारत विशेषांकात प्रसिद्ध झाले होते. त्या वेळेस दा.ता. रूपवते संपादक होते. मला सांगायला अभिमान वाटतो की, ते भाषण मी शोधून काढले आणि 'दलित साहित्य – एक अभ्यास' या ग्रंथात समाविष्ट केले. नाही तर ते भाषण प्रबुद्ध भारतातच राहिले असते.

प्रश्न – अण्णा भाऊंची राजकीय भूमिका आणि संयुक्त महाराष्ट्राची चळवळ याबाबत तुम्ही काय सांगाल?

– कम्युनिस्ट पार्टीत राजकीय भूमिका घेणे, ठरवणे हे पॉलिट ब्युरोचे काम असते. अण्णा भाऊ कलावंत होते. कलावंत म्हणून त्यांची भूमिका व्यापक होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी पाठिंबा दिला होता. सर्वांनी एकत्र येण्याबद्दल बाबासाहेबांनी सांगितले होते. प्रबोधनकार ठाकरे, आचार्य अत्रे, दादासाहेब गायकवाड, कॉ.डांगे, एस.एम.जोशी ही सर्व मंडळी होती. संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली. त्याचा फायदा झाला. दलितांचा पहिला महापौर झाला- पी.टी. बोराळे, १५ आमदार निवडून आले. विरोधी पक्षनेतेपद मिळाले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील सक्रिय सहभागामुळे अण्णा भाऊंच्या प्रतिभेचे विविध पैलू समोर आले. अण्णा भाऊंचे एक विकसित, प्रगल्भ, तेजाने तळपणारे आणि स्वतंत्र व्यक्तिमत्त्व साकार झाले.

प्रश्न – आचार्य अत्रे- नवयुग- अण्णा भाऊ साठे हे समीकरण कसे होते?

– केवळ अण्णा भाऊच नव्हे, तर नारायण सुर्वे, बाबूराव बागुल यांनाही प्रसिद्धी देण्यात 'नवयुग'चं मोठं योगदान आहे. कमिटेड लोकांना 'नवयुग'ने प्रकाशात आणले. यात शिरिष पै यांचे मोठे योगदान आहे. अमर शेख आणि आचार्य अत्रे यांचे फार घनिष्ठ नाते होते. अमर शेखांवर अत्रे फार प्रेम करायचे. आचार्य अत्रे हे अण्णा भाऊंच्या मुलाच्या लग्नाला साताऱ्याला गेले होते. कॉम्रेड डांगेही अण्णा भाऊंवर फार प्रेम करायचे. उषाताईंनी (डांगे यांची पत्नी) तर रशियाला अण्णा भाऊंना पाठविण्याविषयी हट्टच धरला होता. 'अण्णाला पाठवा' असे त्या म्हणायच्या. डांगेंनी अण्णा भाऊंना स्वत:चा कोट दिला होता, रशियाला जाताना! आचार्य अत्रे कलावंतांवर फार प्रेम करायचे. जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या कथा अण्णा भाऊंनी लिहिल्या

आहेत, असे अन्यांनी नमूद केले आहे.

प्रश्न – अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य प्रचारकी आहे आणि प्रचारमूल्य असलेले साहित्य हीणकस असते, असे म्हटले जाते. तुमचे काय मत आहे?

– प्रचारमूल्य असलेले साहित्य हीणकस असते, हे मत प्रस्थापित व्यवस्थेने आणि साहित्याच्या तथाकथित मिरासदारांनी आपल्या माथी मारले आहे. मार्क्सवादी धारणेमुळे आणि ज्या समाजव्यवस्थेत अण्णा भाऊ घडले–वाढले होते, त्यामुळे कलावंत म्हणून त्यांची एक जीवननिष्ठा तयार झाली होती. याच जीवननिष्ठेतून आणि दृष्टिकोनातून त्यांची साहित्यनिर्मिती झाली आहे. जीवनानुभूतीच्या अपरिहार्यतेतून त्यांनी कथा लिहिली. वर्गीय प्रबोधनासाठी पोवाडे, लावणी, गाणी आणि लोकनाट्यातून मैदानात सादरीकरण करणारे अण्णा भाऊ आणि कथा–कादंबरी लिहिणारे अण्णा भाऊ यांच्यात आपणाला एक ठळक भेदरेषा काढता येते. अण्णा भाऊंच्या गीतातील, पोवाड्यातील शब्दकळा काव्यात्मक नाही काय? प्रत्येक माध्यमाची अंगभूत अशी ताकद असते. लावण्या, पोवाडे, गाण्यांचा उद्देश मनोरंजनाद्वारे प्रबोधन करणे, हा होता. अण्णा भाऊ हे मार्क्सवादी बांधिलकी स्वीकारलेले कलावंत होते. त्यामुळे त्या मूल्यांचा प्रभाव सादरीकरणात जाणवणे उघड आहे.

समता आणि न्याय ही मूल्ये अण्णा भाऊंच्या जीवननिष्ठेचा भाग होती. ती त्यांच्या कथा–कादंबरीत साकारलेली आहेत. त्यातून परिवर्तनवादी संवेदनशीलता आणि जीवनदृष्टीचा प्रत्यय येतो.

प्रश्न – 'जग बदल घालुनी घाव । सांगून गेले मला भीमराव' असे अण्णा भाऊंनी म्हटले आहे. धनवंतांनी गिळले आणि धर्मांधांनी छळले, असे बाबासाहेब सांगून गेल्याचे अण्णा भाऊ म्हणतात. त्यांना कम्युनिस्ट विचारसणीच्या मर्यादा लक्षात आल्या होत्या, म्हणून ते आंबेडकरांचा स्वीकार करतात काय?

'जग बदल घालुनी घाव' हे संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या काळात लिहिलेले गीत आहे. आंबेडकरवाद–मार्क्सवाद म्हणजे शोषणाविरुद्धचा आवाज– मग तो धार्मिक असो, सामाजिक असो. संयुक्त महाराष्ट्र समितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार रिपब्लिकन पक्षदेखील सामील झाला होता. त्या काळात रिपब्लिकन पक्ष आणि कम्युनिस्ट पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये सहकार्य वाढले होते.



दलित–श्रमिक ऐक्याचे दर्शन त्या काळात घडत होते. काही समीक्षक, लेखक 'फकिरा' कादंबरीच्या अर्पणपत्रिकेच्या अनुषंगाने असा निष्कर्ष काढतात की, अण्णा भाऊ हे शेवटच्या काळात मार्क्सवादी व कम्युनिस्ट तत्त्वज्ञान सोडून आंबेडकरवादाकडे वळले. वास्तविक अण्णा भाऊंना डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांचे विचार, त्यांचे लढे, तत्त्वज्ञान याबद्दल अपार आदरभाव होता आणि तो त्यांनी व्यक्त केला आहे. अण्णा भाऊंनी धर्माची चिकित्सा केली नसेल; पण ते असहायतेविरुद्ध, अन्यायाविरुद्ध, अत्याचाराविरुद्ध लढले. बाबासाहेब मानवमुक्तीच्या लढ्याचे नेते होते, हे भान अण्णा भाऊ विसरले नाहीत.

प्रश्न – अण्णा भाऊंनी मार्क्सवादी जीवननिष्ठा स्वीकारूनदेखील 'कामगार' नायकस्थानी आहे, अशी एकही कलाकृती निर्माण केली नाही. कामगाराच्या सामर्थ्याबद्दल पोवाडे, गाणी, वगनाट्य लिहिणारे अण्णा भाऊ कामगारांना कथेचा नायक म्हणून का चित्रित करीत नाहीत?

– 'कामगार' या संकल्पनेचे भान अण्णा भाऊंच्या

कथेला होते. बरबाद्या कंजारी या कथेतील– ज्या ठिकाणी भटक्या समाजातील मंडळींची पालं उभारली जात होती. त्यासंबंधीचे वर्णन करताना अण्णा भाऊ लिहितात– 'जे काही निकामी झाले होते, ज्याची मुळीच गरज उरली नव्हती– अशा सर्व वस्तू आणून त्या कामी लावल्या जात होत्या. तिथं राहणाऱ्या कोणत्याही माणसाला या जगात कामगार म्हणून जगण्याचा मान मिळाला नव्हता. सर्व निर्जीव त्यांना आवडत होते किंवा लोक निर्जीव होते.' एकूण, त्यांच्या कथेचा जो परिसर आहे आणि त्या परिसरातील जे अनुभवविश्व आहे– वास्तव आहे, त्या परिघात कामगार ही संकल्पना नव्हती. परंतु बारकाईने पाहिले, तर आपल्या असे लक्षात येईल की– ज्या कथांना शहरी पार्श्वभूमी आहे, त्यात कामगार सापडतो. मुकुल मुलाणीची मुलं कामगार असतात, पण त्यांची नोकरी सुटते. 'स्मशानातील सोनं'मधील भीमा हा खाण कामगार असतो. 'रेड झुंज'मध्ये गोठ्यात काम करणारे कामगार दिसतात.

प्रश्न – अण्णा भाऊ साठे सम्रग वाङ्मय प्रसिद्ध करण्याची गरज का निर्माण झाली? त्यामागील तुमची भूमिका काय होती?

– अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय प्रसिद्ध करण्यामागे विशिष्ट हेतू होता. प्रत्येक समाजाला हीरो लागतो. अण्णा भाऊ साठे म्हणजे मातंग समाजाचा लेखक– असे अण्णा भाऊंना जातिबद्ध, मर्यादित करण्यात आले होते. एखाद्या महाकलावंताला जातीत अडकवले जाते. अण्णा भाऊंची जाणीव फार व्यापक होती. सबंध मराठीला मोठे अनुभवविश्व, विचारविश्व देणारा लेखक लोकांपर्यंत पोहोचणे अतिशय महत्त्वाचे आणि अगत्याचे होते. मी साहित्य संस्कृती मंडळात होतो. त्यामुळे अण्णा भाऊंचे निवडक साहित्य प्रकाशित करता आले. अण्णा भाऊंच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे, तमाशे, लावण्या दुर्मिळ होत गेल्या होत्या. नव्या पिढीला अण्णा भाऊ साठे हे महान लेखक होऊन गेले, एवढेच माहीत होते. परंतु या एकत्रित लिखाणातून नव्या पिढीला त्यांचे साहित्य उपलब्ध होणार, या हेतूने ते प्रसिद्ध केले. दुसरे म्हणजे, अण्णा भाऊंना जो न्याय त्या काळी साहित्य–समीक्षकांनी दिला नाही, तो न्याय नवे संशोधक–समीक्षक देतील या अपेक्षेने हे साहित्य प्रकाशित करण्यात आले. त्यातून अण्णा भाऊंचे वाङ्मयीन कर्तृत्व आणि व्यक्तित्व समोर आले.

प्रश्न – पहिल्या अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद तुम्ही भूषविले आहे. नंतरच्या काळात अण्णा भाऊंचेही विभाजन झालेले दिसते. काँग्रेसने वेगळ्या प्रकारे प्रोजेक्ट केले, मातंगांनी वेगळ्या प्रकारे, दलितांनी वेगळ्या प्रकारे. या सर्व प्रकारांकडे तुम्ही कसे पाहता?

– कॉम्रेड अण्णा पानसरे यांनी हे पहिले संमेलन घेतले होते. माझे अध्यक्षीय भाषण झाल्यानंतर ते म्हणाले, आपणाला हे पुढे न्यायचे आहे. अण्णा भाऊंना व्यापक करायचे आहे. जातीत बंदिस्त करणे योग्य नाही. कारण ते अतिशय व्यापक होते.

ज्या वेळेस 'फकिरा' खूप गाजली, या कादंबरीने 'राणोजी मांग' हा गरिबांना एक हीरो दिला. मातंगांना आपला एक हीरो मिळाला. जातीचा हीरो मानणे यात काही गैर नाही. जातिवादी लोक दलितांमधील अंतर्विरोधाचा फायदा घेतात, तसा तो मातंगांना वेगळे करण्यासाठी घेतला गेला. जातिवादी–धर्मांध असा प्रयत्न करतात, तो आपण हाणून पाडला पाहिजे. मातंग युवक, नव्या पिढीने हे अंतर्विरोध कसे मिटतील, हे पाहिले पाहिजे. हिंदू दलित, बौद्ध दलित हा प्रकार थांबवला पाहिजे. आंबेडकरी चळवळीतील एकारलेपणा, कडवेपणा सोडला पाहिजे. हिंदुत्ववादी लोक महार, मांगांना एकमेकांच्या विरोधात उभे करण्याचा प्रयत्न करतात. हा अंतर्विरोध संपवला पाहिजे.

प्रश्न – मुक्ता साळवे, लहुजी वस्ताद यांना पुढे आणून वेगळे गट निर्माण करण्याचे प्रयत्न झाले आहेत, सुरू आहेत. उजव्या विचारांच्या लोकांनी त्या माध्यमातून मोठा ग्रुप तयार केला आहे. लहुजी वस्ताद हे फुले आणि टिळक यांचेही गुरू होते, अशीही अलीकडे मांडणी केली जात आहे. यातील वास्तव काय? काय म्हणाल याबाबत?

– धर्म–जातीच्या नावावर शोषक शक्ती डोके वर काढत आहेत. अण्णा भाऊ साठे आयुष्यभर ज्या मूल्यांसाठी झगडले, ती मूल्ये धोक्यात आली आहेत. त्यामुळे अण्णा भाऊंची चळवळ, साहित्य, विचार, शोषणाविरुद्धचा विचार पुढे घेऊन जाण्याची आज गरज आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले आहे, 'तुमची चळवळ जोरात वाढते, तेव्हा प्रतिक्रांती सुरू होत असते.' त्यामुळे आपसातील असणारे कंगोरे बाजूला ठेवून, भेदरेषा बाजूला ठेवून लढाई लढली पाहिजे. समतेच्या लढाईत माणूस हा केंद्रबिंदू आहे. समतेसाठी परिवर्तनाची लढाई– यात बुद्ध, चार्वाक, फुले, आंबेडकर, शाहूमहाराज हे सर्वच येतात. माणसाचे मोठेपण, माणसाचे मानवीपण जपणे हीच आजची

लढाई आहे. जाती-धर्माच्या नावाने दुय्यम नागरिकत्व अशी खेळी खेळली जात आहे. त्या विरुद्ध समतेसाठी लढाई, परिवर्तनवादी लढा हेच आजचे उद्दिष्ट असले पाहिजे.

प्रश्न – अण्णा भाऊंच्या निधनानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा सुरू झाल्या. पार्टीने त्यांची दखलच घेतली नाही, असेही म्हटले गेले. नेमके वास्तव काय आहे?

– जसे 'माझी मैना' ही लावणी नाही, छक्कड आहे. सीमाप्रश्न, बेळगाव-कारवारसाठी लिहिली गेली. लोकांनी तिला एकदम रोमँटिक करून टाकले. इतर अनेक कपोलकल्पित कथा पेरल्या. 'अण्णा भाऊ आणि बाबासाहेबांची भेट झाली होती' असे बाबूराव गुरव यांनी लिहिले आहे. ही भेट १९४९ मध्ये झाल्याचे म्हटले आहे. अण्णा भाऊंचा मृतदेह घाटकोपर येथील चिरागनगरच्या झोपडीत पाच-सहा दिवस सडत होता, असेही म्हटले गेले. हे सर्व खोटे आहे.

अण्णा भाऊंना पार्टीने घडवले आहे. चळवळ संपल्यानंतर कलावंतही संपत जातात. अण्णा भाऊंचे १९६४-६५ नंतरचे व्यक्तिगत आयुष्य जर आपण पाहिले, तर ते चिरागनगरातून गोरेगावात राहायला आले आहेत. बाबूराव भारतकरांनी त्यांना घर दिले. गोरेगावच्या सिद्धार्थनगरमध्येच अण्णा भाऊंचे निधन झाले. आमची मीटिंग सुरू होती. नारायण सुर्वे, वा. वि. भट, दया पवार, वामन होवाळ, नेरूरकर आदी- अशी आमची मीटिंग सुरू असतानाच अण्णा भाऊंच्या निधनाची वार्ता आम्हाला समजली. अण्णा भाऊंच्या अंत्ययात्रेत जे लोक सहभागी झाले होते, त्यात मी एक होतो.

अण्णा भाऊंवर पार्टी फार प्रेम करायची. पार्टीने त्यांची दखल घेतली होती. या अनुषंगाने एक किस्सा सांगतो. अण्णा भाऊंच्या सत्काराचा एक कार्यक्रम होता. बलराज साहनी हे त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. अण्णा भाऊंना थोडे बरे वाटत नव्हते. तेव्हा बलराज साहनी स्वत: अण्णा भाऊंना घेऊन गेले. ड्रायव्हरला बाजूला बसवलं आणि बलराज साहनी स्वत: ड्रायव्हिंग करत, गाडी चालवत गेले आणि घाटकोपरला चिरागनगरच्या घरी अण्णा भाऊंना पोहोचवले. बलराज साहनींसारखा एवढा मोठा माणूस अण्णा भाऊंना अशी ट्रीटमेंट देतो, एवढा सन्मान अण्णा भाऊंना मिळाला होता.

मी लहानपणापासून मोठमोठ्या लोकांच्या आजूबाजूला वावरलो आहे. चळवळीचं आमचं घर. डांगे हे आमचे गाववाले. कॉ.पी.बी. रांगणेकर हे जवळच माटुंग्याला राहायचे. ते भाडेकरू संघाच्या खोलीवर वारंवार येऊन अण्णा भाऊंनी किती लिहिले, काय लिहिले याची चौकशी करायचे. त्या ठिकाणी पोस्टर्सच्या ढिगाऱ्यावर बसून किंवा झोपून मेणबत्तीच्या प्रकाशात लिहीत किंवा वाचत बसलेल्या अण्णा भाऊंना पाहणारे अनेक जण आहेत. अण्णा भाऊंना पार्टीने घडवले आणि तेवढंच त्यांच्यावर प्रेमही केले, हे निर्विवाद सत्य आहे.

प्रश्न – अण्णा भाऊ साठे जन्मशताब्दीच्या निमित्ताने तुम्ही काही संकल्प केला आहे का?

– मी अण्णा भाऊंना १९६२ मध्ये भेटलो होतो. 'फकिरा' चित्रपटासाठी त्यांना मुलं पाहिजे होती. त्यासाठी ते लेबर कॅम्पात आले होते. लेबर कॅम्पशी असलेले नाते त्यांनी कधी तोडले नाही. ते कायम ठेवले. त्यांची जन्मशताब्दी यासोबतच 'दलित पँथर' पन्नाशीच्या उंबरठ्यावर आहे. मी पँथर चळवळीचा साक्षीदार आहे. मात्र स्वत:चे महत्त्व वाढविण्यासाठी सांगोवांगीवरून पँथरचा खोटा इतिहास लिहिला गेला आहे. पँथरचे खरे हीरो नामदेव ढसाळ आणि राजा ढाले हेच होते. त्यांना बाजूला सारून, आपणच पँथरचे हीरो होतो, असे भासवून खोटा इतिहास लिहिला गेला आहे. तोच आज तरुण पिढीसमोर आहे. त्यामुळे पँथरचा खरा इतिहास लिहावा, असा पँथरच्या कार्यकर्त्यांनी, अनेक लोकांनी माझ्याकडे आग्रह धरला; म्हणून मी पँथरचे समग्र सत्य सांगणारा ग्रंथ साकारणार आहे.

अण्णा भाऊंच्या जन्मशताब्दीनिमित्त हा माझा संकल्प आहे.

(मुलाखत व शब्दांकन : डॉ. महेंद्र भवरे)

Mob. 9920789385

अर्जुन डांगळे, मुंबई
Mob. 9820503154

(कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी पुढाकार घेऊन सुरू केलेल्या पहिल्या अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या 'निवडक अण्णा भाऊ साठे' या ग्रंथाचे निमंत्रक, असे सन्मान अर्जुन डांगळे यांच्या वाट्याला आले आहेत.)

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

कॉम्रेड अण्णा भाऊ साठे

उत्तम कांबळे

कोणताही महान माणूस परिस्थितीचं अपत्य असतो. परिस्थितीच त्याला जन्माला घालते, त्याला घडवते आणि महान माणूस स्वत:ला हवी तशी परिस्थिती घडवतो किंवा त्यासाठी अथकपणे प्रयत्न करतो. संघर्ष करतो. बदलासाठी हा संघर्ष असतो. काय बदलायचं आहे आणि काय नवं निर्माण करायचं, ते कोठून आणायचं आणि रुजवायचं, यासाठी हा माणूस संघर्ष करतो. त्यासाठी तो वेगवेगळी आयुधं वापरत असतो. रस्त्यावरच्या संघर्षापासून ते लेखनापर्यंत, नव्या परंपरा व नव्या विचारांपासून ते प्रबोधनापर्यंत अनेक आयुधं असतात. ती तो वापरतो. या माणसाला समजावून घ्यायचं असेल; तर तो ज्या परिस्थितीत, ज्या समाजात, ज्या पर्यावरणात जन्माला आला– ते सर्व पाहावं लागतं. साहित्याच्या बाबतीत तर ते पाहावंच लागतं. संबंधित माणसाची नाळ कोठे पुरली ती जागा, तेथील माती, तेथील समाजव्यवस्था, तेथील धर्मव्यवस्था इथपर्यंत धांडोळा करावा लागतो. साहित्य हे समाजाचं, माणसाच्या जगण्याचं, त्यानं पाहिलेल्या स्वप्नांचं प्रतिबिंब असतं– हे मान्य केल्यास या सर्व गोष्टी ओघानंच येतात. त्यांना चकवा देऊन पुढं गेल्यास महामाणूस, महान लेखक समजावून घेण्यात अडचणी येतात. त्याचं कर्तृत्व पाहता येतं, त्याचा फोटो काढता येतो; पण त्याच्या कर्तृत्वाला कोणत्या मुळांनी कोणतं खतपाणी दिलं, कोणती जीवनसत्त्वं आणि कोणती संघर्षतत्त्वं का आणि कशी दिली, हे पाहायचं राहूनच जातं. एकूणच माणूस आणि त्याचं कर्तृत्वही समजून घेण्यात अडचणी येतात. म्हणजे, एका अर्थानं आपण त्याच्यावर अन्याय करतो. दृश्याचं आकलन–अध्ययन करणं जसं महत्त्वाचं असतं, तसं दृश्य जन्माला घालणाऱ्या गर्भाशयाचं आकलनही महत्त्वाचं ठरतं.

Every secrets of a writer's soul, every exeperience of life, every quality of his mind is written large in his work- असं ब्रिटनमधील एक प्रसिद्ध लेखिका व्हर्जिनिया वुल्फ (२५ जानेवारी १८८२ ते २८ मार्च १९४१) यांनी म्हटलं आहे. लेखक आपल्या लेखनात या साऱ्याच गोष्टी आणत असतो. प्रसंगी आपल्या आत्म्याच्या (म्हणजे स्वत:च्या, धर्मातील आत्मा नव्हे) गोष्टीही तो लेखनात आणत असतो. हे सारं लक्षात ठेवून प्रसिद्ध बंडखोर, विद्रोही व मार्क्सवादी लेखक अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाकडं, जीवनाकडं आणि त्यांनी घडवलेल्या संघर्षाकडे पाहायचं आहे.

अण्णा भाऊंच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांचा जीवनसंघर्ष आणि त्यांच्या साहित्यावर पुन्हा एकदा गांभीर्याने सखोल नजर टाकायची आहे. जे अव्वल साहित्य असतं, त्यातून काळ बदलेल तसं काही तरी नवं घावत असतं

आणि भावतही असतं. हे साहित्य नव्या जीवनाशी मैत्री करण्यासाठी आणि त्याला संघर्षाचा पाठ देण्यासाठीही पुढं येत असतं. अण्णा भाऊंचा जन्म एक ऑगस्ट १९२० या दिवसाचा, असं गृहीत धरण्यात आलं आहे. त्यांच्या जन्माच्या कागदोपत्री नोंदी कुठं कुणाला अद्याप सापडलेल्या नाहीत. शूद्रांच्या जन्माची नोंदणी त्या काळात पद्धतशीरपणे होत असेल, असं मानता येत नाही. अण्णा भाऊंचं गाव वाटेगाव त्या वेळी कुरुंदवाडच्या पटवर्धन संस्थानात होतं. भालचंद्रराव अण्णासाहेब संस्थानिक होते. नंतर ते सातारा जिल्ह्यात आणि सध्या सांगली जिल्ह्यात आहे. अण्णा भाऊंच्या जन्माची आणि दिवस यांची आठवण त्यांच्या मातोश्री वालुबाई (माहेर तळसंदे, तालुका हातकणंगले, जि.कोल्हापूर) यांनी सांगितली. अण्णा भाऊंचा जन्म ज्या दिवशी झाला, त्याच दिवशी देशातील एका खूप मोठ्या माणसाचं निधन झालं, असं वालुबाईंनी सांगितलं. तो मोठा माणूस म्हणजे लोकमान्य टिळक. ही सर्व माहिती पडताळून जन्मतारीख सर्वमान्य करण्यात आली. अण्णा भाऊ मूळचे वाटेगावचे, असे सांगण्यात येत असलं आणि तेही मान्य करण्यात येत असलं, तरी वाटेगावपासून जवळच टाकळी या छोट्याशा खेड्यात साठे कुटुंबीयांचं काही काळ वास्तव्य होतं, असंही म्हटलं जातं. साठे कुटुंब कर्नाटकातून वाटेगावला आलं, असं सांगणारे आजही आहेत. मग प्रश्न असा येतो की– हे कुटुंब कर्नाटकात का गेलं आणि तिथून वाटेगावात का परतलं? वाटेगावातून हे कुटुंब कर्नाटकात गेलं की महाराष्ट्रातून अन्य ठिकाणाहून गेलं? संशोधक या प्रश्नाचं उत्तर शोधून काढतील, याविषयी मला आशा आहे. अण्णा भाऊंच्या कुटुंबाचा भूगोल नेमका कोणता होता, हे तपासण्यासाठी या सर्व गोष्टी आवश्यक आहेत.

आता दिसणाऱ्या वाटेगावचा भूगोलही आगळावेगळा आहे. भोगावती नदी गावाच्या मधोमध वाहत जाते. जणू काही वाटेगावचे दोन तुकडे करते. वाटेगाव सध्या वाळवा तालुक्यात पेठच्या वायव्येला इस्लामपूरपासून पावणेदहा मैलांवर आणि राष्ट्रीय महामार्ग–४ वर आहे. तसं ते अनेक गावांना मध्यवर्ती वाटतं. ब्रिटिशांनीच तिथे बाजारपेठ वसवली. पूर्वेला काळम्मावाडी देवी म्हणजे काळम्मावाडीची हद्द आहे. तिला चिकटून सुळकीचा डोंगर आहे. या डोंगरावरच इंग्रजांनी अण्णा भाऊंच्या कादंबरीतील फकिरा गायब केला. वाटेगावच्या पश्चिमेला शिराळा पेठेची हद्द, दक्षिणेला सुरुल हद्द आणि राजारामबापू साखर कारखाना आहे. या भागातच अण्णा भाऊंची 'माकडीचा माळ' ही कादंबरी जन्माला आली, असं म्हणतात. उत्तरेला कासेगावची हद्द, कऱ्हाड कासार हद्द आहे. वाटेगावसाठी गंगा झालेली भोगावती पुढं कृष्णेत विलीन होते.

वाटेगावचा गावगाडा खूप समृद्ध होता. समृद्ध गावाभोवती भटक्या जाती–जमातींचा वावर असतो. वाटेगावात खूप जाती राहत होत्या, राहतात. गावगाड्यात स्थान नसलेल्या भटक्या–विमुक्त आणि पूर्वी इंग्रजांनी गुन्हेगार ठरवलेल्या जातींचा वावर आजही येथे मोठ्या प्रमाणात आहे. या सर्व जाती अण्णा भाऊंच्या सामाजिक आणि भौगोलिक पर्यावरणात होत्या. त्यांचं जगणं–मरणं अण्णा भाऊ पाहत आले होते. या बहुतेक जातींना अण्णा भाऊंच्या साहित्यात स्थान मिळालं आहे. काही जाती तर मराठी साहित्यात प्रथमच अवतीर्ण झाल्या, त्या अण्णा भाऊंमुळेच. त्यांचा विचार आपण पुढं करणार आहोत.

अण्णा भाऊंचे साहित्य मार्क्सवादी की आंबेडकरवादी, असा खडा सवाल तयार झाल्यास 'मार्क्सवादी' असंच उत्तर द्यायला हवं. ते मान्य होईल की नाही, याचा विचार करू नये. कारण कोणी तरी मान्य करावं यासाठी हे उत्तर नाहीये, तर ते वास्तव आहे. पण या वास्तवापासून दूर जाण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. गम्मत म्हणजे, अण्णा भाऊ स्वतःच्या साहित्याच्या प्रेरणा काय सांगतात, साहित्याचे प्रयोजन काय सांगतात, वरील मार्क्सवादाचा परिणाम कोणत्या शब्दांत सांगतात– हेही अण्णा भाऊंना या ना त्या तंबूत ओढणारे पाहत नाहीत. अण्णा भाऊ आज असते तर हे सारं पाहून हसले असते आणि 'काही करा पण मला माणसाबाहेर काढू नका, मार्क्सवादाबाहेर काढू नका' असं त्यांनी म्हटलं असतं.

२०१२ च्या जनगणनेनुसार वाटेगावचे लोकसंख्याविषयक आणि जातवार लोकसंख्याविषयक चित्र पुढीलप्रमाणे मांडता येईल. गेल्या आठ-दहा वर्षांत त्याच्यात थोडाफार फरक झालेला असू शकतो. एकूण लोकसंख्या- ९,४८५, महिला- ४,५८०, पुरुष- ४,९०५. वाटेगावला बागायती आणि जिरायती क्षेत्रही मोठे म्हणजे १,६९६ हेक्टर इतकं आहे. अनुसूचित जातींतील लोकसंख्या मोठी म्हणजे १,१७५ इतकी आहे. त्यात महार, मांग, चांभार आदी जाती आल्या. गावात अठरापगड जाती (अठरा पगड म्हणजे वेगवेगळ्या अठरा पगड्या घालणाऱ्या जाती) आहेत. ब्राह्मण, मराठा, मुस्लिम, नाभिक, रामोशी, सुतार, लोहार, नवबौद्ध (पूर्वीचे महार), मातंग, चर्मकार, लिंगायत, वाणी, जैन, तेली, मारवाडी, वडार, धनगर, ढोर आणि जंगम या त्या अठरा जाती. यातील अनेक जातींचा प्रत्यक्षात पगडीशी संबंध नाही. व्यवस्थेनं ती त्यांना दिलेली नाही. व्यवस्थेनं सर्वांनाच पगड्या दिलेल्या नाहीत आणि पूर्ण पोषाख नेसण्याचा अधिकारही सर्वांनाच दिलेला नाही. मनुबाबाच्या मनात जसं आलं आणि जे त्याच्या मनुस्मृतीत अवतरलं, तसंच घडलं आहे. जातींच्या संख्या अजूनही खूप आहे. बारा बलुतेदार, पंधरा आलुतेदार म्हणजे कारू-नारू असतात. वाटेगाव व परिसरात गावगाड्यातल्या आणि त्याच्या परिघात हंगामी ये-जा करणाऱ्या अनेक जाती आहेत. त्यांना फिरस्ते, फिरस्तीही म्हणतात. वाटेगाव जसा गावगाड्याच्या दृष्टीनं समृद्ध आहे, तसा तो देव-धर्माच्या बाबतीतही आहे. वाटेगावात दोन-अडीच डझन भरतील एवढे देव आणि देवता आहेत. त्यातील बरेच अण्णा भाऊंच्या साहित्यात डोकावतात. काही देव-देवता सामुदायिक, तर काही त्या-त्या जातीच्या आहेत. अस्पृश्यांच्या काही देवता असतात आणि त्या बहुतेक उग्र देवता असतात. अस्पृश्य आणि भटक्या जाती या सामान्यपणे मातृप्रधान, देवताप्रधान असतात. ज्या जातीचा जेवढा छळ आणि पिळवणूक होते, त्यावरूनही त्यांची देवता कमी उग्र की अधिक उग्र- हे ठरत असते. इथं आपण प्रामुख्यानं मातंग (मांग) जातीचा विचार करणार असल्यानं त्यांच्या देवताच पाहणार आहोत. या देवतांची यादी वेगवेगळी आहे. वेगवेगळ्या संशोधकांनी ती वेगवेगळ्या संख्येत सांगितली आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यात सणवार, व्रतवैकल्ये, वीर आदींचा जो उल्लेख येतो; तो समजून घेण्यासाठीही या देव-देवतांची माहिती निदान नावापुरती तरी करून घेणं आवश्यक आहे. 'द ट्राइब्ज ॲण्ड कास्ट्स ऑफ बॉम्बे' या प्रसिद्ध संशोधनपर ग्रंथात लेखक आर.ई. इन्थोवन यांनी अनेक जातींची माहिती दिली आहे. खरं तर हा जाती-जमातींची माहिती देणारा सर्व्हे ग्रंथ आहे. इंग्रजांनी १९०१ मध्ये असा व्यापक सर्व्हे करण्याचा आदेश दिला आणि १९२० मध्ये तीन खंडांत हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. यातील माहिती खूपच विश्वासार्ह मानली जाते. तिला आव्हान देऊ नये, इतकी ती विश्वासार्ह मानली जाते. या ग्रंथांच्या दुसऱ्या खंडात मांग (संशोधकांनी हाच शब्द वापरला आहे) पान ४३४ वर मांग जातीतील देवांची नावे दिली आहेत. त्यात महादेव (मांग शैवपंथीयही आहेत), मरिआई (पटकी देवता), भैरोबा, खंडोबा, म्हसोबा, अंबाबाई, बहिरी, जनाई, ताई, विठोबा, यमाई यांचा उल्लेख आहे. प्र.कृ. सरदेसाई यांनी 'आदिशक्तीचे विश्वस्वरूप' (देवीकोश) भाग तीनमध्ये अंबाबाई, मरिअम्मा, यल्लमा, बहिरी, जनाई, मरिआई, तुर्की, यमाई, खंडोबा, जोतिबा आदी मांग जातीच्या देव-देवता असल्याचं म्हटलं आहे. कारू-नारू किंवा फिरस्त्यांमधील देव-देवता पाहिल्यास बहुतेक हीच नावे येतील. उग्र देवता, मातृदेवता वगैरे विशेषणे त्यांच्यासाठी आहेत. फिरस्त्यांना गाव नसतं म्हणून अनेक ठिकाणी त्यांना ग्रामदेवता नसतात. या देवता प्रसन्न व्हाव्यात, म्हणून मांगांमध्ये काही देवतांना मुली-मुले वाहण्याची प्रथा आहे. त्यांना मुरळी, जोगनी, वाघ्या, भावीण वगैरे म्हटलं जातं. मांगांमध्ये देवदासी सोडण्याचं प्रमाण अधिक आहे. मुलांमध्ये पोतराज, वाघे जन्माला घातले जातात. अण्णा भाऊंच्या वाटेगावपासून जवळच कुंडलला पोतराजाची जत्रा भरते.

माणूस ज्या प्रकारचं जीवन जगतो, ज्या प्रकारच्या पर्यावरणात राहतो, ज्या प्रकारे त्याची पिळवणूक होते- तसा त्याचा स्वभावही थोड्या प्रमाणात घडत असतो. माणसाचं व्यक्तिमत्त्व घडण्यास एवढीच कारणं असतात, असं मात्र नाही. अजूनही असतात. मातंगांच्या बहुतेक देवी जशा उग्र आहेत, तशी त्यांची आराधनाही उग्र आहे, हे आपण पुढे पाहणार आहोत. वाटेगावात ताईबाईचे मंदिर अण्णा भाऊंच्या घराच्या दक्षिणेलाच पूर्वीपासून आहे. घरापासून थोड्या अंतरावरच लक्ष्मीचे मंदिर आहे. याशिवाय गावातील आणि बाहेरील अन्य मंदिरांचा उल्लेख अगोदर आलाच आहे. मराठवाड्यात मांगीरबाबा, रेणुका, यल्लमा, हनुमान, काही ठिकाणी मंगेश यांचीही पूजा मातंगांकडून



केली जाते.

मांग आणि मातंग असा भेद करणारे काही संशोधक आता तयार झाले आहेत. मातंग शब्दाची फोड करून ते वेगळे काही तरी सांगतात. ते तार्किक दृष्ट्या योग्य असले– मातंगापासून मांग की मांगापासून मातंग हा शब्द यावर यापुढेही चर्चा झडत राहणार आहेत– अशा चर्चा होणे अर्थातच चांगलं असतं. महाराष्ट्रात मांग, कर्नाटकात मादिगा आणि गुजरातमध्ये मांगेल हा शब्द रुढ आहे. प्रत्येक जातीतून पोटजातींची सातत्यानं निर्मिती होणे, हेही आपल्या जातव्यवस्थेचं एक अतूट वैशिष्ट्य आहे. आपण सांगितलेल्या जातींमध्ये पोटजातींचं एवढं उदंड पीक येईल याचा अंदाज मनूला पण आला नसावा. तो ज्या जातीचा होता, तिथेच शंभराहून अधिक पोटजाती जन्माला आल्या आहेत; अन्य पोटजातींबद्दल तर विचारायलाच नको! मातंगांचं तसंच आहे. ज्याचा सुरवातीला उल्लेख केला तो इन्थोवन मातंगामधील २५ पोटजातींची यादी देतो आहे. प्रा.शरद गायकवाड यांनी 'मातंग समाज : साहित्य आणि संस्कृती' या आपल्या ग्रंथात प्रा.सोमवंशी यांच्या संशोधनाचा हवाला देऊन व्यवसायावरून मातंगांच्या तीन पोटजाती आहेत असं म्हटलं आहे. तसेच कुळावरून ४७ पोटजाती असल्याचं म्हटलं आहे. डॉ. प्रभाकर मांडे यांचा हवाला देऊन २४ जाती असल्याचं म्हटलं आहे. कुणामध्येही एकमत नाही. प्रदेशनिहाय पोटजातींची संख्या कमी–जास्त असू शकते.

इन्थोवेन, मांडे आणि संस्कृतिकोश यांच्यामध्ये मात्र सव्वीसच पोटजातींचा उल्लेख आढळतो. मांडे आणि संस्कृतिकोशानेही इन्थोवेन याचा मुबलक वापर केला आहे.

अनेक संशोधकांनी मांग/मातंग हे दोन्हीही शब्द वापरले आहेत. महाराष्ट्रामध्ये २६ पोटजाती असतील, तर त्यापैकी वाटेगावमध्ये किती होत्या आणि यापैकी अण्णा भाऊंची पोटजात कोणती होती, याचा शोध कोणीही घेतलेला नाही. काही ठिकाणी मातंग स्वत:ला अंबुज, तर काही ठिकाणी चुंग म्हणतात. काही ठिकाणी त्यांची गुप्त भाषाही आहे. याचा अर्थ भाषेच्या बाबतीत ही जात समृद्ध आहे. वेगवेगळे व्यवसाय, स्थलांतर, गुन्हे, सेवा या सर्वांतून ही भाषा समृद्ध झाली आहे. मातंगांमध्ये अस्सल, कमअस्सल, कडू वगैरेही पोटजाती आहेत. जो स्वत:ला एकदम अस्सल समजतो, तो स्वत:ची पोटजात अस्सल किंवा मराठा सांगतो. मराठा ते मुसलमान असाही पोटजातींचा प्रवास आहे. पण काही संशोधक मुसलमान उच्चारत नाहीत. अन्य काही जातींबरोबरच मातंगांचेही वेगवेगळ्या कालखंडांत इस्लाम, ख्रिस्ती आणि अलीकडे बौद्ध असं धर्मांतर झालं आहे. महात्मा बसवण्णांच्या लिंगायत धर्मातही त्यांचा सहभाग मोठा आहे. त्यांनी तिथे सुंदर वचनेही जन्माला घातली आहेत. नावारूपास आलेले बसवशरणही तेथे आहेत. जलजंबू हा मातंगांचा पहिला पुरुष असला तरी यमऋषी, आदिवासी यांच्यापर्यंत मातंगांचा विचार केल्याचेही दाखले देण्यात येतात.

आता आपण पोटजातींकडे वळू. अस्सल मराठा, बाले बुरुड, चपकसंदे, उळूर, देलूर, उकुलवार, वाजंत्री, ढोर, घडशी, होलार, जिनगर, जिराईत, मोची, नाडे, परिट, शिवते, तेलंगी, टोकर, फोडे, झारे, मुसलमान मांग या काही पोटजाती आहेत. त्यांच्या नावावरून लक्षात येईल की, त्यांनी स्वीकारलेला व्यवसाय किंवा तो व्यवसाय करणारी मूळ जातही आडनावात येते. मातंगांना तसा ठोस व्यवसाय नव्हता. दोरखंड आणि दोरापासून अन्य वस्तू तयार करणे,

वाजंत्री वाजवणे, चोऱ्या करणे, मरिआईचा गाडा ओढणे, पोतराज होणे, रंजन आणि सेवा देणे, म्हशी भादरणे, गुन्हेगाराला फाशी देण्याचे काम करणे आदी पडेल ते व्यवसाय त्यांनी केले आहेत. बलुतेदारांत त्यांचा समावेश असला तरी सर्वच ठिकाणी त्यांना वतनं नाहीत. काही ठिकाणी त्यांनी पाटीलकी मिळवली होती. काही ठिकाणी महारांसारखी, काही ठिकाणी ढोर-चांभारांसारखी कामं स्वीकारली होती. काही धार्मिक कामं त्यांची प्रतिष्ठा वाढवण्यासारखी दिसत असली तरी प्रत्यक्षात त्यांची त्यात पिळवणूकच आहे. कॉलऱ्याची साथ मोठ्या प्रमाणात आली तेव्हा समाजानं कॉलरा, पटकीचंच रूपांतर देवीत केलं. मारणारी आई असं तिला नाव दिलं. मग हीच देवी म्हणजे मरिआई झाली. मातंगांनी तिला गाड्यात घालून गावाबाहेर सोडायचं आणि गाव रोगमुक्त करायचं. म्हणजे मातंगाने स्वत:च रोग वाहून न्यायचा. रोगी बनायचं. प्रसंगी प्राण द्यायचा. पोतराज बनून त्यानं स्वत:चा चावा घेऊन स्वत:चंच रक्त काढायचं, स्वत:च स्वत:च्या अंगावर कोरडा ओढून घ्यायचा, आपल्या मुली देवदासी बनवायच्या, कापलेल्या रेड्याचे मुंडके डोक्यावर घेऊन गावाभोवती फेरी मारायची किंवा रेड्याच्या आतड्यातील घाण गावाच्या सीमेभोवती शिंपडत जायची. तसं झाल्यानं गावाला बाधा होत नाही, ते सुरक्षित राहतं. पण दुसरीकडे मातंग असुरक्षित होतो किंवा मरतो. दोराचं काम त्याच्याकडे आणि गळा आवळण्याचं म्हणजे फाशीचं कामही त्याच्याकडेच. तुम्ही ज्या पद्धतीचं आणि जेवढ्या म्हणून पिळवणुकीचं, अन्याय-अत्याचार सहन करण्याचं आयुष्य जगत असता; तसं तुमचं व्यक्तिमत्त्व घडत असतं. ते वेगवेगळ्या स्वरूपात व्यक्तही होत असतं. त्यात विचारव्यवहार, वर्तनव्यवहार आणि साहित्यव्यवहारही आलाच.

मातंग समाजाचे आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन पोटजातीनिहाय आणि प्रदेशनिहाय बदलले दिसते. खरं तर हे सर्वच खालच्या जातींबाबत घडत आलं आहे. कर्नाटकात काही जण मादिग हा शब्द म्हणजे 'मातंग' या शब्दाचा अपभ्रंश मानतात. कर्नाटकात असादरू, चन्नहोलिय, डकलेरू, ढोर, मोची पेड, सनादी (वाजंत्री) हे पोटजातीचे प्रकार आहेत. एक वैशिष्ट्य म्हणजे, पूर्वी या जातीत ब्राह्मण पुरोहित लग्न लावण्यास उपलब्ध झाला नाही तर लग्न लावण्याचा मान किंवा अधिकार जातीतील वृद्ध महिलेस असे. यल्लम्मा, दुर्गण्वा, धामण्वा, मर्गाई या देवतांचा कानडी मातंगावर खूप परिणाम आहे. जोडीला महाराष्ट्रात नसणारे पण कर्नाटकात प्रसिद्ध असणारे वेंकटराम व मारुती हेही देव तिथे आहेत. गुजरातमधील मांग सटवीचीही पूजा करतात. सटवी भविष्य लिहिणारी देवता मानली जाते. गुजरातमधील मांगांचे वैशिष्ट्य म्हणजे मृत्यूनंतर चौथ्या दिवशी अंत्यसंस्कार म्हणजे मृताला पुरण्याचा विधी होत असे.

मांग गारुड्यांच्या वाट्याला तर मोठ्या प्रमाणात चोरी आली होती. मध्य प्रदेशातील मांग गारुडी बेवारस प्रेते वाहून नेणे, फाशी देणे इत्यादी कामे करत. एखाद्याचं निधन झालं की, त्याला पुरलं जातं असे. तीन दिवस प्रचंड दारू प्यायली जाते. तिसऱ्या दिवशी मृताच्या घरासमोर कडुलिंबाची पानं खाऊन थुंकलं की, मृताशी असलेला संबंध संपला, असं मानलं जातं. विचित्र वाटाव्यात अशा ज्या प्रथा-परंपरा-अंधश्रद्धा तयार झाल्या; त्या त्यांच्या अज्ञानातून, दारिद्र्यातून, जगण्याच्या विवंचनेतून होय. व्यवस्था हे सारं घडवत होती. महाराष्ट्रातील मातंगांमध्ये खूप पूर्वी लग्नाच्या वेळी दोन टोपल्यांत चामडे आणि दोर ठेवून वधू-वरांना समोरासमोर बसवलं जात असे आणि मधे अंतरपाट धरला जात असे (भारतीय संस्कृतिकोश खंड सातवा-पान २६७). दारिद्र्य संपवण्यासाठी 'दे दान सुटे गिरान' किंवा 'आवस वाढ गं बाई' असं म्हणत भीक मागितली जाई; याचा अर्थ 'अंधार वाढ' असाच होतो. म्हणजे आहे रे वर्गाने भाकरीच्या मोबदल्यात मातंगांना अंधार द्यायचा आणि स्वत: उजेड टिकवून ठेवायचा. जगण्याच्या विवंचनेतूनच त्यांना मंत्र, जादूटोणा, पिशाच, भूत यावर विश्वास ठेवावा लागला. या साऱ्यांचं एक स्वतंत्र जग तयार झालं आणि मुख्य जग (समाज) त्यांची पिळवणूक करतच राहिलं. मातंगांनी आपली-आपली सर्व प्रकारची संस्कृती तयार केली. मुख्य समाजातील दोन लोक परस्परांना भेटले की राम राम, नमस्कार म्हणतात. महार जोहार म्हणायचे आणि जोहार घालायचेही. मातंग परस्परांना भेटले की, 'फर्मान' म्हणायचे आणि अन्य जातीतला कोणी भेटला की, त्याला महाराजा म्हणायचे. फर्मान म्हणण्यामागे अर्थ आहे. मातंगांना जेव्हा गुन्हेगार जातीच्या यादीत घातलं गेलं, तेव्हापासून गाव आणि सरकार त्यांना छळण्यासाठी रोज काही तरी (आदेश) काढायचे. त्यामुळे गुन्हेगार ठरवल्या गेलेल्या सर्वच जातींचं जीवन भयप्रद आणि असुरक्षित बनायचं. फर्मान कधीही आणि कोणतंही निघणार याविषयी खात्री झाली होती.

त्यातूनच दोन लोक परस्परांना भेटले की उत्सुकतेने म्हणायचे- फर्मान! म्हणजे आणखी काय निघालं आहे काय? विशेष म्हणजे, मातंगांमधील टोळीचा नायकही फर्मान काढायचा किंवा सोडायचा.

भारतीय धर्मव्यवस्था, जातव्यवस्था अनेक अस्पृश्य जातींना तर छळतच होती, पण इंग्रजांनीही काही जातींना गुन्हेगार ठरवून १८७१ मध्ये गुन्हेगार जमाती कायदा केला. (Criminal Tribes Act म्हणजेच CTA) या कायद्यानुसार गुन्हेगार ठरवल्या गेलेल्या जातीतील कुणीही जन्माला येणारा हा गुन्हेगार म्हणजे जन्मजात गुन्हेगारच असतो. आयुष्यभर त्याला गुन्हेगार म्हणूनच राहावं लागतं. अशा व्यक्तीला गावचा कारभारी सांगेल तेव्हा हजेरी देण्यास जायचं असतं. एका गावातून दुसऱ्या गावात स्थलांतर करताना दोन्ही गावच्या कारभाऱ्यांची परवानगी आवश्यक ठरवली गेली. नियमांचं पालन न केल्यास दंड व तुरुंगवास अशी शिक्षा होती. तीन वर्षं तुरुंगवास आणि पाचशे रुपये दंड अशी ती शिक्षा होती. एकशे चाळीस वर्षांपूर्वी पाचशे रुपयांची किंमत किती असेल आणि एवढा पैसा जमवण्यासाठी काय आणि कसं करावं लागत असेल याची कल्पना केलेली बरी. गुन्हेगार वसाहत कायदा १९०८ मध्ये झाला. दहा वर्षांवरील सर्व व्यक्ती गुन्हेगार म्हणून १९११ मध्ये नोंदवण्यात आल्या. मग तारांच्या कुंपणाची निर्मिती झाली. मातंगासह बेरड, राजपूत भामटा, टकारी भामटा, बावरी, भट पाशी, भिल्ल, छप्परबंद, कोळी, लमाणी, मारवाड बावरी, मीना, उधिया, पावरी, रामोशी, सॉसिया, तडवी, वंजारी, वडार, बागडी वाघरी यांचा समावेश आहे. या कायद्याविरुद्ध दीर्घ काळ लढा दिला तो कम्युनिस्टांनी आणि तो तमिळनाडूत. कम्युनिस्ट पक्ष भारतात १९२५ ला आला आणि १९२९ पासून पी.राममूर्ती आणि पी. जीवनानंदम यांनी आंदोलन केले. फॉरवर्ड ब्लॉकचे नेते यू.मथुरालिंगम थेवरही त्यात होते. मातंगासह एकूणच गुन्हेगार जातींच्या मुक्ततेसाठी पहिली लढाई कम्युनिस्टांनी केली, हे मान्य करणे इतरांना अवघड जात असलं, तरी ते वास्तव आहे. या साऱ्यांची या कायद्यातून १९५२ मध्ये मुक्तता झाली. या कायद्याच्या कचाट्यात अडकलेल्यांची लोकसंख्या होती २२ लाख ६८ हजार (विमुक्तायण- लक्ष्मण माने). कायदा संपला, पण त्यानं निर्माण केलेली गडद छाया संपण्यास अजून किती कालावधी लागणार आहे, हे ठाऊक नाही.

अण्णा भाऊंचा जन्म १९२० चा. त्या अगोदर दहाच वर्षे गुन्हेगार कायद्यात बदल होऊन तो १९११ मध्ये अधिक कडक करण्यात आला होता. याचा एक अर्थ असाही होतो की, अण्णा भाऊंचे पणजोबा (१८१८-१८७२) राघोबा साठे यांच्या हयातीत हा कायदा आला. अण्णा भाऊंचे आजोबा सिंधोजी साठे (१८४१ ते १८९९) यांच्या काळात तो अधिक कडक झाला. भाऊ साठे (१८७२ ते १९३९) म्हणजे तुकाराम ऊर्फ अण्णांच्या वडिलांच्या काळात तो चालूच राहिला आणि अण्णा भाऊ (१९२० ते १९६९) यांच्या निधनाच्या फक्त १७ वर्षं अगोदर तो संपला. (अण्णा भाऊंची वंशावळ- डॉ.विमलकुमार देशमुख) याचा आणखी एक अर्थ असा होतो की, जन्मजात गुन्हेगार असा जो शिक्का इंग्रजांनी अन्य काही जातींसह मातंग समाजाच्या

अण्णा भाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० या दिवसाचा, असं गृहीत धरण्यात आलं आहे. त्यांच्या जन्माच्या कागदोपत्री नोंदी कुठं कुणाला अद्याप सापडलेल्या नाहीत. शूद्रांच्या जन्माची नोंदणी त्या काळात पद्धतशीरपणे होत असेल, असं मानता येत नाही. अण्णा भाऊंचं गाव वाटेगाव त्या वेळी कुरुंदवाडच्या पटवर्धन संस्थानात होतं. भालचंद्रराव अण्णासाहेब संस्थानिक होते. नंतर ते सातारा जिल्ह्यात आणि सध्या सांगली जिल्ह्यात आहे. अण्णा भाऊंच्या जन्माची आणि दिवस यांची आठवण त्यांच्या मातोश्री वालुबाई (माहेर तळसंदे, तालुका हातकणंगले, जि.कोल्हापूर) यांनी सांगितली. अण्णा भाऊंचा जन्म ज्या दिवशी झाला, त्याच दिवशी देशातील एका खूप मोठ्या माणसाचं निधन झालं, असं वालुबाईंनी सांगितलं. तो मोठा माणूस म्हणजे लोकमान्य टिळक. ही सर्व माहिती पडताळून जन्मतारीख सर्वमान्य करण्यात आली.

कपाळावर कोरला, तो अण्णा भाऊंच्या तीन पिढ्यांपर्यंत राहिला. अण्णा भाऊंचे प्रारंभिक आयुष्यही याच शिक्क्याच्या सावलीत गेलं असणार. एक अखंड वाहणारी, भळभळणारी वेदनायुक्त जखम अनेक जातींच्या वाट्याला आली. शिक्का मारला जात असताना माणसाचं भविष्य त्याच्या कपाळावर कोरणारी आणि मातंगाकडून पुजली जाणारी सटवाई कुठं होती अन् काय करत होती, कुणाला ठाऊक! करवीरच्या राजर्षी शाहूमहाराजांनी एक ऑगस्ट १९१८ ला हजेरी बंद केली होती. माणगावमधील बहिष्कृत वर्गाच्या परिषदेअगोदर दोन वर्षे हजेरी बंद करणे किती महत्त्वाचे होते आणि त्याचे चांगले परिणाम काय झाले, हेही महाराजांनी परिषदेत केलेल्या भाषणात सांगितले होते. इतरत्र मात्र वीस लाखांहून अधिक लोक जन्मजात गुन्हेगार या कायद्याच्या प्रभावाखाली होते. स्वअस्तित्व, ओळख, प्रतिष्ठा, माणूस म्हणून असणारी मान्यता, आत्मसन्मान.. सारं-सारं काही यांनी गमावलं होतं. जे कायद्याच्या बाहेर पण अस्पृश्य जातीत होते, त्यांच्याही या साऱ्या गोष्टी जातव्यवस्थेनं आणि तिचा जन्मदाता मनूनं हिसकावून घेतल्या होत्या. म्हणजे हा सगळा नंगा केलेला, नाही रे बनलेला, बहिष्कृत, अस्पृश्य, दलित वगैरे बनवला गेलेला समाज प्रथमच मोठ्या प्रमाणात अण्णा भाऊंच्या साहित्यात नायक बनला. त्यांचं साहित्य भरून तो पावला.

अण्णा भाऊंच्या साहित्याकडं, चळवळीतील त्यांच्या कर्तृत्वाकडे आणि त्यांच्या अन्य चळवळीकडे जाण्यापूर्वी हे सारं सांगण्याचं कारण आपल्याला दि.के. बेडेकर यांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्येतही सापडतं. कोणतीही कलाकृती (अर्थात अस्सल) कलावंताच्या (सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या आणि माणूसकेंद्री असणाऱ्या) व्यक्तिमत्त्वातून (जे जीवनानुभवातून घडते) निघाली (जन्माला आली) असल्यामुळे कलावंतांच्या सभोवारच्या सामाजिक वास्तवाच्या व त्याच्या वर्गीय भूमिकेच्या गुण-दोषांपासून ती अलिप्त नसते (कंसातील शब्द माझे). अर्थात ही मार्क्सवादी व्याख्या आहे, हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. बेडेकरांनी अण्णा भाऊंच्या साहित्याचं विश्लेषण करतानाही ही व्याख्या वापरली असती, तर ती तंतोतंत खरी ठरली असती.

तर, अण्णा भाऊंचा जन्म झाला तो अशा एका जातीत आणि अशा एका परिस्थितीत. अण्णा भाऊ वाटेगाव सोडून मुंबईकडं जगण्यासाठी निघाले होते. ते वयाच्या कोणत्या वर्षी मुंबईला निघाले आणि किती दिवसांत पोहोचले, याविषयी अनेकांनी दंतकथा रचण्याचा प्रयत्न चालवला असला तरी अण्णा भाऊंनीच त्याचं उत्तर 'माझा रशियाचा प्रवास' या लेखात देऊन ठेवलं आहे. त्यांच्या मते, ते वयाच्या ११ व्या वर्षी म्हणजे १९३१ ला निघाले. कुटुंबासोबत ते निघाले. वाटेगाव ते मुंबई हा त्यांचा प्रवासही अनेकांनी वेगवेगळ्या कल्पना लढवून भरलेला आहे. २२७ मैलांचा प्रवास करण्यास आणि मुंबई गाठण्यास मला दोन महिने लागले होते, असे अण्णा भाऊंनीच लिहून ठेवलं आहे. अण्णा भाऊ दीड-दोन दिवसच शाळेत गेले आणि परत त्यांनी शाळेचं तोंडच पाहिलं नाही, हे खरं मानलं तरी, त्याबाबतचे ठोस पुरावे आणि कागदपत्रे कोणी उपलब्ध करून देत नाही. कदाचित पुढे ती उपलब्ध होतील, अशी आशा बाळगायला जागा आहे. पण दरम्यानच्या काळात तयार होणाऱ्या मिथकांपासून थोडे सावधच राहायला हवं. अण्णा भाऊ म्हणतात की- मी दोन दिवस शाळेत गेलो; तर काही जण म्हणतात की, ते दुसरीपर्यंत शिकले (म्हणजे दोन वर्षे शिकले). आणखी काही जण म्हणतात की, ते सातवीपर्यंत (व्हर्नाक्युलर) शिकले. संशोधकांत आणि चाहत्यांमध्ये अजून तरी ताळमेळ नाही. असाच वाद अण्णा भाऊंच्या साहित्यविषयक प्रेरणांविषयीही आहे. साहित्याच्या गाभातत्त्वाविषयीही आहे. काही जण त्यांना मानवतावादी साहित्यिक म्हणतात; काही जण बहुजनवादी, काही जण ग्रामीण, काही जण कामगार, काही जण तिसऱ्या जगाचे. तर काही जण (डॉ.बाबूराव अंभोरे) दलित साहित्याचं नायकत्व अण्णा भाऊंकडे जातं, असं म्हणतात. पण पॉइंट मिळवण्यासाठी होणाऱ्या यांच्या-यांच्याच चर्चा हाच आधार मानला जातो.

अण्णा भाऊंचे साहित्य मार्क्सवादी की आंबेडकरवादी, असा खडा सवाल तयार झाल्यास 'मार्क्सवादी' असंच उत्तर द्यायला हवं. ते मान्य होईल की नाही, याचा विचार करू नये. कारण कोणी तरी मान्य करावं यासाठी हे उत्तर नाहीये, तर ते वास्तव आहे. पण या वास्तवापासून दूर जाण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. गम्मत म्हणजे, अण्णा भाऊ स्वतःच्या साहित्याच्या प्रेरणा काय सांगतात, साहित्याचे प्रयोजन काय सांगतात, वरील मार्क्सवादाचा परिणाम कोणत्या शब्दांत सांगतात- हेही अण्णा भाऊंना या ना त्या तंबूत ओढणारे पाहत नाहीत. अण्णा भाऊ आज असते तर हे सारं पाहून हसले असते आणि 'काही करा पण मला माणसाबाहेर काढू

नका, मार्क्सवादाबाहेर काढू नका' असं त्यांनी म्हटलं असतं. बरं झालं मी सारं काही लिहिलं, 'पण पेपर वाचला नाही' असंही सांगितलं असतं. तर अण्णा भाऊ साहित्याविषयी, त्यांच्या भूमिकेविषयी, त्यांनी स्वीकारलेल्या वादाविषयी (इझमविषयी) काय म्हणतात– हे सर्वप्रथम पाहू.

१) मी आणि माझा पिंड (व्यक्तिमत्त्व) कामगार–वर्गानं घडवला आहे. सांचा (यंत्रमागातला) सोडून मी आता साहित्याकडे वळलो आहे. म्हणजे मी माझ्या वर्गाशी (साम्यवादी वर्ग) जे जुळेल ते लिहिणार, हे आता क्रमप्राप्त आहे. आता लिहिणं हा माझा धर्म आहे आणि तेच माझं कर्म झालं आहे. ('युगांतर'मधील अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, पान ३३).

२) मी माझ्या जनतेचा उपमर्द होऊ नये याची काळजी घेऊन लिहितो. जनतेच्या संघर्षावर माझा विश्वास आहे. ती जनता अमर आणि तिचा ध्वज अजय आहे. (उपरोक्त ग्रंथ, पान ३४).

३) अनुभूतीनं लिहितेवेळी ज्याच्याविषयी लिहितो त्याच्याविषयी दृढ सहानुभूती हवी, नाही तर तुमचं साहित्य विसंगतीच्या डोहात बुडेल. (उपरोक्त, पान ३४).

४) प्रचलित वास्तवतेचा (आणि पूर्व वास्तवतेचाही) डोळे झाकून वापर करता येणार नाही. कामगारवर्गीय लेखकाला तर तसं मुळीच करता येणार नाही. (उपरोक्त, पान ३४).

५) माझे साहित्यिक मित्र विचारतात की, कसं लिहावं? कसं पुढं जावं? मी म्हणतो, त्या लेकरांच्या अंतरंगात जा आणि त्याच्या आत्म्याला विचारा, त्यांच्याशी तद्रूप (तादाम्य) होऊन लिहा. (उपरोक्त, ३५).

६) जे सगुण आणि साकार आहे. तेच मी लिहितो. (उपरोक्त, ३५).

७) अज्ञान, अत्याचार नि दारिद्र्य यांच्याद्वारे अंधकारातही श्रमजीवी जनता जगण्यासाठी शिकस्तीने प्रयत्न करत आहे, हे मी जवळून पाहतो. निरीक्षण करतो आणि मग लिहितो. (उपरोक्त, ३६)













८) जनता अमर आहे. तिचा विजय अंतिम आहे. हे सारे विश्व तिच्या हातावर तरले आहे याची स्पष्ट कल्पना मला माझ्या कम्युनिस्ट पक्षानं दिली आहे. ती माझ्या जनतेला लागणारी सामग्री पुरवते. (उपरोक्त, ३८)

९) जर ध्येयवादी कल्पकतेची काठी वास्तवतेच्या हातात नसेल, तर ही आंधळी वास्तवता लेखकाला खेड्याकडे (वेगळीकडे) नेल्याशिवाय राहणार आहे. (उपरोक्त, ३८).

१०) काही साहित्यिक माझ्यावर प्रचारकी असा आरोप करतात. त्यांच्या मते, कला प्रचारकी नसावी, ती वर्गातील आणि राजकारणातील सर्वोदयवादी असावी. परंतु जेव्हा कलेसाठी कला या मताचा बोजवारा उडाला, तेव्हा त्या मताच्या रक्षणकर्त्यांनी आपल्या जुन्याच मालाला वरील लेबले लावली आहेत. कलेत प्रचार नसतो आणि प्रचारकी कला कलापूर्ण नसते, हे त्यांचे म्हणणे मला पटत नाही. आजपर्यंतच्या सर्व वाङ्मयाने कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा प्रचारच केला आहे आणि ही गोष्ट ते दडवत आहेत. देवल, खाडिलकर, वरेरकर आणि आचार्य अत्रे यांच्या प्रभितेनं प्रचारच केला आहे. (उपरोक्त, ३९)

११) सामान्य वाचक हाच लेखकाची कसोटी ठरवतो, कारण तो क्रियाशील समाजात राहतो. लेखक जे चित्र चित्रित करतो ते त्याच्या परिचयाचे नसेल, तर तो तसे स्पष्ट सांगून टाकतो. (उपरोक्त, ४०).

१२) मी आजपर्यंत आपल्या (माझ्या) ज्या व्यक्ती राबवल्या, त्यापैकी जवळजवळ सर्व हयात आहेत. त्यांना मी फार भितो, कारण ती जिवंत माणसं आहेत. जेव्हा मी आपल्या (माझ्या) गावी जातो, तेव्हा 'कोंबडीचोर'चा नायक भेटतो. नातलगाप्रमाणे तो माझी विचारपूस करतो. 'माझ्या आईचा गाडा' या कथेचा नायक आज महाराष्ट्राचा आत्मा झाला आहे. (उपरोक्त, ३९).

१३) प्रतिभेला जशी वास्तवाची गरज भासते, तसेच कल्पनेलाही जीवनाचे पंख असणे आवश्यक असते. अनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल, तर आपण का लिहितो याचा पत्ताच लागत नाही. (उपरोक्त, ४०).

१४) जे पाहिलं, अनुभवलं आणि ऐकलं तेच मी लिहिलं आहे. त्यातून हा 'फकिरा' निर्माण झाला आहे. डोंगरात नि त्याच्या पायथ्याला विखुरलेलं फकिराचं कर्तृत्व एकत्र करून मी इमला उभारला, एवढेच. (उपरोक्त, ४१).

१५) फकिरा माझा होता. (काही संशोधक खुशाल म्हणतात की, तो अण्णा भाऊंचा मामा होता. असो) त्याच्या कर्तृत्वाचा पसारा आवरून मी कादंबरी लिहिली. (उपरोक्त, ४१).

'हवं ते लिहितो', 'मी कथा कशा लिहितो' आणि 'अण्णा भाऊंची कैफियत' या तीन छोटेखानी लेखांतून अण्णा भाऊंनी स्वतःच स्वतःच्या लेखनाच्या प्रेरणा, साहित्याचे प्रयोजन, परिणाम सांगितला आहे. भोवतालचं वास्तव, त्यातील घुसमट, त्यातील विचारव्यवहार, वर्तन-व्यवहार हेच अण्णा भाऊंच्या साहित्याचं गाभातत्त्व बनलं आहे. या सर्व भोवतालाला बदलायचं आहे, तेही मार्क्स आणि तेही कम्युनिस्ट पक्ष घेऊन- हे त्यांनी स्पष्टपणे सांगितलं आहे.

अण्णा भाऊंच्या पूर्वी असलेला किंवा उगवतीचा एकूण भोवताल अतिशय तप्त होता. त्याला कारणंही होती. राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा अनेक कारणांनी भोवताल ढवळून निघत होता. १९२०-३० च्या दरम्यान स्वातंत्र्यलढ्याची चळवळ खूपच तापली. अण्णा भाऊंच्या अगोदर दहा वर्षे (१९१० मध्ये) जन्मास आलेले क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढे चालू होते. कायदेभंग चळवळ १९३० ला सुरू झाली. त्या वेळी अण्णा भाऊ दहा वर्षांचे होते. ते बावीस वर्षांचे झाल्यावर लिहू लागले, तेव्हा सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार (पत्री सरकार) कॉ.नाना पाटलांनी स्थापन केले. नाना पाटील जणू काही सातारा जिल्ह्याच घेऊन कम्युनिस्ट झाले होते. १५०० गावांत हे सरकार होते. नाना पाटील भूमिगत होते. या काळातच आगे-मागे क्रांतिकारकांची एक फौजच तयार झाली. महात्मा फुले यांचा सत्यशोधक विचार आणि शाहूमहाराज यांचे क्रांतिकारी कायदे यांचाही या चळवळीवर परिणाम होता. हुतात्मा किसन आहेर, नागनाथ नायकवडी, रामचंद्र सकाराम पवार, तुफान सेनेचे जी.डी.बापू लाड, लाड गुरुजी, नाथाजी लाड, हौसाबाई लाड, निवृत्ती कुंभार, विजयाताई लाड, खाशाबा पवार, आत्माराम पवार, विष्णू बाळा (त्या वेळचा एक फकिरा मानला जाणारा) असे अनेक नेते-कार्यकर्ते पेटून उठले होते. स्वातंत्र्य चळवळीबरोबरच समाजबदलाचा विचार जो मार्क्स, फुले, शाहू यांच्याकडून आला होता, तोही अनेकांनी स्वीकारला होता. मार्क्स घेऊनच शेतकरी कामगार पक्ष जन्माला आला होता. १९२० ते १९३० या काळात म्हणजे १९२५ नंतर अण्णा भाऊंच्या राजकीय पर्यावरणातील अनेक जण लाल बावटेवाले झाले

होते. सत्यशोधकही झाले होते. कलाक्षेत्रालाही असाच बहर आला होता. विशेषतः तमाशे, जलसे यांनीही हा काळ भारावलेला होता. सत्यशोधक जलसे, शाहू जलसे यांच्या विरोधात १९२० पूर्वी पुण्यात टिळक जलसेही सुरू होते. रामा कुंभार वर्धनगडकर, भाऊ बापू मांग, नंतर आलेले काळू-बाळू कवलापूरकर (सध्या सांगली जिल्ह्यात), पवळाबाई, यल्लाप्पा कदम, गुलाब बोरगावकर, जयवंत साळसेकर, अमर शेख अशी एक मोठी साखळी तयार झाली होती. ग्रामीण भागातील माणसाला (ज्या माणसाचा अण्णा भाऊ सातत्याने उल्लेख करतात) जागं करणं म्हणजे त्याचा स्वाभिमान व आत्मसन्मान जागा करून त्याला चळवळीत आणणं हे सूत्र वापरलं जात होतं. नाना पाटलांना आयुष्यही खूप लाभले. त्यांच्या सर्व क्रांतिकारी चळवळी अण्णा भाऊ पाहत होते. नाना पाटील यांचे निधन अण्णा भाऊंनंतर सात वर्षांनी म्हणजे १९७६ ला झालं आहे. आपल्या समकालीन आणि पूर्वी जन्माला आलेल्या कलावंताशी या ना त्या कारणाने अण्णा भाऊंचाही संबंध आलेला होता. धगधगत्या पर्यावरणातून आलेले धगधगते लोक, धगधगते विचार यांनी अण्णा भाऊंचे साहित्य भरून गेलं. 'मला केवळ कल्पना करून लिहिण्याची गरज कधीच भासली नाही' असे अण्णा भाऊ वारंवार म्हणतात ते याच कारणामुळे. परिस्थिती केवळ माणसालाच नव्हे तर त्याच्या कल्पनांनाही घडवत असते, संघर्षतत्त्व देत असते- असे पुन्हा एकदा आपल्याला म्हणता येईल.

अण्णा भाऊंनी स्वतःतील मार्क्स, कम्युनिस्ट, साम्यवाद स्वतःच अनेक वेळा लिहून-बोलून मोठ्या आनंदानं आणि आत्मविश्वासानं व्यक्त केला आहे. त्यांचे कम्युनिस्ट होणे हा काही अपघात नसावा. त्यांच्या पर्यावरणातल्या साम्यवादानंच त्यांना कम्युनिस्ट पक्षाकडे नेलेलं असावं. अण्णा भाऊ मुंबईत गेले तेव्हा मुंबई लाल बावट्यांनी भरली होती. जगण्यासाठी आलेले सर्व श्रमिक लाल बावटा घेऊनच जगत होते. कामगार नेता म्हणून डॉ. बाबासाहेबांचा उदय होईपर्यंत हे असेच चित्र राहिले. नंतरही ते असेच दिसत होते. एखादा श्रमिक कम्युनिस्ट झाला, यात आश्चर्य कसले? या पक्षाशी व त्यांच्या नेत्यांशी कसे घनिष्ठ आणि एका अर्थाने जैविक संबंध तयार झाले होते, हे 'धुरंदर डांगे' या कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे यांच्यावरील लेखात अण्णा भाऊ म्हणतात की, मी माझ्या आयुष्यात प्रथमतः ज्या दिवशी कॉम्रेड डांगे यांचे नाव ऐकलं, त्या दिवशी कामगारवर्गासाठी सर्वस्व पणाला लावून कसं लढावं याचा साक्षात्कार घडला आणि त्यानंतर किती तरी वर्षांनी मी प्रत्यक्षात कॉम्रेड डांगे यांना पाहिलं. परंतु त्याही वेळेला मी विस्मयचकित झालो. कामगारवर्गाची रणनीती, जनतेचा झुंजार अग्रणी, त्यामागचे धडधडते कुंड, पोलादी निर्धार या साऱ्यांचं दर्शन होऊन माझ्या जीवनाला भर्रकन एक वेगळं वळण लागलं. त्यांच्या एका भाषणात मी ऐकलं. ते म्हणाले होते : तुम्ही जनतेशी एकनिष्ठ राहा, तिच्या भावना समजून घ्या आणि मग लिहा. तिला (जनतेला) विद्रूप करू नका. जो कलावंत जनतेकडं पाठ फिरवतो, त्याच्याकडं कला पाठ फिरवते.

कॉम्रेड डांगे यांचे हे भाषण १९४२ मधलं आहे आणि अण्णा भाऊ तेव्हा बावीस वर्षांचे असावेत. त्यांच्या लेखनप्रवासाला थोड्याफार प्रमाणात प्रारंभ झाला होता. 'जनतेला विद्रूप करू नका' हे कॉम्रेड डांगे यांचे वाक्य माझ्या मनात खोलवर रुजलं. जनता सर्वशक्तिमान आहे. ती आपले कलावंत निर्माण करेल, असे सांगतच कॉम्रेड डांगे यांनी स्टालिनग्राडच्या लढ्याचा उल्लेख केला. तो एका कामगाराला (म्हणजे अण्णा भाऊंना) स्फूर्ती देऊ शकला. सतराव्या शतकात लुप्त झालेला पोवाडा आता पुन्हा अवतरला आहे.

अण्णा भाऊंनी हा स्टालिनग्राडवरचा पोवाडा लिहिला होता, हे वेगळं सांगण्याची गरज नाही. पण अण्णा भाऊ त्यापुढे जे म्हणतात, ते आणखी महत्त्वाचं आहे. कॉम्रेड डांगे यांच्या भाषणामुळे महाराष्ट्रातील जनतानिष्ठ शाहिरांचं भरघोस पीक आलं. नवे शाहीर निर्माण झाले. त्यांनी महाराष्ट्राला नवी शाहिरी ऐकवली. कॉम्रेड डांगे यांची भविष्यवाणी खरी ठरली. आता या सर्व गोष्टींचा अर्थ कसा समजावून घ्यायचा? साहित्यलेखनावर कशाकशाचा परिणाम होतो, हे नीट समजून घ्यायचं की नाही? जीवनाच्या सर्वच वाटा-वळणांवर अण्णा भाऊ स्वतःतील साम्यवाद, कम्युनिस्ट जागा करतात. तो अभिमानानं मांडतात. हे सर्व अमान्य करून की काय, काही जण अण्णा भाऊंचे जहाज बदलण्याचा प्रयत्न करतात.

आता आणखी एक प्रश्न आहे, पण तो अभ्यासकांनीच उपस्थित करायला हवा. भारतीय समाज वर्षानुवर्षे जातीत अडकला आहे. तो जगतो जातीत आणि लिहितोही जातीत. भारतीय साहित्य लिहिणाऱ्या बहुसंख्य लेखकांच्या साहित्यात त्यांच्या-त्यांच्या जातीचेच नायक-नायिका येतात. अर्थात याला काही सन्माननीय अपवाद आहेत. ते

नामवंत आहेत. पण सामान्यपणे घडतं ते असं. काही वेळेला उच्चवर्णीय लेखक आपल्या साहित्यात अस्पृश्यांचं अस्तित्व दाखवतात, नाही असं नाही. पण ते कशा स्वरूपाचं असतं? कोणी तरी एक मजूर, बलुतेदार, सहानुभूतीचा हकदार किंवा खलनायक– अशा स्वरूपाचं ते असतं. आपल्या जातीबाहेरचा नायक भारतीय साहित्यात खूप कमी येतो, हेही एक वास्तव आहे. यालाही अपवाद वगळता बहुतेक सर्व जाती–लेखकांचं असंच घडत आलं आहे. अण्णा भाऊंच्या काळात आगे–मागे असे मोजकेच लेखक होते की, त्यांच्या साहित्यातले नायक त्यांच्या जातीपलीकडचे होते. तेही पिळवणुकीचे धनी होते. जातीनं तयार केलेल्या विषमतेचेही धनी होते. या साहित्यिकांमध्ये आपल्याला बाबूराव बागुल, शंकरराव खरात, नारायण सुर्वे पुढे नामदेव ढसाळ आणि अण्णा भाऊ यांची नावे घेता येतात. जाती तोडून हे पुढं का गेले, आणि आपले नायक त्यांनी अन्य जातींतूनही का उभे केले? याचा अर्थ असा नव्हे की, या लेखकाच्या साहित्यात स्वजातीय नायक आलाच नाही. तो आला, पण कमी प्रमाणात. अण्णा भाऊंनी स्वतःच उल्लेख केल्यानं तो माटे गुरुजींच्या लेखनात आला, पण त्यामागचं कारण वेगळं होतं. विचारसंघर्ष याऐवजी ते सहानुभूतीत होते. तर या चौघांबरोबरच अन्य काही नावं घेता येणे शक्य आहे, पण ती मर्यादित आहेत. हे असं का घडतं याचं उत्तर म्हणजे, साम्यवादी विचारधारेचीच माणसेच असे करू शकतात. ती जातीऐवजी वर्गाचा आणि त्यातील दुःखाचा अधिक विचार करतात. दुःख आपल्या जातीत जसं आहे तसं ते मोठ्या वर्गातही आहे, असे ते मानतात. बाबूराव बागूल बरीच वर्षे मार्क्सवादी होते, हे लपवण्यात काही अर्थ नाही. सुर्वे शेवटपर्यंत मार्क्सवादी होते हे त्यांनी आणि इतरांनीही लपवलेलं नाही. नामदेव ढसाळांवरही साम्यवादाचा– समाजवादाचा परिणाम होता, हे त्यांनीही लपवलेले नाही आणि अण्णा भाऊंनी तर नाहीच नाही. जो कामगार असतो तो विश्वव्यापी असतो, असं बाबूराव बागुल यांनीही म्हटलं आहे.

कॉम्रेड डांगे यांनी तर 'शाहीर' या अण्णा भाऊंच्या पुस्तकासाठीच्या प्रस्तावनेत बऱ्याच गोष्टी स्पष्ट केल्या आहेत. खरं तर या गोष्टी अण्णा भाऊंनीही स्पष्ट केल्या होत्या, हे आलंच आहे. तर कॉम्रेड डांगे म्हणतात : आमच्या लेखकांची कृती प्रचारकी आहे व तिच्यात वर्गीय दृष्टिकोन आहे. हे खरे आहे, आणि हा जर आरोप असेल, तर आम्ही 'गुन्हेगार' आहोत. पण कुणाच्या दृष्टीने गुन्हेगार? कोणाचा गुन्हा आम्ही करतो? आमच्या काव्यावर व साहित्यावर एका बाजूने पोलिसी हल्ले होऊ लागले, तर दुसऱ्या बाजूने केवळ कलात्मक चर्चेचा आविर्भाव करून टीकाकार सूक्ष्म व मानसिक हल्ले करू लागले. त्यांच्याकडूनच वरील आरोप येतात.

कॉम्रेड डांगे पुढे म्हणतात की, आमच्या कलावंतांची वर्गीय दृष्टी वर्गीय असते व असली पाहिजे.

ते आणखी म्हणतात, अण्णा भाऊंच्या काव्यामध्ये कामगार–शेतकरी वर्गाची दृष्टी असते. त्यांचे लढे, त्यांची सुख–दुःखे आहेत. मुंबईचा गिरणी कामगार, तेलंगणाचा शेतकरी वगैरे पोवाड्यांमध्ये ही वर्गदृष्टी तर अगदी उघड आणि स्पष्ट आहे. आमच्या कविता आपल्या वर्गाचा, मराठी भाषेचा, महाराष्ट्राचा, हिंदुस्थानचाही अभिमान आहे. अण्णा भाऊंच्या काव्यात हे स्पष्ट दिसते.

अण्णा भाऊंचे एक अभ्यासक आणि चाहते डॉ.एस.एस. भोसले मात्र अण्णा भाऊंमधील साम्यवाद आणि त्यांचे साहित्य या दोन वेगळ्या गोष्टी ठरवतात. प्रातिनिधिक कथा या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, अण्णा भाऊंच्या मनात साम्यवादाची जाज्वल्य निष्ठा होती. पण त्याचा अर्थ लेखनात धूळ, लाल टापा, लाल माती असे सारे लालेलाल नव्हते. उरात सदैव समाजवादाची आच होती. पण त्यात सारखे साम्यवादी बाळबोध धडेच भरविले गेले, असे नाही. कलात्म आणि प्रचारात्मक असे अण्णा भाऊंनी लेखनाचे दोन प्रांत केले. शक्यतो सीमारेषा जपल्या. एस.एस. भोसले येथे दोन्ही दरडींवर दोन्ही हातांत दोन लेखण्या घेऊन उभे असलेले दिसतात. साम्यवादाविषयी ते प्रेमही व्यक्त करतात आणि त्याला बाळबोध धडेही म्हणतात. वि.स. खांडेकर यांनी 'फकिरा'विषयी लिहिताना अण्णा भाऊंना भूतकाळाला चिकटून न राहण्याचा सल्ला दिलेला आहे. आता भूतकाळ सोडून दिल्यावर मार्क्सवादात काय शिल्लक राहिलं, हे मात्र ते सांगत नाहीत.

'हे जग, ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नसून दलितांच्या तळहातावर तरली आहे', असे १९५८ मध्ये दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी अण्णा भाऊंनी सांगितले आहे. अनेक वर्षे ही पृथ्वी देवाच्या मालकीची होती. खरं तर हाही एक बनावच होता. पृथ्वी कोणा सापाच्या मस्तकावर असत नाही, तर ती कष्ट करणाऱ्यांच्या हातावर असते. हे हातच तेथे विकास घडवत असतात. मार्क्सवादाचे हेही एक मूलतत्त्व

आहे. आता प्रश्न आहे तो हे अण्णा भाऊंचे विवेचन कोणत्या वादात बसवायचं? इथेही त्यांनी कोण काय लिहितं आणि लिहावं, याविषयी विवेचन केले आहे. 'जो कलावंत जनतेबरोबर नसतो, त्यांची बंद खोलीतील कला मांडीवरच्या खुणा मोजते. मांडीवरच्या खुणा मोजणारी दलितांची कला नसते. डमडम गोळीच्या खुणा मोजते, ती आमची कला. कला वर्गातीत-प्रचारातीत असावी, असा त्यांचा दावा असतो आणि अशा या कलावंतांचा आज बोलबालाही कमी नाही. परंतु जो जनतेला जाणत नाही, तो तिला विद्रूप करतो याचे नमुने मराठी साहित्यात मुबलक मिळतात. शब्दाला नुसता आकार देणे सोपे असते, पण आकाराला आत्मा देणे अवघड असते- असे सांगत अण्णा भाऊंनी गॉर्कीच्या एका विचारावर आपले भाषण पूर्ण केले होते. माणसाला सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्त करून 'तू गुलाम नाहीस, तू वास्तव जगाचा धनी आहेस, तू जीवनाचा स्वतंत्र निर्माता आहेस' असा साक्षात्कार त्याला करून देणे, हे साहित्याचं खरे वैशिष्ट्य आहे. या अर्थाने वाङ्मय सदैव क्रांतिकारक असते.

आता पुन्हा तो प्रश्न निर्माण होतो की, हे वाक्य कोणत्या वादात (इझममध्ये) बसवायचं?

एक विषय मधेच राहिला, तो म्हणजे साहित्यातील नायकाचा. साम्यवादी माणूस सर्वप्रथम डी-कास्ट म्हणजे जातिहीन होतो. जाती फेकून देतो. देव-धर्माच्या कल्पनाही फेकून देतो. त्याच्यासमोर राहतो तो माणूस! अण्णा भाऊंच्या स्वतंत्र लेखनात, भाषणात आणि साहित्यात हा शब्द एक लाखापेक्षा अधिक वेळा आला आहे. जाती-धर्माच्या गराड्याखाली अडकलेला माणूस मुक्त करून अण्णा भाऊ त्याला वर्गात नेऊ पाहतात. त्यांच्यातला माणूसच पाहतात. मातंगापेक्षा अधिक वाईट जिणे असलेल्या अनेक जातींतल्या माणसांना ते मोकळे करून त्यांना माणूसपदाकडे नेण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी आपल्या लेखनाचा पट (कॅनव्हास) खूप म्हणजे खूप मोठा करतात. जगातल्या माणसाच्या चळवळींना तर तिथे जागा देतातच; पण चेहरा गमावलेल्या किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे ब्रोकन मॅनला म्हणजे तुकड्या-तुकड्यांत उद्ध्वस्त झालेल्या अनेक जातींनाही या पटावर नायकाचे, नायिकेचे, लढाऊ, कर्तबगार, प्रश्नकर्त्याचे स्थान देतात. 'अण्णा भाऊंच्या साहित्यात किती जाती झळकल्या?' या प्रश्नाचे उत्तर पुढीलप्रमाणे सांगता येईल. तर, या जाती अशा : मांग, महार, चांभार, रामोशी, भिल्ल, कोळी, माळी, साळी, गुरव, मराठा, माकडवाला, डवरी, डोंबारी, कैकाडी, मुसलमान, नाभिक, गोंधळी, सुतार, लोहार, बेलदार, ब्राह्मण, ख्रिश्चन, कुंभार, तेली, गारुडी, नंदीवाले, गोसावी, कंजारी, जंगम, फासेपारधी, वडार, कोल्हाटी, खावटी, हटकर, धनगर, चित्रकर्ता, बेलदार, वेश्या, फकीर इत्यादी. यात मराठा, ब्राह्मण अशा काही उच्च जातीही आहेत. अण्णा भाऊंच्या साहित्यात या जाती वर्ग-प्रतिनिधी बनतात, हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही.

जग बदलण्याचा आणि जगातला माणूस गुलाममुक्त करण्याचा हा ध्यास आभाळाएवढा आहे. स्वाभाविकच लढायाही आभाळाएवढ्या आहेत. हे सारं बदलायचं आणि त्यासाठीचं एक साधन म्हणजे साहित्य, कला आणि बुलंद आत्मविश्वास. पूजापाठ करून जग बदलणार नाहीये, म्हणून तर त्यांना भीमटोला मारायचा आहे. आता कचकड्याचा खेळ करून चालणार नाही, तर जग बदलणारं तत्त्वज्ञान जगून आणि ते आपल्या साहित्यातही मांडून हल्लाबोल करायचा आहे. म्हणून तर ते म्हणतात, 'जग बदल घालुनि घाव । सांगूनि गेले मला भीमराव।' हे घाव घालण्याचं तंत्र म्हणजे त्यांचं साहित्य. (घाव शब्दाचं मूल्य चारित्र्य काय आहे, हे संशोधकांनी अवश्य तपासावे. तसं न करता अण्णा भाऊंची मैना म्हणजे त्यांची वाटेगावात राहणारी पत्नी- असं सांगू नये.) ते माणसाशी, त्याच्या मुक्तीशी व साम्यवादाशी इनाम राखते आणि म.फुले, शाहू व आंबेडकर यांच्याशी आदर ठेवते. साम्यवाद्यांनी फुले, शाहू, आंबेडकरांच्या सावलीत राहू नये, असं कुठं मार्क्सनं सांगितलेलं नाही. सबब- अण्णा भाऊंची ओढाओढ आता थांबली पाहिजे.

उत्तम कांबळे, नाशिक
uttamkamble56@gmail.com
Mob. 9881099143

(दैनिक सकाळ या दैनिकात तब्बल पस्तीस वर्षे कार्यरत राहून प्रशिक्षित पत्रकार ते मुख्य संपादक असा प्रवास उत्तम कांबळे यांनी केला आहे आणि विपुल म्हणावे असे ललित व वैचारिक लेखन केले आहे. ठाणे येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.)

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

काळाच्या पुढचे पाहणारा लेखक

राजन गवस

अण्णा भाऊ साठे हे नाव उच्चारलं की मनात येते, लेखकाची कुंडली कोणी मांडू नये- तो जिवंत असताना किंवा तो या विश्वात नसतानाही. त्याच्या साहित्याला सततच नवनव्या कालखंडात तपासणारे, अभ्यासणारे भेटत असतात. ते त्या-त्या काळाच्या कसोटीवर त्या लेखकाला तपासण्याचा प्रयत्न करत असतात. नव्याने आकलन होत असते. ही प्रक्रिया सातत्यपूर्ण असते. कोणत्याही लेखकाचे आकलन परिपूर्ण कधीच होत नसते. त्यामुळे वाङ्मयाच्या आस्वादकांनी, समीक्षकांनी सावधपणेच विधाने केलेली बरी असतात. कधी-कधी काही लोक आततायीपणे बोलतात. अमुक-अमुक लेखक संपला, आता त्याच्याकडून काही अपेक्षा करण्यात अर्थ नाही. तोवर तो लेखक काही तरी भव्य-दिव्य लिहून जातो आणि आततायी बोलणाऱ्याच्या मुस्काटात खाऽड्ऽऽकन् बसते. तसंच अमुक एक लेखक युगप्रवर्तक आहे म्हणायला जावं, तर थोड्याच कालावधीत त्या लेखकाचं काहीच उरलेलं नसतं. त्यामुळे लेखकांबाबत बोलताना-लिहिताना समीक्षक किंवा इतर तत्सम इसमांनी फार जबाबदारीनंच बोललं-लिहिलं पाहिजे. पण याचे भान असणारे फारच कमी लोक सापडतात. उलट आजच्या काळात बेदरकार, आततायी विधाने करण्याची स्पर्धाच चाललेली दिसते. मूल्यमापनाची तर इतकी घाई झालेली आहे की, त्याबाबत न बोललेलंच बरं. अमुक लेखकाचे साहित्य जागतिक दर्जाचे, तमुक लेखकाचे साहित्य जातीय स्वरूपाचे- असल्या बाळबोध विधानांची बजबजपुरी आता शिगेला पोहोचलेली आहे. स्वतःला प्रेषिताचे अवतार समजणारे प्रत्येक काळात असतातच. त्यांनी दोन-चार इंग्रजी ग्रंथांची प्रस्तावना फक्त वाचून, अवघड मराठीत लिहून-बोलून स्वतःचे व्यक्तिमाहात्म्य प्रस्थापित करण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला असतो. त्या आधारावर तुटपुंज्या शिदोरीवर शंकराचार्य बनून मूल्यमापनाचा निर्णायक अधिकार आपल्याकडेच आहे, अशी आवई उठवण्याचा प्रयत्न सुरू केलेला असतो. त्या आधारावर ते कलाकृतींबाबत पूर्वग्रह निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतात. पण हे सारं फार काळ टिकणारं नसतं. काळाच्या पसाऱ्यात हे सारं कुठल्या कुठं उडून जात असतं. त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रात अंतिम असतो, तो फक्त काळ. तोच घेत असतो मूल्यनिर्णय. बाकी सगळ्यांचे चाललेले प्रयत्न हे अळवावरचे पाणी असते. पण हे सांगणार कोणाला? कारण, हे भुसा भरलेले शंकराचार्य हातात तराजू घेऊन हैदोस घालत असतात, वाङ्मयीन पर्यावरणात. यांना माहितीच नसतं की, केंद्र आणि परिघ हे वाङ्मयीन पर्यावरणात बदलतही असतात. कधी काळी आपल्याकडे फडके-खांडेकर यांच्या साहित्याने सगळा अवकाश व्यापून टाकलेला होता. त्यांचे

साहित्य आणि त्यांचे तंत्रकौशल्य केंद्रस्थानी होते. पण नंतरच्या काळात गंगाधर गाडगीळ-व्यंकटेश माडगूळकर-शंकर पाटील यांच्या लेखनाने खळबळ माजवली आणि फडके-खांडेकर परंपरेतील साहित्य परिघावर फेकले गेले. मर्ढेकरांच्या कवितेने पूर्वपरंपरेला जोरदार धक्का दिला. संपूर्ण वाङ्मयीन पर्यावरणाच्या केंद्रस्थानाचा मौजपरंपरेतील कलाकृतींनी ताबा घेतला. कातीव टोकदारपणाला विलक्षण महत्त्व प्राप्त झाले. मौजमध्ये छापणे ही थोरपणाची कसोटी बनली. या वेळी समीक्षेच्या परिभाषेने नवे रूप धारण केले. पण हे सारे फार काळ टिकले नाही. अनियतकालिकाच्या चळवळीने मौजेची ही सद्दी संपुष्टात आणली. त्यामुळे काळानुसार केंद्र-परिघ या संकल्पना आपोआपच बदलत असतात. काळ अनंत आहे, हे नीट ध्यानात ठेवले नाही की, गुंते तयार होतात. अण्णा भाऊ साठे यांच्याबाबतही असेच काही घडून गेले. अण्णा भाऊ साठे हयात होते तोवर त्यांच्या आयुष्याचा पाठपुरावा दारिद्र्याने सोडला नाही.

पण अण्णा भाऊ साठे, भाऊ पाध्ये
हे दोन्ही लेखक मुंबईतच वास्तव्यास होते.
एक जन्माने मुंबईकर होते, तर दुसऱ्यांना
भूक मुंबईला घेऊन आली होती.
या दोन्ही लेखकांचा वावर त्या वेळच्या
प्रतिष्ठित छावण्यांत होता. भाऊ पाध्ये
काही काळ समाजवाद्यांच्या कळपात होते.
अनियतकालिकांची चळवळ
चालविणाऱ्यांच्यातही त्यांची ऊठबस होती.
अण्णा भाऊ तर कम्युनिस्ट पक्षाचे
कार्डहोल्डर होते. डांगेंनी त्यांच्या पुस्तकास
प्रस्तावना दिली होती. बाबूराव बागुल,
नारायण सुर्वे यांच्यासोबत ऊठबस होती.
असे असताना दोघांच्याही साहित्याला
फारशा गांभीर्याने घेतले गेले नाही. त्यांच्या
वाट्याला फारसे चांगले प्रकाशक आले नाहीत.

त्यांच्या साहित्याचा विचार तत्कालीन साहित्यव्यवहाराने पुरेशा गांभीर्याने केला नाही. असे का व्हावे? याची सर्व कारणे तत्कालीन वाङ्मयीन व्यवहारात सहजपणे मिळून जातात. हा कालखंड मौजेच्या फूटपट्टीने झाकोळलेला होता. अण्णा भाऊंना शाहीर म्हणून मान्यता मिळत होती, पण लेखक म्हणून मात्र त्यांच्या लेखनाची दखल घेतली गेली नाही.

– २ –

मराठी साहित्यविश्वात फक्त अण्णा भाऊंचीच दखल घेतली गेली नाही, असे नाही. मराठी साहित्यात उपेक्षेची दीर्घ परंपराच असल्याचे दिसते. आंग्लसंपर्कानंतर हे उपेक्षेचे, अनुल्लेखाचे तंत्र वाङ्मयीन व्यवहारात प्रस्थापित झाल्याचे दिसते. ही उपेक्षा पहिल्यांदा महात्मा फुले यांच्या वाट्याला आली. पण त्या काळात सत्यशोधकीय साहित्याची पर्यायी परंपरा विकसित झाली. यासाठी सत्यशोधकीय पत्रकारिता खंबीरपणे पाय रोवून उभी राहिली. कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, नारायण मेघाजी लोखंडे, धोंडिराम कुंभार, वासुदेव बिर्जे, तुकारामतात्या पडवळ, गोपाळराव वलंगकर अशी लेखक-परंपरा निर्माण झाली. पण नंतरच्या काळात ही संपूर्ण परंपराच अनुल्लेखाने बाजूस सारली गेली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात ही सत्यशोधकीय परंपरा किती तरी वर्षे अंधारातच राहिली. हीच गोष्ट कृष्णराव अर्जुन केळुसकरांची. गुरुवर्य केळुसकरांनी पहिले शिवचरित्र लिहिले. तुकारामबुवांचे चरित्र, गौतम बुद्धांचे चरित्र लिहिणारे केळुसकरगुरुजी हे नाव हा मराठी माणूस विसरून गेला. चाळीस-पंचेचाळीस महत्त्वाचे ग्रंथ लिहिणाऱ्या या लेखकाच्या वाट्याला वाङ्मय इतिहासात एक ओळही आली नाही. हे नजरचुकीने झाले असे म्हणता येत नाही. केळुसकरगुरुजींच्या पुढाकाराने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पहिला सत्कार करण्यात आला. त्या वेळी आपले गौतम बुद्ध चरित्र बाबासाहेबांना भेट दिले. तेव्हा त्यांचा बौद्ध धर्माशी परिचय झाला. अशा गुरुवर्य केळुसकरांच्या पदरी उपेक्षाच आली. अजूनही केळुसकरांचे कार्यकर्तृत्व सामान्य माणसाला पुरेसे परिचित झालेले नाही. याबाबतच्या कारणांचा समाजशास्त्रीय शोध अद्यापपर्यंत घेतला गेलेला नाही.

हीच गोष्ट महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या बाबतीत

दिसेल. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपले आयुष्य दलितोद्धारासाठी खर्ची केले, पण त्यांच्या कार्याची पुरेशी नोंद कोणीच घेतली नाही. त्यांचे वाङ्मयीन कार्य उच्च दर्जाचे असूनही त्यांच्या कार्याची दखल घ्यायला १९९० चे दशक उजाडावे लागले. जगण्याचा बहुतेक कालखंड सेवाभावी वृत्तीने घालवलेल्या या महात्म्याच्या पदरी महाराष्ट्राने काय टाकावे? तर उपेक्षा! त्यांच्या कार्याचे यथायोग्य मूल्यमापन अद्याप झाले नाही. क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील यांचे कार्य तर अद्याप अनुल्लेखानेच मारले जात आहे. याबाबतची कारणे सरळ-सरळ जातीय आहेत, हे सांगायला कोणत्याच भविष्यवेत्त्याची गरज नाही. साहित्याच्या क्षेत्रात असे अनेक लेखकांचे कार्य अनुल्लेखाने मारले गेले. यामध्ये अण्णा भाऊ साठे यांचे नाव अगक्रमाने घ्यावे लागते. अण्णा भाऊंनी आपल्या हयातीत विपुल लेखन केले. पण त्यांच्या कार्याची यथायोग्य दखल घेण्यासाठी फारशी फुरसद कुणाला मिळाली नाही. यामागच्या कारणांचा शोध घेऊ जाता, उपेक्षेचे मानसशास्त्र उलगडत जाते.

– ३ –

बहुजन समाजातील कर्त्या विचारवंतांच्या, लेखकांच्या कर्तृत्वाचा शोध १९६० नंतर जाणीवपूर्वक घेतला जाऊ लागला. याला कारण दलित साहित्याची चळवळ व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्यकर्तृत्व हेच आहे. अनियतकालिकाच्या चळवळीने मराठी साहित्यात आत्मभान निर्माण करणारी चळवळ उभी केली. याच काळात दलित साहित्याच्या चळवळीचा उगम झाला. डॉ.बाबासाहेबांच्या 'शिका-संघटित व्हा-संघर्ष करा' या शिकवणुकीचे प्रत्यक्ष उपयोजन सुरू झाले. दलित समाजातील नवनवे लेखक आपले जीवनानुभव अभिव्यक्त करू लागले. राजा ढाले आणि नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरची आक्रमक चळवळ महाराष्ट्रात उभी केली. या चळवळीने बहुजन समाजात नवे आत्मभान निर्माण केले. साहित्यातून विद्रोह प्रकट होऊ लागला. परंपरागत लादलेल्या गुलामीला जोरदार नकार आणि स्वातंत्र्य-समता-बंधुता या मूल्यांचा स्वीकार करणारे आवाज अधिक ठळक बनत गेले. प्रथम कविता, नंतर आत्मकथन, कथा, कादंबरी, नाटक या माध्यमातून परंपरागत साहित्याच्या आशयालाच नकार देत सामान्य, दलित, शोषित यांच्या जगण्याला स्वर प्राप्त झाला. बाबूराव बागुलांनी दलित साहित्याचे क्रांतिविज्ञान मांडून भक्कम वैचारिक भूमिका प्राप्त करून दिली.

दलित साहित्याची निर्मिती आणि दलित साहित्याची चळवळ सर्वदूर पसरत गेली. शब्दांना सुरुंगाचे स्वरूप प्राप्त झाले. प्रस्थापितांनी पहिल्यांदा नापसंपतीदर्शक स्वर प्रकट करण्याचा प्रयत्न केला. पण नंतर या नव्या क्रांतिकारी साहित्याचा स्वीकार त्यांना अगतिकतेने का असेना, पण करावा लागला. मराठीचे वाङ्मयीन पर्यावरण ढवळून निघाले. या साऱ्याचा परिणाम असा झाला की- डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहूमहाराज यांच्या विचारांना व्यापक अधोरेखन मिळाले. फुले-शाहू-आंबेडकर ही विचारप्रणाली केंद्रवर्ती आली. यातून नव्या उजेडात महात्मा फुले व त्यांची सत्यशोधकीय परंपरा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार यांचे परिशीलन सुरू झाले. दलित साहित्याच्या चळवळीने सर्वांनाच खडबडून जागे केले. यातूनच पुढे ग्रामीण साहित्याची चळवळ, आदिवासी, ख्रिस्ती, मुस्लिम, स्त्रीवादी अशा विविध साहित्य चळवळी उभ्या राहिल्या. या साऱ्या चळवळी आपापले वैचारिक अधिष्ठान शोधू लागल्या. त्यामुळे महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, मार्क्स यांच्या विचारांचे नव्याने संशोधन सुरू झाले. वेगवेगळे ग्रंथ निर्माण होऊ लागले. मराठी वाङ्मयीन पर्यावरणच बदलून गेले. महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध ग्रंथांचे नव्याने प्रकाशन सुरू झाले. कोणी सत्यशोधकीय पत्रकारिता शोधायला सुरुवात केली, तर कोणी मुंबईतील नारायण मेघाजी लोखंडे यांचे योगदान, तमिळ लोकांचे योगदान असे शोध सुरू केले. जाति-अंताची चळवळ नव्याने आकार घेऊ लागली. या साऱ्याचे पडसाद साहित्यात आपोआप पडू लागले. या वेळी राजा ढाले, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम आदी विचारवंतांनी धारदार मांडणी करायला सुरुवात केली. बाबूराव बागुलांनी या मांडणीला सैद्धान्तिक चौकट देण्याचा प्रयत्न केला. अनेक विचारवंत हा वैचारिक प्रवाह समृद्ध करण्यात अग्रेसर राहिले. दलित साहित्याने स्वतःचा असा दणकट अवकाश प्रस्थापित केला. महाराष्ट्राचे सामाजिक, राजकीय पर्यावरणच बदलून गेले.

असे असले तरी दलित साहित्याच्या निर्मिती कालखंडापूर्वीच अण्णा भाऊ साठे यांनी बक्कळ काम करून ठेवले होते. त्यांची नोंद या साऱ्यातही फारशी घेतली गेली

असे नोंदविण्यास फारसे पुरावे सकृत्दर्शनी सापडत नाहीत. एखादा परिच्छेद, एखादी ओळ अण्णा भाऊंच्या वाट्याला येत गेली. पण त्यांच्या साहित्याची, पोवाड्यांची, वगनाट्यांची दखल तितक्या गांभीर्याने घेतली गेली नाही. अण्णा भाऊंनी दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी केलेल्या भाषणाची चर्चाही अलीकडच्या काळात सुरू झालेली आहे. हे वर्तमान तपासले पाहिजे. यातून नव्याच गोष्टी आपल्यासमोर येतात.

– ४ –

मराठी साहित्यात काही लेखकांची भक्कम कामगिरी असूनही त्यांच्या लेखनाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. अशा लेखकांचा स्वतःचा वाचकवर्ग आहे. त्यांनी संख्येने विपुल निर्मितीही केलेली आहे. पण त्यांच्या साहित्याचा विचार

तथाकथित समीक्षक मात्र पुरेशा गांभीर्याने करत नाहीत. यामध्ये अण्णा भाऊ साठे, भाऊ पाध्ये, महादेव मोरे, वसंत नरहर फेणे, मनोहर शहाणे, मनोहर तल्हार अशी बरीच नामावली देता येईल. या लेखकांच्या वाट्याला मराठी समीक्षा जात नाही. यातील महादेव मोरे, मनोहर मल्हार, मनोहर शहाणे हे तत्कालीन प्रतिष्ठित वाङ्मयीन केंद्राच्या बाहेर होते. मोरे निपाणी, तर शहाणे नाशिक, तल्हार नागपूर. पण हे तिघेही निष्ठेने लेखन करत होते. पण यांच्या लेखनाची दखल घेतली पाहिजे, असे कोणास वाटले असे दिसत नाही. त्यांच्या लेखनावर समीक्षा सोडाच, चर्चाही करावीशी वाटली नाही. त्याचे एक सोपे कारण– ते तथाकथित महाराष्ट्रात राहत नव्हते. तो तथाकथित महाराष्ट्र पुणे–मुंबईपुरताच मर्यादित होता. तेथे असणे म्हणजेच लेखक असणे, अशी रूढ धारणा होती. त्यामुळे शिवाजी सावंत, शंकर पाटील, आनंद यादव असे किती तरी लेखक आपले घर, गाव सोडून पुण्यात येऊन स्थायिक झाले. खानोलकरांनी मुंबई गाठली.

पण अण्णा भाऊ साठे, भाऊ पाध्ये हे दोन्ही लेखक मुंबईतच वास्तव्यास होते. एक जन्माने मुंबईकर होते, तर दुसऱ्यांना भूक मुंबईला घेऊन आली होती. या दोन्ही लेखकांचा वावर त्या वेळच्या प्रतिष्ठित छावण्यांत होता. भाऊ पाध्ये काही काळ समाजवाद्यांच्या कळपात होते. अनियतकालिकांची चळवळ चालविणाऱ्यांच्यातही त्यांची ऊठबस होती. अण्णा भाऊ तर कम्युनिस्ट पक्षाचे कार्डहोल्डर होते. डांगेंनी त्यांच्या पुस्तकास प्रस्तावना दिली होती. बाबूराव बागुल, नारायण सुर्वे यांच्यासोबत ऊठबस होती. असे असताना दोघांच्याही साहित्याला फारशा गांभीर्याने घेतले गेले नाही. त्यांच्या वाट्याला फारसे चांगले प्रकाशक आले नाहीत. भाऊ पाध्ये यांनी तर कोणालाही पुस्तके छापायला दिलेली दिसतात. 'ऑपरेशन छक्का' हे नाटक तर स्वतःच प्रकाशित केले. अण्णा भाऊंचे प्रकाशक तर महाराष्ट्रभर विखुरलेले. या दोघांच्याही पुस्तकांची मुखपृष्ठे भडक, बटबटीत. सामान्य वाचकास भुरळ घालणारी. कदाचित त्यामुळेही त्यांच्या साहित्याची गणना रंजक साहित्यात केली गेली असावी. अण्णा भाऊंच्या 'फकिरा'ला राज्य पुरस्कार मिळाला. भाऊंच्याही कादंबरीस राज्य पुरस्कार मिळाला. पण साहित्याच्या परंपरेत मात्र त्यांना बेदखल केले गेले. असे का व्हावे? मला सकृत्दर्शनी जाणवणारे कारण म्हणजे, या लेखकांच्या



भाऊ पाध्ये

कृष्णराव अर्जुन केळुसकर

साहित्याचा विशाल व्यापक पट आणि सामान्य माणसाला आस्थेच्या केंद्रवर्ती आणण्याची आकांक्षा. भाऊ पाध्ये यांनी आपल्या साहित्यात मुंबई महानगरीचा उभा-आडवा छेद घेतला. मुंबईतील वेश्यावस्ती, गुन्हेगारी विश्व, सामान्य माणसाचा जीवघेणा संघर्ष, रिकामटेकड्या वास्तूंचे विश्व, जागेची समस्या, कामगारवस्ती, कामगार चळवळी, उच्चभ्रू समाजाचे जगणे, तेथील अनैतिक व्यवहार हे पाध्ये यांनी सूक्ष्म तपशिलासह आपल्या कथा, कादंबऱ्यातून चित्रीत केले. अण्णा भाऊंनी मुंबईतील झोपडपट्टी तर साहित्यात आणलीच, पण बरोबरच गावगाडा आतला आणि बाहेरचा आपल्या कथा-कादंबरीतून दमदारपणे चित्रित केला. यात सामान्य शेतकरी जमीनदार, आलुतेदार, बलुतेदार, गावाबाहेरचे दलित, शोषित, भटके, फिरस्ते या साऱ्यांना आपल्या आस्थेच्या केंद्रस्थानी आणून त्यांच्या वेदनांना शब्द दिला. या दोन्ही लेखकांनी स्त्रियांच्या कमालीच्या शोषित जगण्याला कथा, कादंबऱ्यांतून मोकळा अवसर प्राप्त करून दिला. स्त्रियांच्या शोषणाच्या विविध परी सूक्ष्म तपशिलांसह चित्रित केल्या. हे दोन्ही लेखक विशिष्ट एका जातीविषयी, वर्गाविषयी, धर्माविषयी न लिहिता 'माणसा'विषयी लिहीत गेले. ते स्वतःच जात, धर्म, वर्ग यांच्या पलीकडे पोहोचले होते. त्यामुळेच त्यांना आपल्या साहित्यात माणसांचे गाणे गाता आले. ते माणसांचे समग्र जगणे साहित्यातून मांडत होते, हीच बहुतेक समीक्षकांची अडचण असावी. त्यामुळेच त्यांच्या साहित्यावर त्यांना लिहिता आले नसावे. मुंबई-पुणे म्हणजे महाराष्ट्र- ही ज्यांची धारणा होती, त्यांना गावगाडा आतला आणि बाहेरचा, स्त्रीविश्व याची जाणीव असण्याची शक्यताच कमी. मध्यमवर्गात वावरणाऱ्यांना वालपाखाडी, वारणेचे खोरे कसे काय आकळणार? त्यामुळे त्यांनी या लेखकांना अनुल्लेखानेच बाजूस सारले. मराठी साहित्यात आजवर समीक्षाक्षेत्रात जात पाहून समीक्षा करण्याचे चुकीचे पर्यावरण स्थिरस्थावर झाले होते. ज्या जातीचा लेखक, त्या जातीचाच समीक्षक. तोच त्याची तळी उचलून धरणार, त्याचे वाङ्मयीन माहात्म्य अधोरेखित करणार- असा पायंडा प्रस्थापित होता. जातीने जातीच्या लेखकाचा गौरव करणे यातच ही समीक्षा धन्यता मानत होती. अशा वेळी संपूर्ण मानवजात आस्थेच्या कवेत घेणाऱ्या, व्यापक सहानुभाव आणि समूहभावाने आस्थापूर्वक लेखन

करणाऱ्या लेखकाला समीक्षक भेटणार कुठून? सगळे जातीच्या खुराड्यात बंदिस्त झालेले.

भालचंद्र नेमाडे यांनी १९८० नंतर मराठी कादंबरीवरील निबंधात भाऊ पाध्ये यांचा उल्लेख महत्त्वाचा कादंबरीकार असा केला आणि पाध्ये यांच्या साहित्याची चर्चा सुरू झाली. त्यांच्या कथा-कादंबरीतील चित्रविश्वाबाबत गांभीर्याने लिहिले-बोलले जाऊ लागले. अण्णा भाऊंना मात्र त्यांच्या जातीने आपला 'नायक' म्हणून स्वीकारण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांच्या कार्यकर्तृत्वावर चर्चा सुरू झाली. ज्या सगळ्यातून अण्णा भाऊ बाहेर पडले होते, तेच त्यांच्या मृत्यूनंतर वाट्यास आले. त्यामुळे त्यांच्या आकलनाला पुन्हा मर्यादा प्राप्त होतात का, असे संशयाचे वातावरण निर्माण झाले.

– ५ –

अण्णा भाऊ साठे समग्र मानवी जीवन आपल्या आस्थेच्या कवेत घेऊ शकले, याचे कारण त्यांचे गावगाड्याबाहेरचे जन्मणे आणि कामगार म्हणून मुंबईत लढणे. त्यांनी आतला आणि बाहेरचा गावगाडा साक्षात जगून घेतलेला होता. तिथल्या जातीय उतरंडीत त्यांनाही भरडून जावे लागले होते. मुंबईत तर झोपडपट्टीतल्या नरक-यातना वाट्यास आल्या होत्या. गावात गावाच्या बाहेर, तर मुंबईत मुंबईच्या बाहेर. दोन्ही ठिकाणची जगण्याची लढाई वेगवेगळ्या पातळीवरची. हे सर्व जगणे अंगावर घेत असताना शोषणमुक्तीच्या विचारांना नवी दृष्टी प्राप्त झाली. नवी सजगता निर्माण झाली. अख्खी मुंबई महाराष्ट्रभरच्या खेड्यापाड्यांतील गरीब मजुरांनी उभी केलेली. त्यांचे रक्तच मुंबईच्या धमन्यांतून वाहत असलेले. अशा मुंबईत अण्णा भाऊ कामगार चळवळीतील कार्यकर्ते म्हणून आयुष्यभर वावरले. त्यांच्यातील अस्वस्थ कार्यकर्ता त्यांना सततच कार्यप्रवण करत गेला. अशातच संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन सुरू झाले आणि त्यांच्या शाहिरीला बहर आला. मुळातच शाहिरी रक्तात भिनलेली. बालपणातल्या तमाशाने व्यापलेली. त्यामुळे सर्वदूर महाराष्ट्राला सळसळत ठेवण्यात अण्णा भाऊंच्या शब्दांनी मोलाचे काम केले. त्यांनी चळवळीला आवाज दिला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अण्णा भाऊंच्या योगदानाचा विचार तरी नीटपणे कुठे केला गेला? त्यांची वगनाट्ये, पोवाडे, छक्कड आणि चळवळीची गाणी हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. त्यांनी पोवाडा हा काव्यप्रकार कसा वैश्विक केला, याचा शोध घेणे गरजेचे आहे. पारंपरिक पोवाडे आणि अण्णा भाऊंचे पोवाडे यांच्यातील रचनाबंध तपासला, तर एखादा प्रतिभावंत आपल्या निर्मितीने पारंपरिक रचनाबंध कसा उन्नत करतो याचे भरीव पुरावे मिळतील. पोवाडा फक्त वीररसपूर्ण रचना नसून, ती परिवर्तन घडविणारी लवचिक आणि तीव्र लाघवी रचना कशी आहे, याचा प्रत्यय अण्णा भाऊंचे पोवाडे वाचताना येतो.

अण्णा भाऊ हे मौखिक परंपरेला घट्ट जोडलेले अद्वितीय कलावंत होते. त्यांची संपूर्ण घडणच या मौखिक परंपरेने केलेली होती. त्यामुळे त्यांच्या कथेत, कादंबरीत, वगनाट्यात, पोवाड्यात या मौखिक परंपरेतील रचनाबंधाच्या भरभक्कम तंत्रखुणा वावरताना दिसतात. मौखिक परंपरा आणि अण्णा भाऊंचे साहित्य असाही त्यांच्या साहित्याचा अभ्यास करायला हवा. पण असे अभ्यास होताना दिसत नाहीत. उलट, अण्णा भाऊंची विभूतिपूजा मांडणारे अभ्यास होताना दिसत आहेत. हे सगळ्यात घातक आहे. यापूर्वी अण्णा भाऊंच्या साहित्याची परंपरागत अभ्यासकांनी उपेक्षा केली, त्यामुळे त्यांचे कर्तृत्त्व समाजासमोर नीट आले नाही. आता विभूतिपूजक अभ्यासक त्यांच्या साहित्याला अतिगौरवाने आणि दंतकथांनी मारतील, अशी भीती वाटायला लागलीय. एकूण, अण्णा भाऊंच्या पाठीमागचं उपेक्षेचं शुक्लकाष्ठ नजीक तर संपेल असं वाटत नाही. अशा अर्थानं त्यांना 'सर्वश्रेष्ठ शापित कलावंत' असे म्हणावे लागेल!

राजन गवस, कोल्हापूर
rggavas@yahoo.co.in
Mob.9422580517

(कथा, कादंबरी व ललित लेखन हे तिन्ही प्रकार मोठ्या ताकदीने हाताळणारे मराठीतील आघाडीचे साहित्यिक म्हणून राजन गवस यांना ओळखले जाते, ते अहमदनगर येथे झालेल्या अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते, भाऊ पाध्ये यांच्या साहित्यावर त्यांनी पीएच.डी. केली आहे.)

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

शंकर भाऊंच्या आठवणीतील अण्णा भाऊ

मनोहर जाधव

'माझा भाऊ अण्णा भाऊ' हे शंकर भाऊ साठे यांचे पुस्तक. या पुस्तकाची पहिली आवृत्ती १ ऑगस्ट १९८० रोजी प्रसिद्ध झाली. हे १३२ पृष्ठांचे पुस्तक पुण्याच्या सुगावा प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहे. या प्रकाशनाचे हे पहिलेच पुस्तक. शंकर भाऊ साठे हे अण्णा भाऊ साठे यांचे धाकटे भाऊ. अण्णा भाऊंचे चरित्र म्हणजे हे पुस्तक असं त्यांनी प्रस्तावनेत म्हटलं आहे. खरं म्हणजे अण्णा भाऊंच्या आठवणी त्यांनी लिहिल्या आहेत, या आठवणींनाच त्यांनी चरित्र असे संबोधले आहे. या आठवणींचे लेखन ललित स्वरूपात त्यांनी केलं आहे. त्यांच्या अतिशय निकटवर्तीय व्यक्तीने या आठवणी लिहिल्या असल्यामुळे आपोआपच त्याला एक अधिकृत विश्वासार्हता प्राप्त झाली आहे, असे म्हणायला हरकत नाही. या आठवणी रोचक आहेत. सार्वजनिक जीवनात सक्रिय असणाऱ्या आणि लौकिक मिळवलेल्या व्यक्तीसंबंधी समाजात एक आस्था असते. अशा व्यक्तीसंबंधी समाजात दंतकथा प्रसृत झालेल्या असतात. गौरवीकरण किंवा उदात्तीकरणही सुरू असते. कधी वस्तुस्थितीचा विपर्यासही दिसतो. भारतीय समाजजीवनात तर या गोष्टींचा प्रत्यय निरंतर येत असतो. कधी कधी तर टोकाच्या संवेदनशीलतेमुळे व्यक्तींचे दैवतीकरण होऊ लागते. अशा वेळी आस्थेची जागा श्रद्धा घेते आणि ही श्रद्धा तारतम्याच्या अभावामुळे भाविकतेमध्ये बदलते. मग अनुयायी निर्माण होण्यापेक्षा भक्तांची संख्या वाढू लागते. विचारांपेक्षा भावना, व्यक्तिपूजा वरचढ होऊ लागते. आणि भक्त केव्हा उन्मादी होतात, हे त्यांनाही कळत नाही. अशा वेळी लौकिकप्राप्त व्यक्तीच्या सहवासातील नजीकच्या व्यक्तीने लिहिलेल्या आठवणी, चरित्रे महत्त्वाची ठरतात. जवळच्या व्यक्तीने लिहिले म्हणजे त्यात उदात्तीकरण येणारच नाही, असे मात्र संभवत नाही. हा धोका असतोच. या निकषावर 'माझा भाऊ अण्णा भाऊ' हे पुस्तक तपासले, तर एक आश्वासक दिलासा मिळतो. प्रस्तावनेत शंकर भाऊंनी म्हटले आहे की, 'कै.शाहीर अण्णा भाऊ साठे यांचे चरित्र माझ्यासारख्या एका साध्या माणसाने लिहिले म्हणजे, आपल्या आरतीने स्वतः ओवाळून घेतल्यासारखे आहे. परंतु मी जे लिहिले आहे, ते फक्त अण्णा भाऊंनी काय केले ते. हे जर एखाद्या उत्तम कादंबरीकाराने लिहिले असते, तर त्याला फार मोठी मान्यता मिळाली असती... अण्णांच्या साहित्याबद्दल मला काही लिहायचे नाही. त्यांनी कसे लिहिले, ते मी सांगू शकत नाही... परंतु त्यांनी काय काम केले, ते मी लिहिले आहे. तेव्हा अण्णा भाऊंच्या वाचकांनी हे जरूर पाहावे की, अण्णा भाऊ कसे होते नि त्यांनी काय केले.' शंकर भाऊंनी अण्णा भाऊंच्या लेखन कारकिर्दीचा आढावा घेतलेला नाही. या लेखनाचा हेतू पण तो नाही. काय सांगायचे आहे

याची स्पष्टता त्यांच्याजवळ आहे.

प्रस्तावनेत जाता-जाता त्यांनी एक खंत व्यक्त केली आहे. वाटेगावने अण्णा भाऊंसाठी काहीही केलेलं नाही, कारण जातीयवादाची भिंत कोणी फोडू शकला नाही. जर अण्णा दुसऱ्या कोणत्याही वर्गाचे असते, तर गावाने नक्कीच काही तरी केले असते. शंकर भाऊंचे हे जळजळीत भाष्य समाजाच्या मानसिकतेवर प्रकाश टाकणारे आहे. असामान्य कर्तृत्वाच्या माणसांना शेवटी जातीच्या चौकटीतच समाजव्यवस्था पाहत असते. समाजाचे हे थिटेपण अजूनही कायम आहे.

त्यांच्या बालपणातील व ऐन उमेदीतील आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत, त्याप्रमाणे लोकनाट्य कलावंत म्हणून त्यांनी केलेली कामगिरी आणि या क्षेत्रात परिश्रमाने मिळवलेला नावलौकिक, महाराष्ट्रात ठिकठिकाणी लोकनाट्य सादरीकरणासाठी केलेले झंझावाती दौरे, या प्रसंगीच्या घटना, इत्यादी तपशील शंकर भाऊंनी विस्ताराने

अण्णा भाऊंच्या सान्निध्यातील काही जाणकार लोकांनी आणि मित्रांनी या आठवणी लिहिण्यासाठी शंकर भाऊंकडे तगादा लावलेला दिसतो. त्यामुळेच हे पुस्तक लिहून झाले आहे. अण्णा भाऊंची कलावंत म्हणून झालेली जडण-घडण, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील कंगोरे, कलावंताचा कलंदरपणा, प्रापंचिक जीवन, त्या जीवनातील पेच, मनस्ताप, व्यक्तिमत्त्वातील बलस्थान व मर्यादा अशा सगळ्याच गोष्टी शंकर भाऊंनी या पुस्तकात पारदर्शीपणे लिहिल्या आहेत.
अण्णा भाऊ महाराष्ट्रातील मोठे कलावंत आणि लेखक होते, याची त्यांना स्पष्ट जाणीव आहे. अण्णा भाऊंच्या या मोठेपणाचं दडपण त्यांच्या लेखनावर जाणवत नाही.

लिहिला आहे. महत्त्वाचे म्हणजे, या दौऱ्यात अण्णा भाऊंसोबत एक कलावंत म्हणून तेही सहभागी झाले आहेत. म्हणजेच शंकर भाऊ या सगळ्या घटना-घडामोडींचे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत. या अर्थाने या लेखनाला एक अधिकृतता प्राप्त झाली आहे. १९६८ मध्ये अण्णा भाऊंनी शंकर भाऊंना आपला स्वतःचा एक पेन भेट दिला होता. त्या पेनच्या साह्याने शंकर भाऊंनी अण्णा भाऊंच्या आठवणी लिहिल्या आहेत. पेन देतेवेळी अण्णा म्हणाले होते, ''शंकर, हा माझा पेन सांभाळून ठेव. याने मी पुष्कळ लिहिले आहे. हा कुणाला देऊ नकोस. तसे माझ्याकडे आणखी दोन-तीन चांगले पेन आहेत. तेव्हा याला जपून ठेव.'' (प्रस्तावना) अण्णांची आठवण म्हणून तो पेन शंकर भाऊंनी जपून ठेवला होता. त्याच पेनने अण्णांच्या आठवणी लिहिण्याची वेळ येईल, याची त्यांना अर्थातच कल्पना नव्हती. त्याच पेनने त्यांनी आठवणी लिहून काढल्या. त्या पेनने 'काडतूस' नावाची कथा लिहायला घेतली. एक वही लिहून पूर्ण झाली आणि नंतर तो पेन गायब झाला. तो पेन त्यांच्याच एका जवळच्या नातेवाइकाने नेला होता. तो त्यांनी परत दिला नाही. जणू काही आठवणी लिहिण्यासाठीच त्यांनी शंकर भाऊंना तो पेन दिला होता. शाहीर अमर शेख, शाहीर द.ना. गव्हाणकर आणि शाहीर अण्णा भाऊ साठे या त्रिमूर्तीने एक काळ गाजवला. तमाशा, लावणी, छक्कड, पोवाडे, लोकनाट्य अशा कलांचे सादरीकरण या चमूकडून होत असे. मात्र या तिघांपैकी शाहीर अमर शेख काही कालावधीनंतर बाजूला झाले. नंतर द.ना. गव्हाणकर आणि अण्णा भाऊ या जोडगोळीने महाराष्ट्राचे मनोरंजन आणि प्रबोधन प्रदीर्घ काळ केले याची माहिती या पुस्तकात वाचायला मिळते. अभ्यासकांसाठी हा संदर्भ महत्त्वाचा आहे.

लोकनाट्य संस्थेची रंगभूमी १९४५ ते १९४७ पर्यंत पार्टीने चालवली. पार्टी कलावंतांना मानधन देत असे. ज्यांचे लग्न झाले आहे त्यांना साठ रुपये आणि एकटे असणाऱ्यांना चाळीस रुपये मानधन होते. हिंदी, तेलुगू, गुजराती मराठी अशी चार पथके होती. परंतु नंतर खर्चाचे प्रमाण वाढू लागले. म्हणून पार्टीने कलावंतांना सांगितले की, आता तुमची महाराष्ट्रात ओळख निर्माण झाली आहे. तुमच्या जबाबदारीवर कार्यक्रम करावेत. या परिस्थितीत अमर शेख, गव्हाणकर, अण्णा भाऊ यांनी आपले कलापथक कायम ठेवले. जागेअभावी रिहर्सल कुठे करावी,

हा प्रश्न होता. सातरस्ता जेकब सर्कलला खोली मिळाली. पण ५५० रुपये पागडी कशी भरावी, असा प्रश्न निर्माण झाला. गव्हाणकरांनी 'यंग इंडिया' कंपनीशी संपर्क साधून अण्णा भाऊंनी लिहिलेल्या 'पंजाबचा दंगा' या पोवाड्याचे रेकॉर्डिंग केले. त्या कंपनीकडून पैसे मिळाले. पागडी भरून खोली ताब्यात घेतली. तालमी सुरू झाल्या. अण्णा घाटकोपरला, तर गव्हाणकर गिरणगावला त्रिभुवन रोडवर राहत. त्यांची खोलीची अडचण नव्हती. अमर शेख जेकब सर्कलला राहू लागले. पुढे त्यांचे लग्न झाले. त्यांनी खोली आपल्या ताब्यात ठेवली. काही दिवसांनी तेच खोलीचे मालक बनले. चार नवे लोक जोडून त्यांनी स्वतंत्र कलापथक काढले आणि आपले कार्यक्रम ते करू लागले. चिडखोर स्वभावामुळे त्यांचे कोणाशी पटत नव्हते. त्यामुळे गव्हाणकर आणि अण्णा भाऊ यांनी स्वतंत्र पथकाचा विचार करून वाटचाल सुरू केली.

अण्णा भाऊंच्या सान्निध्यातील काही जाणकार लोकांनी आणि मित्रांनी या आठवणी लिहिण्यासाठी शंकर भाऊंकडे तगादा लावलेला दिसतो. त्यामुळेच हे पुस्तक लिहून झाले आहे. अण्णा भाऊंची कलावंत म्हणून झालेली जडण-घडण, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील कंगोरे, कलावंताचा कलंदरपणा, प्रापंचिक जीवन, त्या जीवनातील पेच, मनस्ताप, व्यक्तिमत्त्वातील बलस्थान व मर्यादा अशा सगळ्याच गोष्टी शंकर भाऊंनी या पुस्तकात पारदर्शीपणे लिहिल्या आहेत. अण्णा भाऊ महाराष्ट्रातील मोठे कलावंत आणि लेखक होते, याची त्यांना स्पष्ट जाणीव आहे. अण्णा भाऊंच्या या मोठेपणाचं दडपण त्यांच्या लेखनावर जाणवत नाही. किंबहुना, असामान्य असा आपला थोरला भाऊ या दृष्टीने या लेखनात आदर प्रतिबिंबित झाला आहे. अण्णा भाऊंचा संघर्ष आणि प्रपंचातील अडी-अडचणींचे ते एका अर्थाने सहभागीदारही आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील 'माणूस' त्यांनी मनःपूर्वकपणे चित्रित केला आहे. जवळजवळ वीस वर्षं अण्णा भाऊंचा त्यांना प्रत्यक्ष सहवास लाभला आहे. म्हणून अण्णा भाऊंना अधिक तटस्थपणे समजून घेण्यासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे.

मुंबईतील गिरणी कामगारांच्या संपाच्या वेळी १९३४ मध्ये अण्णा भाऊ संपाकडे आकर्षित झाले. त्यात त्यांनी धडाडीने भाग घेतला. अनेक कार्यकर्त्यांच्या ओळखी झाल्या. माटुंगा लेबर कँपमध्ये कॉ.साळवी आणि कॉ.मोरे त्यांना भेटले. त्यांच्यामुळे ते चळवळीचा अभ्यास करू लागले. त्यांचे वाचन वाढले. उपास-तापास करणारे अण्णा भाऊ पूर्णपणे बदलले. त्यांनी देवधर्म सोडला आणि कामगार कार्यकर्ते झाले. १९३७-३८ मध्ये म्हणजे वयाच्या सतराव्या-अठराव्या वर्षी ते कॉम्प्रेड पार्टीचे झाले. एकनिष्ठपणे पार्टीचे काम करू लागले. चौफेर वाचनामुळे त्यांची दृष्टी व्यापक आणि प्रगल्भ झाली. कामगार, शेतकरी यांच्या चळवळीची माहिती असलेली पुस्तके वाचल्यामुळे त्यांच्यातील कार्यकर्ता सजग झाला.

शंकर भाऊंजवळ लेखनकौशल्य आहे, लेखक म्हणून त्यांच्या नावावर अनेक साहित्यकृती आहेत; पण अण्णा भाऊंसारखा लौकिक त्यांना मिळाला नाही. अण्णा भाऊंच्या आठवणी लिहिताना शंकर भाऊंच्या व्यक्तिमत्त्वातील निरागसता जाणवत राहते. कुठे आडपडदा न ठेवता काही प्रसंग जसे घडले तसे त्यांनी कथन केले आहेत. त्यातून सत्य प्रकटते आणि वस्तुस्थितीही निदर्शनास येते. या लेखनाचा पोत प्रांजळ आहे. हे पुस्तक महत्त्वाचे असूनही त्याची फारशी दखल घेतली गेली, असे आढळत नाही. अण्णा भाऊ साठे हा विषय पुस्तकाच्या केंद्रस्थानी असूनही या पुस्तकाला त्या काळी प्रकाशक मिळत नव्हते. 'सुगावा' मासिकाने अण्णा भाऊ साठे विशेषांक १९७७ मध्ये प्रसिद्ध करायचे ठरवले. वर्तमानपत्रात ही बातमी वाचून शंकर भाऊंनी आपले लेखन 'सुगावा'कडे पाठवले आणि त्यातून हे पुस्तक आकाराला आले.

'लोकमंत्री' या तमाशावर बंदी वॉरंट निघाले, त्यासंबंधीची सविस्तर हकिगत शंकर भाऊंनी तपशीलवार सांगितली आहे. 'लोकमंत्री'वर बंदी असली, तरी त्याच्या प्रयोगाची मागणी रसिकांकडून होत होती. एकदा तर ठाणे येथील एका पोलीस स्टेशनने गणेशोत्सवात या 'लोकमंत्री' तमाशाचे आयोजन केले. ज्या पोलिसांनी हा प्रयोग ठरवला, त्यातील बहुतेक सातारा परिसरातील म्हणजे अण्णा भाऊंच्याच भागातील होते. या प्रयोगाच्या निमित्ताने अण्णा भाऊ आयतेच पोलिसांच्या हाती लागतील, अशी शंका गव्हाणकरांना आली. त्यांनी ती पोलिसांजवळ बोलूनही दाखवली. पण 'असं काही होणार नाही' असा शब्द पोलिसांनी दिला. झालेही तसेच. पोलिसांनी आपला शब्द पाळला. अनेक ठिकाणी 'लोकमंत्री'चे प्रयोग झाले. दर वेळी अण्णा भाऊंनी पोलिसांना गुंगारा दिला. कधी ते हमालाच्या वेषात प्रयोगाठिकाणी हजर होत, तर कधी

सातारी फेटा-धोतर घालून येत. या वेषात ते ओळखू येत नसत. स्टेजवर अण्णा भाऊंची भूमिका दुसरी कोणती तरी व्यक्ती करते आहे, अशी आवई पसरवली जायची. प्रयोग बिनदिक्कत पार पडत असे. आपल्या कामासंबंधी, कलेविषयीची तन्मयता अण्णा भाऊंच्या ठायी होती. कामातील आनंद आणि प्राप्त परिस्थितीतील थरारकता ते अनुभवत होते. वॉरंट निघाल्यावर नाही म्हटले तरी त्यांना असुरक्षित वाटत होते. याबाबत शंकर भाऊ लिहितात- 'अण्णा फुकटच्या मरणाला फारच भीत होते. ते म्हणत की, प्रत्येक माणसाला मरण हे येणारच आहे. ते केव्हाही

मध्यभागी अमर शेख आणि उजवीकडे अण्णा भाऊ साठे

चुकणार नाही. पण माणसाने काही तरी कारणाने मरावे आणि काही तरी करून मरावे की, ज्यामुळे तुमचे नाव मागे राहील.' (पृ. १०४)

अखेरच्या काळात अण्णा भाऊ फारच विमनस्क झाले होते. आपल्या जीवनात काही अर्थ नाही, असे त्यांना वाटत होते. त्याला कारणंही तशीच होती. नंतरच्या काळात कलापथकातील लोकांनी त्यांना दगा दिला होता. दुसरी पत्नी त्यांना तडकाफडकी सोडून गेली. जवळपास वीसेक वर्षे सोबत राहून तिनं अकस्मात हा निर्णय घेतला होता. पहिल्या पतीपासून तिला दोन मुली होत्या. पैकी मोठी मुलगी अण्णा भाऊंपासून फुटून गेलेल्या दुसऱ्या गटात सामील होऊन, त्यांच्या कलापथकात सक्रिय झाली. पहिल्या पत्नीच्या हेकटपणाला ते कंटाळले होते आणि मित्रांनी लुबाडणूक केल्यामुळे ते निराश झाले होते. 'फकिरा' चित्रपटाची कथा, पटकथा, गाणी त्यांनी लिहिली होती. त्यात अभिनयही केला होता. पण निर्मात्याने फक्त लेखनाचा आणि अभिनयाचा श्रेयनामावलीत उल्लेख केला. दिशाभूल झाल्यामुळे चित्रपटाचे हक्क ते गमावून बसले. कर्जबाजारी झाल्यामुळे सगळे व्यवहार फिसकटले. यामुळे ते दारूच्या आहारी मोठ्या प्रमाणात गेले. या सर्व गोष्टींना कंटाळून त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार येत असत, पण त्यांनी आत्महत्या केली नाही. आत्महत्येमुळे लोकांमध्ये संभ्रम तर निर्माण होईलच- पण जवळच्या लोकांनाही त्रास होईल. या जाणिवेतून त्यांनी आत्महत्या न करण्याचा निर्णय घेतला. दि.१८ जुलै १९६९ रोजी अण्णा भाऊंचे निधन झाले. निधन कशामुळे झाले त्याचा उल्लेख शंकर भाऊंनी केला नाही. अण्णा भाऊंच्या निधनावेळी शंकर भाऊ वाटेगावला होते. त्यांना अंत्यविधीसाठी वेळेवर हजर राहता आले नाही. दि.१९ जुलैला कोल्हापूर-मुंबई एसटीने त्यांनी मुंबई गाठली. पण त्या वेळी ते ठाणे येथे पोचले. गोरेगावला गेले नाहीत. दुसऱ्या दिवशी म्हणजे २० जुलैला सकाळी दहा-अकराच्या सुमारास ते गोरेगाव दहनभूमीवर पोचले. त्यांच्यासोबत गावापासूनच अण्णा भाऊंचा मुलगाही होता. अण्णा भाऊंचे अंत्यदर्शन ते घेऊ शकले नाहीत, मात्र अस्थिदर्शन झाले. अण्णा भाऊ १९६६ पासून जे जीवन जगत होते, ते त्यांना मृत्यूसमान वाटत होते. म्हणून त्यांनी स्वतः आत्मचरित्र लिहिण्यास सुरुवात केली होती. 'मृत्यूकडून जीवनाकडे' असे शीर्षक त्यांनी योजले होते.

अण्णा भाऊंना उत्तरायुष्यात महाराष्ट्र शासनाने गोरेगाव येथे घर उपलब्ध करून दिले होते. त्या ठिकाणी राहून निवांत लेखन करीत राहावे, असा त्यांचा मानस होता. पण चिरागनगर झोपडपट्टीतील खोली सोडण्याची इच्छा होत नव्हती. वीस-बावीस वर्षे ते या झोपडपट्टीत राहत होते आणि मानसिक दृष्ट्या ते या ठिकाणी रमले होते. ज्या खोलीत त्यांनी कथा, कादंबऱ्या, लोकनाट्ये यांची निर्मिती करून नाव मिळवले होते, त्या ठिकाणी त्यांचे मन गुंतले होते. तिथे असणारी प्रतिकूलता त्यांच्या अंगवळणी पडली होती- किंबहुना, ती प्रतिकूलता आहे, असे त्यांना मुळी वाटतच नव्हते. शासन दरमहा रुपये तीनशे मानधन त्यांना देत असे. त्यामुळेही त्यांच्या आवश्यक गरजा भागत होत्या. त्यांना नाव मिळाले, पण संपत्ती मिळाली नाही. प्रकाशकांनी त्यांची पुस्तके प्रकाशित केली. प्रकाशकांनी व्यवसाय केला, पण हवा तसा आर्थिक हात त्यांना दिला नाही. अण्णा भाऊदेखील त्याबाबत काटेकोर नव्हते. आपल्या मृत्यूच्या काही महिने आधी मात्र ते गोरेगावच्या घरी राहायला गेले होते.

अण्णा भाऊंच्या शिक्षणाबद्दल मत-मतांतरे आहेत. शंकर भाऊ यांच्या या पुस्तकात अण्णा भाऊंच्या शिक्षणासंबंधी अचूक माहिती मिळत नाही. 'अण्णांचे शिक्षण बघावे तर ते फक्त दीडच दिवस शाळेत गेले होते, असे मला आमची आई सांगत होती. परंतु अण्णा मात्र स्वतःचे तिसरी-चौथीपर्यंत शिक्षण झाले आहे, असं सांगत.' (प्रस्तावना). अर्थात या आठवणीच आहेत. काळाच्या ओघात त्यातील नेमकेपणा हरवण्याची शक्यता गृहीत धरता येते. पण शंकर भाऊंनी याबाबत साक्षेपी शोध घेतलेला नाही. शंकर भाऊंच्या मर्यादा लक्षात घेता, याबाबत वाचक असमाधानीच राहतो. मात्र शाळेच्या पहिल्याच दिवशी दुपारच्या सत्रात मास्तरने अण्णा भाऊंच्या हाताच्या बोटांना छडीचा मार दिल्याची आठवण ते सांगतात. पहिल्याच दिवशी अक्षरं गिरवून ओळखणे शक्य नसताना मास्तरने तशी अपेक्षा करणे न समजण्यासारखे आहे. तिरीमिरीत येऊन अण्णा भाऊ मास्तरला दगड फेकून मारतात. माराच्या भीतीमुळे अण्णा भाऊ शाळेत जायला नकार देतात. शाळेचे मास्तर थेट संस्थानच्या पंताच्या कानांवर अण्णा भाऊंच्या दगडफेकीचं प्रकरण घालतात. त्यांची तक्रार करताना मात्र त्यांनी केलेली शिक्षा सांगण्याचं टाळतात. अण्णा भाऊ, त्यांचे वडील यांना पाचारण केलं जातं. या वेळी त्यांचे वडील मास्तरने केलेल्या शिक्षेचं

स्वरूप आणि अण्णा भाऊंची बोटं पंतांना दाखवतात. पंत काय ते समजतात. मास्तरला समज मिळते, पण अण्णा भाऊंचं मन शिक्षणावरून उडतं. ते रमत नाही. नाही म्हणायला, एकदा ते मित्रासोबत शाळेत जाऊन मास्तरला दम देतात. 'माझ्या शिक्षणात खंड पाडण्याचं कारण तुम्ही आहात आणि तुम्हाला या गावातून घालवल्याशिवाय मी राहणार नाही,' अशी धमकीही देतात. संध्याकाळी मास्तर घाबरून त्यांच्या वडिलांच्या कानांवर हे प्रकरण घालण्यासाठी घरी येतात. दरम्यान, त्यांचे वडील कामासाठी मुंबईला गेलेले असतात. आई मास्तरची काही तरी समजूत काढते. 'पोराटोरांचं मनावर घेऊ नका म्हणते.'

अण्णा भाऊंच्या वडिलांनी रोजीरोटीसाठी मुंबई जवळ केली आहे. त्यांच्या वडिलांनीही मुंबईत राहून मोलमजुरी केलेली होती. मुंबईत ब्रिटिशांच्या बंगल्यावर माळीकाम करून ते आपला चरितार्थ चालवतात आणि गावाकडे नियमित पैसे पाठवतात. त्यामुळे गावातील मांगवाड्यातील लोकांची जी सतत परवड होत असे, तशी त्यांच्या कुटुंबाची होत नाही. दोर वळण्याचं काम मांगवाड्यात बारा महिने सुरू असतं. तसं काम त्यांच्या घरी होत नाही. तुलनेनं त्यांना फार कष्ट करावे लागत नाहीत. गाई-गुरं ते चारतात. प्रसंगी मित्रांसोबत शेंगा, मिरच्या इतरांच्या शेतातून चोरून आणतात. अशा चोऱ्यामाऱ्या ग्रामीण भागात सतत होत असतात. त्यात काय नवीन नाही. हातावर पोटं असणाऱ्या कष्टकरी कुटुंबातील मुलं खाण्या-पिण्याचे जिन्नस सर्रास लांबवतात. ज्या वयात अण्णा भाऊ हे करतात, त्या वयात तर ही सामान्य बाबच म्हणायला हवी. पण तक्रारीचं वाढतं प्रमाण लक्षात घेता, त्यांना मुंबईला धाडायला हवं, असं त्यांच्या आईच्या मनात येतं. पुढं वडील मुंबईहून गावी आल्यावर सगळ्यांनीच मुंबईला जायचं, असं ठरतं. मुंबईला जाण्यास ते राजी नसतात. 'तुम्ही सगळे मुंबईला जा, मी एकटाच गावी राहतो' असं वडिलांना सांगतात. 'एकट्या मुलाचा गावी कसा निभाव लागावा? कोणी त्याला खाऊ-पिऊ घालावं?' ही आईच्या मनातील शंका तिला स्वस्थ बसू देत नाही आणि दसरा संपताच सगळं कुटुंब गाव सोडतं. सगळ्या कुटुंबाचा वाटेगाव ते मुंबई हा पायी प्रवास शंकर भाऊंनी विस्ताराने सांगितला आहे. शंकर भाऊ वडिलांच्या कडेवर, एक बहीण आईच्या कडेवर, अण्णा आणि एक बहीण आई-वडिलांसोबत वाटेगाव, सातारा, कराड, पुणे, खंडाळा घाट, कल्याण, मुंबई- असा हा प्रवास जवळपास तीन महिन्यांचा आहे. वाटेत कामासाठी ठिकठिकाणी मुक्काम करीत मजल-दरमजल करीत या कुटुंबानं मुंबई गाठली. या प्रवासातील घटना-घडामोडी उद्विग्न करणाऱ्या आहेत. गरीब, कष्टकरी आणि त्यातही अस्पृश्य लोकांचं जगणं किती वेदनादायी आहे, हे पाहून विचारी माणसाचं अंतःकरण अस्वस्थ झाल्याशिवाय राहत नाही.

सगळ्या आप्तस्वकीयांमध्ये शंकर भाऊंवर अण्णा भाऊंचा जास्त विश्वास आहे. कित्येकदा तो त्यांनी त्यांच्याजवळ बोलूनही दाखवला आहे. शंकर भाऊ अनेक वर्षे मुंबईला राहिलेत. ठिकठिकाणी कामं केलीत. मुंबईतील संघर्ष, हाल-अपेष्टा त्यांनी अनुभवल्या आहेत. अण्णा भाऊंच्या कलापथकात सहभागी असल्यामुळे त्यांनी अण्णा भाऊ आणि सहकाऱ्यांसोबत महाराष्ट्र पिंजून काढला आहे. अण्णा भाऊंचे सोनेरी दिवस त्यांनी जवळून पाहिले आहेत. त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात प्रेम, आदर आहे. त्यांच्या न आवडणाऱ्या गोष्टीविषयी त्यांनी कुठेही कडवट प्रतिक्रिया दिलेली नाही. प्रत्येक प्रसंगात ते त्यांना समजावून घेण्याचा प्रयत्न करतात. शंकर भाऊ हेदेखील मुंबईतील कष्टकरी कामगार आहेत. काम केलं तरच उदरनिर्वाह होऊ शकतो, अशी स्थिती आहे. या स्थितीतच माणसं एकमेकांना धरून असतात. त्यांच्या नात्यात ओलावा असतो. हा ओलावा या पुस्तकातून प्रकट झाला आहे.

डॉ. मनोहर जाधव, पुणे
manohar2013@gmail.com
Mob. 9822850290

(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मराठीचे वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या मनोहर जाधव यांनी कविता व समीक्षा हे दोन लेखनप्रकार प्रामुख्याने हाताळले आहेत. 'दलित स्त्रियांची आत्मकथने' हा विषय त्यांनी पीएच.डी.साठी घेतला होता.)

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

प्रगतिशील लेखक-नाट्य चळवळ आणि अण्णा भाऊ साठे

लक्ष्मीकांत देशमुख

अण्णा भाऊ साठे यांच्या या जन्मशताब्दी वर्षात त्यांचे जीवन, साहित्य आणि कार्यकर्तृत्व यावर विविध अंगांनी वेध घेणारे लेख व साहित्य विपुल लिहिले गेले आहे आणि त्याद्वारे त्यांचं मोठेपण व देश-समाजाला त्यांनी दिलेल्या योगदानाला पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे; पण माझ्या मते, त्यात एक भाग राहून गेला आहे. तो म्हणजे- त्यांचं भारतीय साहित्यातील पुरोगामी वळणाचे 'प्रगतिशील लेख संघ' (प्रलेसं) आणि कलेचा प्रबोधनासाठी वापर करण्यासाठी निर्माण झालेले 'जननाट्य मंच' अर्थात 'इप्टा' (इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन) या दोन कम्युनिस्टप्रणीत संस्थांतलं त्यांचं स्थान, योगदान आणि त्यांच्या विचार-तत्त्वज्ञानाला दिलेलं नवं वळण. अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनातल्या या एका रोमहर्षक पर्वाकडे दलित चळवळीनं जसा काणाडोळा केला तसंच इंग्रजी-हिंदी-उर्दूमध्ये प्रगतिशील लेखक संघ (प्रलेसं) आणि इप्टाबाबत झालेल्या विपुल लेखनातही अण्णा भाऊ साठेंचे नाव जरूर येतं, संदर्भ पण येतात; मात्र पुरेशा तपशिलानं त्यांचं योगदान त्यातही शब्दबद्ध झालेलं नाही. स्वत: अण्णा भाऊंनी पण त्यावर काही लिहिलं नाही- अगदी त्यांच्या 'माझा रशियाचा प्रवास' या (भारतीय साहित्यानं नोंद घ्यावी अशा) पहिल्या दलित प्रवास- वर्णनातही त्याबाबत काही मजकूर नाही. त्यामुळे विविध पुस्तके व लेख-आठवणींत (तेही प्रामुख्याने इंग्रजी-हिंदी भाषेतील लेखात) अण्णा भाऊ साठे यांचे जे काही संदर्भ आले आहेत, त्या आधारे आणि त्यांच्या साहित्याचा मागोवा घेत प्रलेसं व इप्टाशी त्यांचा असलेला संबंध व योगदान यावर हा लेख लिहीत आहे.

त्यासाठी प्रथम संक्षेपानं 'प्रगतिशील लेखक संघ' (प्रलेसं) आणि 'इप्टा' या दोन्ही संस्थांचा इतिहास, साहित्य व नाट्यकलेला त्यांनी दिलेलं नवं वळण समजावून घेणं आवश्यक आहे. १९१७ ची मार्क्स विचारधारा शिरोधार्य मानणारी बोल्शेव्हिक क्रांती सोव्हिएत युनियनमध्ये झाली आणि जगातील अनेक तरुण, विचारवंत आणि कलावंतांचं तिनं लक्ष वेधून घेतलं. वर्गविहिन, शोषणमुक्त व खऱ्या अर्थानं स्वतंत्र असं 'साम्यवादी जग' निर्माण होण्याची सोव्हिएत युनियनमधील क्रांती ही सुरुवात होती आणि जगातले सारे कामगार एक होऊन निर्घृण व शोषण करणारी भांडवलशाही नष्ट करतील, याचा हा प्रारंभ आहे- अशी भावना जगभरातील बुद्धिजीवी डाव्या विचारांच्या माणसांत निर्माण झाली होती. युरोपात शिकलेल्या व इतिहासाचं डोळस भान असणाऱ्या उदारमतवादी पंडित नेहरूंनाही त्या भावनेची मोहिनी पडली होती. त्यामुळे भारतात कम्युनिस्ट चळवळ रुजणं स्वाभाविक होतं. पुन्हा पी.सी. जोशी या द्रष्ट्या कम्युनिस्ट नेत्यानं मार्क्सवादी कलाविचार हा मानवमुक्तीच्या लढ्यासाठी कलावंतांमध्ये भरवून,

सामान्यांच्या मनात रुजवून त्यांना क्रांतिप्रवण करण्यासाठी प्रोग्रेसिव्ह रायटर्स मूव्हमेंटचा- प्रगतिशील लेखक चळवळीचा- पाया घातला आणि उर्दू-हिंदीमधील एक फार मोठा लेखक-कवींचा वर्ग या चळवळीत सामील झाला. प्रेमचंदसारखा दिग्गज लेखक १९३६ मध्ये लखनौमध्ये झालेल्या पहिल्या प्रगतिशील लेखक संमेलनाचा अध्यक्ष होता. त्यांनी 'साहित्य का उद्देश' या शीर्षकाचं जे अध्यक्षीय भाषण केलं, ते आज ऐंशी वर्षे झाली तरी प्रासंगिक आहे. या चळवळीला पंडित नेहरू व गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचा पाठिंबा होता. त्यामुळे प्रगतिशील लेखक चळवळीचा दबदबा व मार्क्सचा कलाविचारदेशभर वाढत गेला. कलावंतांनी सामान्य कष्टकरी जनतेच्या आवाज बनून त्यांची दु:खं सहृदयतेने समजून घेत प्रगट केली पाहिजेत व त्यांना जगण्याचं बळ दिलं पाहिजे, हा नवा मार्क्सप्रणीत साहित्यविचार भारतीय साहित्यात दृढ झाला. प्रेमचंदांनी 'हमे खूबसुरती का मय्यार बदलना होगा' असं म्हणत श्रमिक कामगारांच्या घामात सुगंध आणि अहर्निश काम करणाऱ्या

प्रलेस आणि इप्टाच्या चळवळीत मराठीतले अण्णा भाऊ साठे हे एकमेव साहित्यिक-कलावंत सहभागी होते. इप्टाशी संलग्न १९४४ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या शेतकरी अधिवेशनात 'लाल बावटा' हे कलापथक स्थापन झाले. त्यात अण्णा भाऊ साठेंसोबत अमर शेख व द.ना. गवाणकर हे तीन शाहीर होते. या त्रिमूर्तींनं पूर्ण महाराष्ट्र पिंजून काढीत मार्क्सवादाचा वर्गविग्रहाचा सिद्धांत आणि शोषक-शोषितांचा संघर्ष लोककलेच्या माध्यमातून- पोवाडे व तमाशाच्या माध्यमातून- सामान्य गरीब बहुजन वर्गापर्यंत पोचवला. गिरणी-गोदीत काम करणाऱ्या कामगारांना कम्युनिस्ट पक्षाशी जोडण्याचं महत्त्वाचं काम 'लाल बावटा' कलापथकानं केलं!

स्त्रीच्या राठ पडलेल्या तळहातांवरील रेषांच्या जाळ्यात सौंदर्य पाहणं म्हणजे सौंदर्यबोध- असं नवं पुरोगामी तत्त्व प्रस्थापित केलं. त्यामुळे गरीब शेतकरी, शोषणाला बळी पडणारा कामगार आणि पुरुषप्रधान व्यवस्थेमुळे दुय्यमत्व भोगणाऱ्या स्त्रीचं दु:ख, वेदना व संघर्षाचं प्रतिबिंब भारतीय साहित्यात- खासकरून उर्दू साहित्यात- जोरकसपणे पडायला प्रारंभ झाला होता.

या चळवळीनं उर्दूसोबत हिंदी साहित्याला नवं वळण दिलं. तसेच तिचा प्रभाव पंजाबी, बांगला आणि दक्षिणेतील मल्याळम या भाषांतील साहित्यावर पडला होता. त्यातून 'समाजवादी वास्तवता' (सोशलिस्टिक रिॲलिझम) या तत्त्वज्ञानाच्या आधारे समाजातील मूलभूत अंतर्विरोधाचा अचूक आणि समग्र वेध घेणारे साहित्य निर्माण झाले. प्रेमचंदांनी जो 'साहित्य का उद्देश' सांगितला होता, तो विचार अंतरंगी मुरवून (इंटर्नलाईज करून) १९३५ ते १९६० या कालखंडात वैश्विक भान असलेले सकस साहित्य लक्षणीय संख्येने निर्माण झाले.

पण या प्रगतिशील लेखक संघाच्या चळवळीत महाराष्ट्र प्रलेसचे मुख्य केंद्र मुंबईत असूनही अण्णा भाऊ साठे यांचा (आणि काही प्रमाणात मामा वरेरकरांचा) अपवाद वगळता अन्य लेखकवर्ग सामील झालेला नव्हता. त्या वेळी १९४० च्या दशकात मराठी साहित्यात दोन वाद गाजले होते. पहिला वाद म्हणजे ना.सि. फडके विरुद्ध वि.स. खांडेकरांचा 'कलेसाठी कला की जीवनासाठी कला?' हा लुटीपुटीचा व अंतिमत: रंजनवादी साहित्याचीच री ओढणारा वाद होय. दुसरा वाद म्हणण्यापेक्षा नवकथा-काव्याची चळवळ एका ठरावीक वर्तुळात फिरणारी- मनोविश्लेषणवादी, अनुभूतीची टोकदार अभिव्यक्ती या परिभाषेत अडकलेली. दलित-वंचित-पीडित समाज, जो भारतात बहुसंख्य- बहुजन आहे त्याला या दोन्ही साहित्यप्रवाहांत अभावानंच स्थान होतं. हे असं का घडलं असावं? एकच कारण संभवतं. तत्कालीन साहित्यिकांना फुले विचार, आंबेडकरी चळवळ, मार्क्सवाद आणि गांधीप्रणीत भारतीय विचार (या चारही विचारांनी तत्कालीन भारतीय साहित्य प्रभावित होत असताना) यांची वाटणारी ॲलर्जी किंवा त्याकडे पाठ फिरवण्याची रंजनवाद- शरण अभिजनवृत्ती. मराठी साहित्याची ही कोंडी फुटायला १९६० चं दशक उजाडावं लागलं, जेव्हा दलित साहित्य जोरकसपणे अवतरलं- जे माझ्या मते समाजवादी वास्तवाचं प्रतिबिंबित झालेलं- एक

प्रकारे प्रलेस विचारातलं साहित्य आहे.

मार्क्सवादप्रणीत दुसरी महत्त्वाची चळवळ म्हणजे जननाट्य मंच- पीपल्स थिएटर, अर्थात इप्टा. तिची बीजं प्रलेस चळवळीत दिसतात. १९४० मध्ये स्थापन झालेली कलकत्त्याची 'युथ कल्चरल इन्स्टिट्यूट', बेंगलोरचं पीपल्स थिएटर इ. १९४२ च्या बंगालच्या लाखो लोकांचा उपासमारीनं बळी घेणाऱ्या दुष्काळानं सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या तत्कालीन कलावंतांनी बंगालच्या दुष्काळासाठी नाट्यप्रयोगातून भरीव निधी जमा केला. त्यासाठी देशभरात विविध प्रांतांत कला-सांस्कृतिक पथकं स्थापन झाली. तेव्हा कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस पी.सी. जोशी हे द्रष्टे नेते होते. त्यांची साहित्य व सांस्कृतिक जाण विलक्षण होती. मानवमुक्तीचा मार्ग हा शोषणमुक्तीनेच साध्य होतो आणि त्यासाठी शोषित हा पेटून उठला पाहिजे व कृतिप्रवण झाला पाहिजे. त्यासाठी त्याला सुबोध भाषेत मार्क्सवाद समजावून सांगण्यासाठी भारताच्या समृद्ध लोककलेचे माध्यम उपयुक्त ठरेल, हे त्यांनी अचूकपणे ओळखलं. पुन्हा बंगालला मदत करण्यासाठी देशभर जे कलापथक सामाजिक बांधिलकीनं निर्माण झालं होतं; त्यांना एका मार्क्सप्रणीत कला-साहित्य विचारात गुंफून देशव्यापी नाट्य-कला चळवळ उभारण्याची आवश्यकता पी.सी.ना वाटली आणि मुंबईच्या मारवाडी हायस्कूलच्या प्रांगणात देशभरच्या कलावंतांच्या सहभागानं संपन्न झालेल्या एका खास अधिवेशनात 'इप्टा'ची स्थापना २५ मे १९४३ रोजी झाली. जननाट्य मंच (पीपल्स थिएटर) हे नाव जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ होमी भाभांनी दिलं, जे त्यांना रोमा रोलाँडच्या 'पीपल्स थिएटर संकल्पना' विशद करणाऱ्या पुस्तकावरून सुचलं होतं. या अधिवेशनाचे अध्यक्ष होते बंगालचे प्रा. हिरेन मुखर्जी. त्यांनी या वेळी एक प्रेरक संदेश सर्व कलावंतांना दिला. ते म्हणाले, ''या सर्व लेखक-कलावंतांनो, अभिनेते व नाटककारांनो- जे-जे हात आणि मेंदूने काम करतात, ते सारे-सारे या आणि स्वत:ला सामाजिक न्याय व स्वातंत्र्य देणाऱ्या एका नव्या धाडसी जगाच्या निर्मितीसाठी स्वत:ला वाहून घ्या.'' ('Come writers and the artist, come actor and the play-writer, come all who work by hand or by brain, dedicate yourself to the task of building a brave world of freedom and social justice.') इप्टाचं मिशन स्टेटमेंट-घोषवाक्य होतं, 'जननाट्य मंचाचे तारे लोक आहेत.' (Peole's Theatre stars the People.) आणि लोगो होता दोन्ही हातांनी ड्रम किंवा ढोलकं वाजवणारा कलावंत. कारण हलगी वाजवत गावात खबर देण्याची परंपरा होती, तिचं हे आधुनिक आविष्करण पीपल्स थिएटरसाठी सार्थक होतं!

प्रलेस आणि इप्टाच्या चळवळीत मराठीतले अण्णा भाऊ साठे हे एकमेव साहित्यिक-कलावंत सहभागी होते. इप्टाशी संलग्न १९४४ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या शेतकरी अधिवेशनात 'लाल बावटा' हे कलापथक स्थापन झाले. त्यात अण्णा भाऊ साठेंसोबत अमर शेख व द.ना. गवाणकर हे तीन शाहीर होते. या त्रिमूर्तींनं पूर्ण महाराष्ट्र पिंजून काढीत मार्क्सवादाचा वर्गविग्रहाचा सिद्धांत आणि शोषक-शोषितांचा संघर्ष लोककलेच्या माध्यमातून- पोवाडे व तमाशाच्या माध्यमातून- सामान्य गरीब बहुजन वर्गापर्यंत पोचवला. प्रामुख्याने मुंबईत देशावरून- खास करून पश्चिम महाराष्ट्र व कोकणातून आलेल्या व गिरणी-गोदीत काम करणाऱ्या कामगारांना कम्युनिस्ट पक्षाशी जोडण्याचं महत्त्वाचं काम 'लाल बावटा' कलापथकानं केलं! पण ही शाहीर त्रिमूर्ती आणि एक नाटककार मामा वरेरकर वगळता या जननाट्यमंचच्या चळवळीशी मराठी कलावंत व नाटककार जोडले गेले नाहीत, हा इतिहास आहे.

दि.१ ऑगस्ट १९२० रोजी अण्णा भाऊ साठे यांचा जन्म वाटेगाव, जिल्हा सांगली येथे झाला. अनुसूचित जातींमधल्या मातंग समाजात जन्मलेले अण्णा भाऊ यांना दारिद्र्यासोबत वर्णव्यवस्थेचे चटके बालपणापासूनच सोसावे लागले होते. अनुदार व जात्यंध्य शिक्षकामुळे ते शाळेत केवळ दीडच दिवस टिकले, पण गावकुसाबाहेरच्या संघर्षपीठात आणि पुढे वयाच्या अकराव्या वर्षी मुंबईला आल्यावर वास्तव्य असणाऱ्या लेबर कॅम्पच्या कामगारपीठात त्यांचं खरं शिक्षण झालं. जनार्दन वाघमारेंनी कामगारांसाठी प्रसिद्ध असलेल्या (आता ज्याचं टोलेजंग इमारती व मॉल्समध्ये रूपांतर झालं आहे) गिरगावचा संदर्भ देत 'अण्णा भाऊ साठे गिरणगाव विद्यापीठात शिकले, ज्याचे कुलगुरू मॅक्झिम गॉर्की होते' असं सार्थ वर्णन केलं आहे.

भाकरीच्या शोधात अण्णा भाऊ साठे यांचे वडील अन्य कुटुंबीयांसह मुंबईला आले आणि मुंबईत लेबर कॅम्पमध्ये राहू लागले. इथेच वयाच्या अकराव्या वर्षी अण्णा भाऊंनी मार्क्सवादाची वैचारिक बांधिलकी स्वीकारत कम्युनिस्ट पक्ष जवळ केला. शेवटपर्यंत ते कम्युनिस्ट पक्षाचे कॉम्रेड होते, हे आज बहुसंख्य साठेप्रेमी जनतेला माहीत पण नाही. 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : निवडक वाङ्मय' या महाराष्ट्र

राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत संपादकीय लिहिताना कविवर्य अर्जुन डांगळे यांनी अण्णा भाऊंच्या या कालखंडावर आणि वैचारिक जडण-घडणीवर थोडासा प्रकाशझोत टाकला आहे, त्यातला काही भाग खाली उद्धृत केला आहे :

'कॉम्रेड शंकर पगारेंचा लोककलेतून कम्युनिस्ट चळवळ कामगारवर्गात रुजविण्याचा विश्वास अण्णा भाऊंनी आपल्या शाहिरीनं सार्थ केला, हा इतिहास आहे. पाठपुरावा, उत्तेजन व बक्षीस देणे या आयुधांचा वापर करून अण्णा भाऊ साठेंमधला लोककलावंत पगारेंनी फुलवला आणि त्यांच्याकडून बरीच वगनाट्य लिहून घेतली. अण्णा भाऊ साठे यांनी त्यांचा मावसभाऊ बापू साठे यांनी सांगितलेल्या एका लोककथेच्या आधारे लेबर कॅम्पमध्ये कामगारजीवन जगत असताना 'अकलेची गोष्ट' हा पहिला वग लिहिला. त्याचा प्रयोग परळला कम्युनिस्ट पक्षाचे कार्यालय जिथे होते, त्या दळवी बिल्डिंगच्या गच्चीवर झाला. त्या प्रयोगाला कम्युनिस्ट पक्षाचे दिग्गज नेते कॉ.गंगाधर अधिकारी, बी.टी. रणदिवे आणि मुख्य म्हणजे पी.सी. जोशी- जे त्या वेळी कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस होते, ते उपस्थित होते. त्या सर्वांना अण्णा भाऊ साठेंच्या लेखणीचे सामर्थ्य जसे जाणवले, तसेच त्यांची तमाशा व लोककलेवरची हुकूमत जाणवली. तो प्रयोग सामान्य कामगार प्रेक्षकांचं मनोरंजनासोबत प्रबोधन करणारा होता, हे पी.सी. जोशींच्या कलावान सांस्कृतिक नजरेनं हेरलं आणि पुढे त्यांच्यामुळे अण्णा भाऊ साठे प्रथम कम्युनिस्ट पक्षात आले, मग प्रलेस व इप्टामध्ये लेखक-शाहीर म्हणून काम करू लागले.

पण त्यांच्या मनात मार्क्सवादाचं बीजारोपण गावी असताना पत्री सरकारफेम क्रांतिवीर नाना पाटल यांच्या भाषणामुळे झालं होतं. त्याचाही रोचक किस्सा- खरा घडलेला आहे. मुंबईत आल्यावर कम्युनिस्ट पक्षात प्रवेश करण्यापूर्वी वडिलांच्या निधनानंतर काही काळ अण्णा भाऊ गावी आले होते आणि बापू साठेंसोबत तमाशा प्रयोग करीत होते. एका प्रयोगाच्या वेळी मंचावर नाना पाटील अचानक आले आणि त्यांनी ब्रिटिश सरकारच्या शोषणकारी धोरणावर त्यांच्या खास रांगड्या शैलीत टीका करीत गिरणी कामगारांच्या होणाऱ्या पिळवणुकीबाबत भाष्य केलं, तसंच नवभांडवलदारवर्गाची निर्भर्त्सना केली. त्यांच्या भाषणाचा अण्णा भाऊ साठेंवर खोल परिणाम झाला होता. त्याची परिणिती १९४२-४३ मध्ये 'अकलेच्या गोष्टी'मुळे पी.सी. जोशी, रणदिवे, पगारे आदींच्या प्रयत्नातून सहजपणे कम्युनिस्ट पक्षात सामील होण्यात झाली.'

आता विविध आठवणींवजा लेख, संदर्भ आणि जाता-जाता केलेल्या उल्लेखांतून जी माहिती मिळते, ती जोडून मी अण्णा भाऊ साठे यांच्या प्रलेस व इप्टाच्या कालखंडावर वस्तुनिष्ठ प्रकाश टाकायचा प्रयत्न करणार आहे.

कम्युनिस्ट पक्षाची मुंबईजवळ (बहुतेक) टिटवाळा येथे १९४४ मध्ये शेतकरी परिषद भरली होती. त्या वेळी मराठी माणसांच्या प्रबोधनासाठी आणि त्या माध्यमातून कम्युनिस्ट चळवळीची विचारधारा प्रसुत करण्यासाठी 'लाल बावटा' या कलापथकाची स्थापना झाली. तिथे अण्णा भाऊ साठे, अमर शेख व द. ना. गव्हाणकर हे तीन शाहीर एकत्र आले. त्यांनी कम्युनिस्ट चळवळ कामगार-शेतकऱ्यांत रुजवण्यासाठी उभा महाराष्ट्र पिंजून काढला. पुढे या त्रयीचं संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी झालेल्या आंदोलनातील योगदान सर्वश्रुत आहे.

प्रगतिशील लेखक संघाचं पहिलं अधिवेशन १९३६ मध्ये प्रेमचंदाच्या अध्यक्षतेखाली भरलं होतं आणि त्याद्वारे प्रगतिशील लेखक चळवळीचा खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला, असं मानलं जातं. प्रलेसचं चौथं अधिवेशन मुंबईला १९४५ मध्ये संपन्न झालं, ते अनेक अर्थानं ऐतिहासिक ठरलं. त्याचं कारण म्हणजे, मुंबई ही बहुभाषिक नगरी असल्यामुळे इथे हिंदी, उर्दू, मराठी, कन्नड व मल्याळी भाषेतले लेखक-कवींचं एकत्र बसणं, गप्पागोष्टी करत वैचारिक व कला-साहित्य विचारांचं आदान-प्रदान सज्जाद जहिर व अली सरदार जाफरी प्रलेसंच्या मंचाखाली जाणीवपूर्वक घडवून आणत होते. त्यामुळे १९४५ च्या अधिवेशनामध्ये उर्दूसाठी जोश मलिहाबादी, हिंदीसाठी पंडित राहुल सांकृत्यायन, बंगालीसाठी सत्येन मुजुमदार, तेलुगूसाठी पेचाइया आणि मराठीसाठी प्रसिद्ध कम्युनिस्ट नेते व शैलीदार लेखक श्रीपाद अच्युत डांगे यांची प्रदेश भाषाध्यक्ष म्हणून निवड केली आणि या अधिवेशनात पाच अध्यक्षीय भाषणे झाली. त्यात डांगे यांनी इंग्रजीत भाषण करताना 'मराठी भाषा व साहित्यविकास' यावर मूलभूत स्वरूपाचं, आजही लेखक-कवींना मार्गदर्शक ठरेल असं अध्यक्षीय भाषण केलं. ते भाषण या अधिवेशनाचा सर्वांत संस्मरणीय भाग ठरला. त्यांच्या भाषणाची नंतर पुस्तिकाही प्रकाशित झाली. एका अर्थाने पुढे १९५० च्या दशकात साने गुरुजींनी

आंतरभारतीचा प्रयोग सुरू केला, त्याची ही पूर्ववृत्ती म्हणता येईल.

या अधिवेशनाला अर्थातच अण्णा भाऊ हे प्रलेसचे सदस्य लेखक म्हणून उपस्थित होते, तसेच त्यापूर्वी २५ मे १९४३ मध्ये स्थापन झालेल्या इप्टामध्ये पण ते सामील झाले होते.

प्रलेसचे संस्थापक-सचिव व आयुष्यभर ज्यांनी या चळवळीसाठी काम केलं, त्या सज्जाद जहिरांनी आपले उर्दू पुस्तक 'रौशनाई : तरक्कीपसंद तहरिक की यादे'मध्ये अण्णा भाऊ साठेंच्या प्रलेसमधील सहभागाबद्दल संक्षेपानं महत्त्वाचं निरीक्षण नोंदवलं आहे, ते असं आहे :

'अण्णा भाऊ साठे ने इस जमाने में कई पवाडे (पोवाडे) लिखे। ये मजदूरों के हजारों के मजमे मे (मेळाव्यात) गाए जाते थे और बेहद मकबूल (प्रभावी) थे । स्टालिनग्राड की जंग और उस में हिटलरी फौजों की हार पर जो पवाडा था, उसे खास तौर पर मकबुलियत हासिल हुई।'

या काळात अण्णा भाऊ प्रामुख्याने पोवाडे व तमाशा-वग लिहायचे. त्यांचे 'स्टालिनग्राडचा पोवाडा', 'बर्लिन विजय पोवाडा', 'बंगालची हाक' तसेच 'मुंबई गिरणी कामगार' हे पोवाडे आणि 'मुंबईची लावणी' आदी शाहिरी वाङ्मय याच काळातले. ते स्वत: गाऊन आपल्या रचना हजारो कामगारांपुढे सादर करायचे. पुढे त्यांनी 'तेलंगणाचा संग्राम', 'पंजाब-दिल्लीचा दंगा' हे पोवाडे लिहिले. त्यांचा शाहिरी वाङ्मयाचा गाभा होता कामगार-शेतकऱ्यांचं होणारं शोषण. त्यासाठी कम्युनिस्टप्रणीत साम्यवादी क्रांती, द्वितीय महायुद्धातला हिटलर-मुसोलिनीच्या फॅसिझमचा सोव्हिएत युनियननं केलेला पराभव व त्यातून जगाची केलेली सोडवणूक, हिंदू-मुस्लिम एकता आणि शेतकरी-कामगार हेच आपल्या श्रमातून देश घडविणारे निर्माते आहेत, त्यांना सन्मानानं जगता आलं पाहिजे- हे प्रलेस चळवळीचे विचार व श्रद्धा होती. अण्णा भाऊंची सुबोध पण प्रभावी मराठी भाषा, पोवाडा काव्यप्रकारावरची हुकूमत व तिच्या सर्व सामर्थ्याचा वापर करून श्रोत्यांना प्रबोधन करीत रिझवणं, या दृष्टीने अण्णा भाऊ हे मराठीतले पहिले क्रांतिकारी व पुरोगामी शाहीर ठरतात!

अण्णा भाऊ साठे यांचा 'नानकिंग नगरापुढे' हा चीनचा मार्क्सवादी फौजेच्या विजयाचा पोवाडा आज उपलब्ध नाही. मात्र १९४२ मध्ये लिहिलेल्या 'स्टालिनग्राडचा पोवाडा'नं अण्णा भाऊंना कम्युनिस्ट वर्तुळात लोकप्रिय बनवलं आणि त्यातूनच पुढे स्थापन झालेल्या 'लाल बावटा' या कलापथकात ते सामील झाले. स्टालिनग्राडच्या लढाईत नाझी भस्मासुराचा दारुण पराभव झाला. या युद्धाचं तपशीलवार वर्णन करणारा हा पोवाडा आहे. त्याची सुरुवात लक्षवेधक आहे. रशियाकडे दलितांचा आशाकिरण या स्वरूपात पाहत अण्णा भाऊ पोवाड्याची सुरुवात अशी करतात-

दलितांचा आशाकिरण रशियाचा प्राण
जंगजंगी जान लढविले
रोस्तो आणि खार्को, रक्षिले लेनिनग्राड मास्को
नाझीचा काळ तिमेंशेंक। जीऽ जीऽऽ जीऽऽऽ

या पोवाड्याबाबत बाबूराव गुरव यांनी 'अण्णा भाऊ साठे : समाजविचार आणि साहित्यविवेचन' या पुस्तकात मार्मिक मत नोंदवले आहे. ते असे आहे-

''आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीला अभिमान वाटावा असा कम्युनिस्टांच्या गौरवशाली विजयाचा पोवाडा अण्णा भाऊंनी मुंबईच्या कामगारांसाठी रचून गायला. पोवाड्याची धावती रचना, ओघवती भाषा आणि मांडणीतला वेग यामुळे हा पोवाडा आकर्षक बनला आहे. 'फितुरीची डाकीण'सारखी प्रतिमा, विजयोन्मादाने दारूची नशा चढल्यामुळे रूळ बदलून गडगडा लोळणारी रेलगाडी, गनीम होऊन पाठीमागे लागलेले ओढे-नाले, झाडे, जंगले आणि दिव्यावर पतंगाने झडप घालावी, तसे स्टालिनग्राडवर झडप घालणारे नाझी- अशा काही प्रतिमांमधून अण्णा भाऊंचे प्रभावी भाषेचे वेगळेपण जाणवते. आंतरराष्ट्रीय वर्गाशी अनुबंध जुळवू पाहणारा हा पोवाडा त्यांच्या व्यापक विचारविश्वाची सखोल जाण स्पष्ट करतो.''

'बर्लिनचा पोवाडा' हाही सोव्हिएत युनियनचा विजय व हिटलरचा पाडाव सांगणारा आहे. बाबूराव गुरवांच्या मते, ''आज जरी हे दोन्ही पोवाडे गद्यप्राय वाटत असले, तरी त्या काळी मुंबईच्या कामगारांसाठी त्यांची निर्मिती झाली होती. हे दोन्ही पोवाडे प्रचारी व प्रबोधनपर होते आणि आज ते कालबाह्य झाले आहेत, तरी साहित्याच्या इतिहासाने त्यांची जाणीवपूर्वक नोंद घ्यावी एवढे ते महत्त्वाचे दस्तावेज स्वरूपाचे आहेत.''

स्वतंत्र भारताच्या तेलंगणातील शेतकऱ्यांचा सशस्त्र लढा हा जमीनदारीविरुद्ध कसणाऱ्या शेतकरी कुळांचा कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली लढला गेलेला होता. प्रथम तो निजाम राजवट असताना सुरू झाला, नंतर तो १९५१ पर्यंत

दोन शाहीर : अमर शेख आणि अण्णा भाऊ

सुरू होता. पण भारत सरकारनं तो निर्घृणपणे चिरडून टाकला. या तेलंगणाच्या शेतकरी लढ्यावर अण्णा भाऊ साठेंच्या 'तेलंगणचा संग्राम' हा पोवाडा आहे, तो शेतकरी लढ्याच्या ऊर्ज्वस्वल रूपाचं वर्णन करणारा आहे. मात्र त्यांनी नंतर हा लढा चिरडून टाकला होता, त्यावर काही लिहिलं का नाही, याचं नवल वाटतं.

अण्णा भाऊंचा 'तेलंगणचा संग्राम' हा तेथील कष्टकरी जनतेने दिलेल्या अभूतपूर्व लढ्याला साथ देण्याचं आवाहन करण्यासाठी लिहिलेला ओजस्वी पोवाडा आहे. 'कसेल त्याची जमीन' हा कायदा करावा व सर्व शेतीचे कसणाऱ्या शेतकऱ्यांना वाटप करावं, यासाठी तेलंगणचा शेतकरी लढा होता. ऐकणारा संतापाने पेटून उठावा, असे निजामाच्या व रझाकारांच्या अत्याचारांचे प्रभावी वर्णन या पोवाड्यात अण्णा भाऊ करतात. पुढे लढणारा बहाद्दर शेतकरी डगमगला नाही की भयभीत झाला नाही, हे सांगताना शाहीर अण्णा भाऊ म्हणतात,

परी शेतकरी तेलंगणचा गहूभर नच नमला
सागरापरी निजामावरी उसळुनी वर आला
लोकशाहीसाठी जनतेनं। एक होऊन। लढा उभारिला।।
बेबंद या सुलतानीचा। नाश करण्याचा। पुकारा केला।।
जमीनदारी आणि साहुकारी। क्रूर जहागिरी। चूर करण्याला।।
त्याने निजामाच्या तक्ताला। हैदराबादेला। हादरा बसविला।।
निजामी राज्य बरबाद । दुमदुमला नाद।
उमटे पडसाद । तेलंगण लाले लाल झाला।
वरंगळ नारगोंडा जिल्हा।
सूर्य पेठेत जोम भरला।
चारी बाजूंना उठला शेतकरी । देऊनी ललकारी।

बाबूराव गुरव यांनी पोवाड्यांचं महत्त्व उलगडून दाखवताना असं लिहिलं आहे की–

'हा लढा म्हणजे केवळ तेलंगणमधला उठाव नसून, संस्थानाच्या चाळीस लाख जनतेचा तो मुक्तिसंग्राम आहे. कष्टकरी माणसांच्या अस्मितेचा आणि आकांक्षांचा हा नवा लढा म्हणजे पेटता पलिता आहे, अशा पद्धतीने तेलंगण संग्रामाला वर्गयुद्धाचे शास्त्रीय स्वरूप देण्याचा ते प्रयत्न करतात. जिथे जिथे शोषणमुक्तीचा आवाज उठेल, त्या आवाजाला संघटित वर्गलढ्याचे स्वरूप देण्याचा त्यांचा

प्रयत्न हा प्रगतिशील लेखक चळवळीच्या तत्त्वज्ञानाचा, त्यांच्यावरील गाढ प्रभावाचा द्योतक आहे.'

अण्णा भाऊ साठेंनी शाहिरी काव्य विपुल लिहिलं. खासकरून संयुक्त महाराष्ट्र लढ्यातलं 'लाल बावटा' पथकाद्वारे प्रचार करून दिलेलं त्यांचं योगदान न विसरता येण्याजोगं आहे. त्यांचे 'महाराष्ट्राची परंपरा', 'अमळनेरचे अमर हुतात्मे', 'मुंबई गिरणी कामगार' आदी पोवाडे; 'माझी मैना गावाकडे राहिली'सारखी लावणी आणि 'जग बदल घालुनी घाव। सांगुनी गेले मज भीमराव'सारखे भीमगीत यातून त्यांची अस्सल एतद्देशीय शाहिरी फुललेली दिसून येते. ते सर्वार्थाने शाहीर होते. त्यांनी पारंपरिक पोवाड्यांपेक्षा वर्तमानकाळातील सर्वहारा वर्गाच्या प्रबोधनासाठी शाहिरी काव्य प्रसवले. त्या साऱ्याचा आढावा घेणे या छोट्या लेखाच्या मर्यादेत शक्य नाही; पण एवढं निष्कर्षरूपानं सांगता येईल की, अण्णा भाऊ हे खऱ्या अर्थाने प्रगतिशील लेखक चळवळीच्या तत्त्वज्ञानाचे प्रभावी भाष्यकार होतो. त्याचं हे साहित्यिक योगदान भारतीय पातळीवरचं आहे. प्रेमचंदांनी प्रगतिशील साहित्य म्हणजे काय, हे सांगताना १९३६ च्या पहिल्या प्रलेसच्या गाजलेल्या आपल्या भाषणात म्हटलं होतं, 'साहित्यकार का लक्ष्य केवल महफिल सजाना दर्जा और मनोरंजन का सामान जुटाना नहीं है । उसका अध्यक्षीय इतना मत गिराईए । वह देशभक्ती और राजनीती के पीछे चलनेवाली सच्चाई नही, बल्की उसके आगे मशाल दिखाती हुई चलनेवाली सच्चाई है।' प्रेमचंदांच्या या प्रगतिशील लेखकाच्या व्याख्येत अण्णा भाऊ साठे शंभर टक्के बसतात, हे वेगळं सांगायला हवं?

'इप्टा'मध्ये पण अण्णा भाऊ साठे हे महत्त्वाचे स्थान असलेले कलावंत होते. ते आधी उपाध्यक्ष, मग काही वर्षांनी इप्टाचे अध्यक्षपण बनले जे पद दिग्गज कलावंत पृथ्वीराज कपूर, शंभू मित्रा व बलराज सहानी आदींनी भूषवले होते. त्यांच्या मांदियाळीत अण्णा भाऊ आपल्या शाहिरी कलेनं मानाच्या स्थानी विराजमान होते.

बलराज सहानी त्यांचे खास मित्र होते. त्यांच्या व अण्णा भाऊंच्या संबंधांवर एका लेखात पी.सी. जोशींनी रोचक आठवण कथन केली आहे. ती अशी– 'अण्णा भाऊ बलराज की हर बात को उत्सुकता से ग्रहण करते थे । और अन्य इप्टा साथी, महाराष्ट्र के साथियोंसे, बुद्धिजीवीयों से और मजदूर कामगार भाईयों से भी विचार विमर्श करते थे।' हे निरीक्षण फार महत्त्वाचे आहे. ते यासाठी की, लौकिकार्थानं ते शिकले नव्हते; मात्र अनुभव व मित्र, नेत्यांशी व कष्टकरी मजुरांशी चर्चा करून आपली राजकीय जाण समृद्ध करीत गेले. जीवनसंघर्षातून मार्क्सवादाचे धडे त्यांनी गिरवले होते. मॅक्झीम गॉर्की हे त्यांचे साहित्यिक आदर्श होते. त्यांचा एक पुतळा त्यांच्या घरात होता. त्याखाली बसून ते लेखन करायचे, ही त्यांची साहित्यप्रेरणा सांगणारी सूचक घटना मानायला हवी.

अण्णा भाऊंनी प्रामुख्याने तमाशा–लोकनाट्य हा कलाप्रकार हाताळला. त्यांची दहा लोकनाट्ये साहित्य संस्कृती मंडळात प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या निवडक साहित्याच्या पुस्तकात समाविष्ट आहेत. त्यांनी एकच नाटक लिहिलं होतं, ते म्हणजे 'इनामदार'. ते शेतकऱ्यांचं शोषण व संघर्षाचं दर्शन घडविणारं नाटक आहे. त्याचे मराठीत प्रयोग झाले नाहीत, मात्र इप्टामार्फत हिंदीमधले अनेक प्रयोग त्या काळी झाले आणि ते नाटक कमालीचे लोकप्रिय झाले. त्यात ए.के. हंगल काम करायचे.

आज अण्णा भाऊ आठवले जातात, ते त्यांच्या कादंबऱ्या व कथांसाठी. 'फकिरा'च्या रूपाने त्यांनी मराठी साहित्यात प्रथमच दलित हीरो आणला. त्यांनी सर्व दलितांना– मग ते भटके–विमुक्त असू दे की बलुतेदार असू दे, त्यांना– नायकत्व–नायिकत्व बहाल केलं. त्या अर्थानं त्यांना मराठी दलित साहित्याचे जनक म्हटलं, तर वावगं ठरणार नाही.

अण्णा भाऊ साठेंनी पारंपरिक तमाशाला फाटा दिला आणि आपल्या विलक्षण प्रतिभेने आधुनिक लोकनाट्य या मुक्तनाट्याला जन्म दिला. गवळणीला फाटा देणं, गणात ईशस्तवनऐवजी देश व शिवाजीचं स्तवन करणं याबरोबरच वगनाट्यात आजच्या काळाचं कथानक व कष्टकरी–श्रमकरी पात्रं निर्माण करून त्यांनी आपल्या पुरोगामी व प्रगतीशील कलाविचारांचा पूर्ण सामर्थ्याने प्रत्यय आणून दिला. आजचे लोककलावंत ते विसरून पुन्हा रंजन आणि पारंपरिक नाट्यात गुरफटलेले दिसतात. त्यांच्या कलाकृतीत पासंगालाही पुरोगामित्व नसतं!

अण्णा भाऊ हे शेवटपर्यंत कम्युनिस्ट होते. तरीही त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दलितमुक्तीच्या व जातिअंताच्या लढ्याचे महत्त्व– ते स्वत: दलित मांग समाजाचे असल्यामुळे– ओळखलं होतं, जे कम्युनिस्टांनी कधीच जाणलं नव्हतं. म्हणून त्यांच्या वाङ्मयात 'लाल सलाम'सोबत 'जय भीम'चा सुरेख संयोग झाला आहे.

भारतात केवळ वर्गविहिन समाज निर्माण करून समता येणार नाही; तर जातविहिन समाजही निर्माण झाला, तरच समता व बंधुता येईल आणि शोषणमुक्त समाज होईल, हे त्यांनी जाणलं होतं. म्हणून 'जग बदल घालुनी घाव। सांगुनी गेले मज भीमराव।' असंही त्यांनी कवन केलं, हे लक्षात घेण्याजोगं आहे. त्यांच्या साहित्यात व शाहिरी वाङ्मयात प्रलेसप्रणीत प्रगतिशील-पुरोगामी विचार आणि वर्गविग्रहाच्या सिद्धांतासोबत मानवमुक्तीसाठी जातिअंताची लढाई आवश्यक आहे, असे प्रतिपादनही कथानकाच्या ओघात जोरकसपणे येतं. ते कसं येतं, ते किती प्रचारी- किती कलात्मक आहे व त्याचा सकल एकत्रित परिणाम किती पुरोगामी आशयाच्या अंगाने वाचकांच्या मनावर ठसला जातो, यावर पीएच.डी. करणाऱ्या साहित्याच्या विद्यार्थी-संशोधकांनी पुढील काळात सखोल संशोधन केलं, तर त्यांच्या साहित्यातील प्रगतिशीलता व आंबेडकरप्रणीत विचारधारेचा परिणाम कळेल.

स्वातंत्र्योत्तर काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जातिअंताची लढाई केल्याखेरीज भारतात शोषणमुक्ती संभव नाही, याची अण्णा भाऊंना प्रत्यक्ष काम करताना व वाचन-चिंतनातून जाणीव झाली. त्यामुळे वर्ग आणि जात या दोन्हींची सांगड घालीत 'कास्ट अँड क्लासलेस' समाज निर्माण करण्यासाठी मार्क्सवाद व आंबेडकरवाद या दोन्हीचं मिश्रण असणारा सुवर्णमध्य मार्ग भारतानं अवलंबिला पाहिजे, हा त्यांचा दृढ व पक्व होत गेलेला विचार त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून प्रत्ययास येतो. पण त्यांनी त्यावर स्वतंत्र चिंतनशील लेखन न केल्यामुळे तो विचार समग्रपणे समाजापुढे आला नाही. खरं तर त्यांचा हा विचार उत्तरकाळात म्हणजेच साठोत्तरी कालखंडात प्रगतिशील लेखनास देशपातळीवर नया आयाम देऊ शकला असता. त्यांचं साहित्य, त्यांची काही भाषणे व 'युगांतर' व 'युद्धभूमी'मधले लेख त्या काळी हिंदी-इंग्रजीमध्ये भाषांतरित झाले असते, तर हे होऊ शकलं असतं. मग प्रेमचंदानंतर प्रलेस व इप्टा चळवळीचा दुसरा मोठा भाष्यकार म्हणून के.ए. अब्बासऐवजी किंवा त्यांच्याबरोबरीनं अण्णा भाऊंचं स्थान व महत्त्व प्रस्थापित झालं असतं!

पण वैश्विक भान असणारे अण्णा भाऊ साठे हे 'ग्लोबल' म्हणजे एकाच वेळी लोकल (स्थानिक-जमिनीवरचे) व त्याच वेळी 'ग्लोबल' (वैश्विक-आकाशव्यापी) असे लेखक होते. कारण त्यांचं साहित्य सुमारे दोन डझन परदेशी व भारतीय भाषांत अनुवादाच्या रूपानं नंतरच्या काळात पोचलं. त्याची सुरुवात 'लेनिनग्राडचा पोवाडा', 'चित्रा' (कादंबरी) व 'सुलतान' (कथा) या कलाकृतींच्या रशियन भाषांतरानं झाली होती. त्यामुळे जेव्हा ते रशियात आमंत्रित लेखक म्हणून चाळीस दिवसांच्या दौऱ्यावर गेले, तेव्हा त्यांचं साहित्य रशियन समाजात विस्तृत दूर पोचलं होतं, याची त्यांना पदोपदी जाणीव होत होती. त्यांना मोठा लेखक म्हणून मानाची वागणूक सर्वत्र मिळत होती. त्यांच्याइतका दुसरा कोणताच मराठी लेखक जगात दूरवर आजतागायत पोचला नाहीये, हे सत्य आहे.

त्यामुळे अण्णा भाऊ साठेंच्या अभ्यासकांनी त्यांचं प्रलेस व इप्टाला दिलेलं मौलिक योगदान आणि त्यांनी मार्क्सवाद व आंबेडकरवादाच्या विचारधारेतून वर्गसंघर्षाइतकीच जातिअंताची लढाई लढल्याखेरीज भारतात 'वर्ग व जातविहीन समाज' अर्थात 'क्लास व कास्टलेस सोसायटी' स्थापन होणार नाही, हा विचार समजून घेतला पाहिजे. जे जुने कम्युनिस्ट नेते आजही हयात आहेत किंवा त्यांची पुढील पिढी- ज्यांच्याकडे वाड-वडिलांकडून त्या काळाची माहिती आठवणी, लेख, पत्रे वा वृत्तपत्रीय कात्रणांतून आली असेल, त्यांच्याकडून मिळवून व अभ्यास करून अण्णा भाऊ साठेंचं योगदान व काम नव्या पिढीनं समजून घेऊन ते समग्रतेनं लिहिलं पाहिजे. त्यांच्या उपलब्ध साहित्यातली ही कमतरता भरून काढण्यासाठी कम्युनिस्ट पक्ष, मातंग समाज किंवा अण्णा भाऊ साठेप्रेमी विचारवंत-संशोधकांनी हे काम हाती घेतलं, तर हा अज्ञात इतिहास प्रकाशात येईल. त्याकडे दुर्लक्ष केलं, तर ते इतिहासात हरवून जाईल!

लक्ष्मीकांत देशमुख, पुणे
lawmikant05@yahoo.co.in
Mob. 9325297509

(लेखक व प्रशासकीय अधिकारी या दोन्ही भूमिका सारख्याच ताकदीने व तन्मयतेने निभावलेल्या लक्ष्मीकांत देशमुख यांनी कथा, कादंबरी व ललित वैचारिक या तिन्ही प्रकारांत विपुल लेखन केले आहे, ते बडोदा येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.)

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

वारणेचा वाघ : कादंबरी आणि तिच्यावरील सिनेमा

राजा शिरगुप्पे

अण्णा भाऊंच्या कथांवर एकूण आठ चित्रपट निघाले आहेत, व्यावसायिक अर्थाने हे चित्रपट कमी-अधिक यशस्वी ठरले. त्यात अनेक व्यावसायिक तडजोडीही होत्या. पण जीवननिष्ठेचा मूळ गाभा त्यातून गमावलेला नाही. 'फकिरा' आणि 'वारणेचा वाघ' हे या आठ चित्रपटांतील दोन अतिमहत्त्वाचे चित्रपट. 'फकिरा'ची निर्मिती अण्णा भाऊ जिवंत असतानाच खुद्द अण्णा भाऊ, शाहीर द. ना. गवाणकर व शाहीर अमर शेख यांनी करण्याचा प्रयत्न केला होता, पण पुढे अनेक आर्थिक अडचणींना तोंड देत ते मेटाकुटीला आले. यातूनच हा चित्रपट रेंगाळत-रखडत कधी स्मृतिशेष झाला, हेच कळलेच नाही.

'वारणेचा वाघ' हा चित्रपट याच नावाच्या कादंबरीवर १९७० मध्ये आला. या वेळी अण्णा भाऊ दिवंगत होऊन एक वर्ष लोटले होते. मृत्यूच्या एक वर्ष आधी म्हणजे १९६८ मध्ये त्यांनी ही कादंबरी लिहिली होती. खरे तर फकिरासोबतच अण्णांच्या मनामध्ये सत्तू हा नायक रेंगाळत होता. फकिरा जसा मांग समाजात जन्माला आला आणि एका शोषित जातीचा वारसा घेऊन क्रांतिकारक म्हणून विकसित झाला, तसाच सत्तूही मूलत: 'रामोशी' समाजातीलच एक वीर होता. पण अण्णा भाऊंनी त्याचे नायकत्व रेखाटताना त्याला 'मराठा' नायकाचे रूप दिले. याचे कारण कदाचित अण्णा भाऊ हे ज्या शाहूमहाराजांच्या परिसरात वाढले, यामुळे त्यांचा काही एक प्रभाव अण्णा भाऊंच्या मनावर झाला असावा आणि यातूनच सत्तू भोसले ही शूर मराठा व्यक्तिरेखा वारणेचा वाघ या कादंबरीत जन्माला आली असावी. कारण अण्णा भाऊंच्या काळात शाहूमहाराजांच्या विचाराने प्रेरित अशा अनेक मराठा क्रांतिकारक तरुणांची पलटणच नाना पाटलांपासून, नागनाथ नायकवडी आदींच्या रूपाने कोल्हापूर-सातारा परिसरात या काळात खडी तालीम देत होती. यामुळेच अण्णा भाऊंनी फकिराच्या मदतीला धावणाऱ्या या नायकाला मराठा जातीचा पोषाख चढवला असावा. पण महाराष्ट्रातल्या या मराठ्यांमध्ये कष्टकरी मराठा व राज्यकर्ता मराठा असे दोन भाग स्पष्टपणे दिसतात. अण्णा भाऊंच्या कादंबरीविश्वात हा कष्टकरी मराठा प्रामुख्याने नायकाच्या रूपात, तर राज्यकर्ता मराठा हा खलनायकाच्या स्वरूपात दिसतो. अर्थात अण्णा भाऊंच्या मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी अशा राजकीय दृष्टीला तर हे स्पष्टपणे जाणवत असावेच, शिवाय यातील बऱ्या-वाईटाचा विवेक करण्याइतके त्यांचे कलावंत मन नक्कीच विचक्षण असावे. फकिरानंतर जवळपास दहा वर्षांनी त्यांनी ही कादंबरी लिहिली असली, तरी एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. फकिराच्या निमित्ताने त्यांच्यासमोर पददलित वीर

योद्ध्यांची मांदियाळी उभी होती. त्या मांदियाळीतील प्रत्येक वीर हा त्यांना नायकरूपातच भावत असावा. त्यांना वेळ व संधी मिळाली असती, तर कदाचित फकिरा आणि सत्तूसारखे अनेक कादंबरीनायक त्यांनी मराठी कादंबरीविश्वात बलदंडपणे उभे केले असते.

फकिरा कादंबरीमध्ये वारणेचा वाघचा नायक सत्तू भोसलेचा संदर्भ नाही. पण 'वारणेचा वाघ'मध्ये मात्र फकिराचा महत्त्वपूर्ण उल्लेख आहे. सत्तू संकटात सापडतो, या वेळी फकिरा त्याला सोडवतो. पण फकिरा जेव्हा संकटात सापडतो, तेव्हा मात्र प्रयत्न करूनही परिस्थितीच्या अपरिहार्यतेने फकिराला सोडवण्यात सत्तू अपयशी होतो. अण्णा भाऊंनी या कादंबरीत असे प्रसंग रंगवले आहेत. 'फकिरा' ही एकूणच सत्यतेच्या कॅनव्हासवर रेखाटली गेलेली कादंबरी आहे. 'वारणेचा वाघ' या कादंबरीचा पाया हा सत्याधारित असला, तरी लेखकाच्या कल्पनास्वातंत्र्याचे पंख त्याला लाभूनही कादंबरी थोडी

जगदीश खेबुडकरांनी या कादंबरीचे सिनेमात रूपांतर करण्यासाठी पटकथालेखन केले आहे. अण्णा भाऊ हे डाव्या विचारांचे पाईक होते, तर जगदीश खेबुडकर हे उजव्या विचारसरणीत वाढले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आणि सावरकरांच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर नकळतपणे होताच. त्यामुळे मूळ कादंबरीतील आणि कादंबरीविश्वातील सगळेच लाल धगधगते वास्तव काहीसे सौम्य होत गेले आहे. अण्णा भाऊंच्या कादंबरीत सत्तूभोवती गोळा झालेली सर्व पात्रे पारंपरिक अर्थाने गुन्हेगारी विश्वातून आलेली होती, पण त्यांचे गुन्हेगार होणे हा त्यांना लाभलेल्या व्यवस्थेचा परिणाम होता. ही माणसे जगण्यासाठी धडपडत आहेत, सन्मानाने आयुष्य कंठू पाहत आहेत, पण पापभीरूही आहेत. परंपरेने अनैतिक मानलेल्या गोष्टींपासून ते दूर आहेत.

काल्पनिकतेकडे झुकते, हे खरे. पण त्यातूनही जातीयतेपलीकडे जाऊन शोषण व अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या मानसिकतेची अण्णा भाऊंची ओळखच अधिक साक्षेपाने आणि प्रकर्षाने होते.

एकोणीस छोटेखानी प्रकरणांत विभागलेली ही सत्तू नावाच्या वारणेच्या वाघाची गोष्ट. अण्णा भाऊंची रसाळ पण पाल्हाळीक नव्हे अशी शैली आणि शब्द व प्रतिमांची निवड ही कथाविषयाला साजेशी, तलवारीसारखी धारदार, फापटपसारा न होता, आशयाचे नेमकेपण– ही सारी लेखक म्हणून त्यांची वैशिष्ट्ये दिसतातच. पण या कादंबरीत भेटणारे प्रत्येक पात्र हे पुढील कादंबरीचा नायकच आहे, याचीही जाणीव नकळत होत राहते.

कादंबरीचा नायक सत्तू भोसले आहे. त्याच्या बापाने जन्मजात लाभलेल्या मोठेपणाच्या नशेत सत्तूला आणि त्याच्या आईला कष्टकरी वर्गात आणून बसवले आहे. पण अण्णा भाऊंवर शिवराय आणि जिजाऊंचा प्रभाव आहे. त्यामुळेच त्यांच्या कादंबऱ्यांतील सर्व स्त्रिया या जिजाऊंच्याच वारसदार आहेत आणि त्या आपल्या मुलाला परिस्थितीच्या विरोधातूनही शिवाजीसारखेच घडवण्याचा प्रयत्न करतात. याही कादंबरीत सत्तूची आई बणाबाई ही त्या शिवरायांच्या जिजाऊंचीच– प्रत्येक खेड्यातल्या कष्टकरी स्त्रियांमध्ये आढळणारी– प्रतिमा आहे. हीच गोष्ट सत्तूची मानलेली बहीण सईची. ती जातीय वर्णवस्थेत दलित आहे. पण सत्तूने आपल्याला जगण्यासाठी स्वत:च्या आयुष्याची कशी बरबादी करून घेतली, हे माहीत असल्यामुळे सतत त्याच्या ऋणात असलेली आहे. आपला मुलगा राजा– त्याला वकील करायचंय आणि परिस्थितीने दरोडेखोर झालेला, पण मूलत: पाक असलेल्या सत्तूला या कर्दमातून सोडवेल– या आशेने त्याच्या शिक्षणाची काळजी करते. प्रत्यक्षात तसे घडत नाही. मिशनरी शाळेत शिकणारा राजा ख्रिश्चन धर्म स्वीकारतो. फौजदार होतो आणि अखेर त्याच्या गोळीला सत्तू बळी पडतो आणि राजा कादंबरीचा खलनायक ठरतो. ढोबळमानाने जरी असे कथानक असले, तरी अण्णा भाऊंतील लेखक हा पाप–पुण्याचा निवाडा करणारा पारंपरिक न्यायाधीश नाही. अत्यंत साक्षेपाने ते परिस्थितीची गुंतागुंत मांडतात. निरगाठ सोडवीत नेतात. कुणाकडेही मूळ गुन्हेगार म्हणून थेटपणे बोट न करता परिस्थिती आणि व्यवस्था यांचे भयावह स्वरूप दाखवतात.

अण्णा भाऊ एका प्रकरणात सत्तूभोवती गोळा झालेल्या तथाकथित गुन्हेगारांची ओळख करून देतात. गोळा झालेली ही सर्व माणसे माणुसकीपूर्ण जगायची आकांक्षा असतानाही या व्यवस्थेमुळे पराभूत झालेली आणि केवळ नाईलाज झाल्याने परिस्थितीच्या रेट्याने गुन्हेगारीकडे वळलेली आहेत. असे असतानाही परकीय सत्ताधारी आणि देशी शोषकवर्ग अशा दुहेरी कोंडीत सापडलेल्या इथल्या शोषित दीन-दुबळ्या वर्गाला आपल्या परीने जमेल तेवढी मदत करून न्याय देण्याचा प्रयत्न करत आहेत.

लेखकाच्या संवेदनशीलतेने आणि राजकीय कार्यकर्त्याच्या आकलनातून एकूणच या शोषितवर्गाचे चित्र अण्णा भाऊ वाचकांसमोर मांडतात. परिस्थितीने आणि व्यवस्थेने नाडलेल्या या माणसांचे नेमके दु:ख व आंक्रदन वाचकांपर्यंत पोहोचवतात. या व्यवस्थेबद्दल घृणा निर्माण करायचे काम अण्णा भाऊंचे शब्द करतात. या कादंबरीचे महत्तम श्रेष्ठत्व म्हणजे माणूस म्हणून कुणी यात सुष्ट किंवा दुष्ट नाही. व्यवस्थेत वाढलेली आणि व्यवस्थेनेच घडवलेली ही माणसे आहेत. त्यामुळे परिस्थितीने ती खलनायक किंवा नायक बनतात. अण्णा भाऊंच्या आकलनाने जातिव्यवस्था मांडतात. त्याच क्षमतेने ते वर्गव्यवस्थाही समजावून देतात व घेतात. प्रत्येक मनुष्य ही व्यवस्थेने घडवलेली गोष्ट आहे, याचे अण्णा भाऊंचे भान व निरीक्षण केवळ अफलातून आहे. त्याच वेळी स्त्री आणि पुरुष यांच्यामधील मूलभूत फरक ते तत्त्वज्ञानाच्या भूमिकेतून जाणून आहेत. त्यामुळेच स्त्रीची सहनशीलता आणि सृजनात्मकता याचे त्यांना कमालीचे अप्रूप व भान आहे. याचाच परिणाम म्हणून अण्णा भाऊंच्या साहित्यात स्त्री ही कधी फारशी खलनायिकेच्या स्वरूपात सापडतच नाही. किंबहुना, प्रसंगोपात्त तिच्यावर लादल्या गेलेल्या अध:पतनातही तिच्यातील माणूसपणाची उत्तुंगताच ते दाखवत राहतात. या कादंबरीतील ब्रिटिश मेरी, दलित सई किंवा सवर्ण सोना आणि सत्तूची आईदेखील या दृष्टीने निटसपणे न्याहाळाव्या लागतील. परिस्थितीच्या वरवंट्याखाली सापडूनही या स्त्रिया आपले सत्त्व सोडत नाहीत, माणूसपण हरवत नाहीत. खरं तर अण्णा भाऊंच्या सर्वच कादंबऱ्यांतील आणि कथांमध्ये येणाऱ्या स्त्रीव्यक्तिरेखा या माणूसपणाची कमाल उंची दाखवणाऱ्याच आहेत.

अण्णा भाऊंच्या सर्वच व्यक्तिरेखा- मग ती स्त्री असो वा पुरुष- एकेका कादंबरीचा विषय आहेत. त्यामुळे जाणवत राहते की, या सक्षम लेखकाने अनेक कथा किंवा कादंबऱ्या एकत्र कोंबण्याचा प्रयत्न केला आहे. ते ज्या परिसरात, ज्या जातव्यवस्थेत आणि ज्या वर्गव्यवस्थेत वाढले, त्यांचे सर्व संस्कार घेऊन, तरीही या साऱ्यापलीकडे उभे असलेले माणसाचे माणूसपण अधोरेखित करण्याचा ते आटोकाट प्रयत्न करतात. रशियामध्ये कामगारवर्गात उदयास आलेल्या मॅक्झिम गॉर्की नावाच्या एका महान लेखकाने हेच केले. कष्टकरी वर्गातील स्त्री ही केवळ कष्टकरी नाही, तर संपूर्ण मानवसंस्कृतीची आई आहे- हे जसे गॉर्कीने आपल्या 'आई' या कादंबरीत ठळकपणे केले; तेच काम कमी-जास्त प्रमाणात मराठीमध्ये अण्णा भाऊंनी आपल्या स्त्रीव्यक्तिरेखांमधून करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच त्यांच्या कथा-कादंबऱ्यांच्या मुख्य व्यक्तिरेखा बहुतांश वेळा स्त्रिया असल्या, तरी प्रसंगोपात्त त्यांनी लिहिलेल्या पुरुष नायकांनाही घडवणाऱ्या या स्त्रियाच असतात आणि त्या नायकांपेक्षाही उंच असतात. 'वारणेचा वाघ' या कादंबरीचा नायक रूढार्थाने सत्तू असला, तरी वास्तवात त्याच्याभोवती जमा झालेला आणि जात-वर्गामुळे शोषित ठरलेला समूहही आहे, या समूहाला जगण्याची प्रचंड ताकद देणाऱ्या प्रामुख्याने स्त्रिया आहेत, हे महत्त्वाचे.

चित्रपटासाठी कथेमध्ये चित्रमयता आणि नाट्यात्मकता असावी लागते. अण्णा भाऊंच्या लेखनशैलीतच ती खच्चून भरलेली असल्यामुळे त्यांच्या साहित्यावर यशस्वी चित्रपट निघू शकतो. वारणेचा वाघ हा चित्रपट (मराठी चित्रपटसृष्टीचा पाया घालणाऱ्या मेस्त्री बंधूंचे चिरंजीव) वसंत पेंटर यांनी दिग्दर्शित केला. चित्रपट गीतलेखक म्हणून विशेष नाव असलेले जगदीश खेबुडकर यांनी पटकथा, संवाद व गीतलेखन केले. त्या वेळचा मराठीतील सुपरस्टार सूर्यकांत, पद्मा चव्हाण आणि नवोदित तारका सुशीला यांच्या अभिनयाने हा चित्रपट सजला होता. चित्रपटाची निर्मिती शामराव माने यांची आहे. हा चित्रपट व्यावसायिक दृष्ट्या यशस्वी आणि लोकप्रिय ठरला असला, तरी कादंबरीची महत्ता तो गाठू शकला नाही. याचे कारण तंत्रज्ञान हे शब्दांचे सामर्थ्य गाठू शकत नाही. एवढेच नाही; निर्मिती करणारा कलावंत नेमक्या कोणत्या भूमिकेतून जगतो व निर्मिती करतो आहे, यावरही बरेचसे अवलंबून असते.



अण्णा भाऊ तसे शक्तिशाली क्षमतेचे अष्टपैलू लेखक होते, तसेच ते समाज बदलू पाहणारे डाव्या विचारांचे आणि भारतीय समाजाचे वस्तुनिष्ठ आकलन असलेले राजकीय कार्यकर्ते होते, हे लक्षात ठेवले पाहिजे. लेखक म्हणून आपल्या अवती-भवतीचा माणूस आणि समाज केवळ काळ्या व पांढऱ्या रंगात रंगवणे, इतके त्यांचे आकलन सामान्य नाही. पण त्यांच्या विश्लेषणाला एका शास्त्रीय, राजकीय विचारधारेचाही आधार आहे आणि ही विचारधारा चुकीचा समाज बदलून आदर्श समाज निर्माण करू पाहणाऱ्या आकांक्षेने प्रेरित आहे. त्या दृष्टीनेच कादंबरीतील प्रत्येक शब्द, प्रत्येक घटना आणि प्रत्येक व्यक्ती ते रेखाटतात. हा चित्रपट तयार होताना अण्णा भाऊ हयात नव्हते. त्यामुळे त्यांच्या कादंबरीचे पटकथेत रूपांतर दुसऱ्या लेखकाकडून केले गेले आहे आणि इथेच मूळ कादंबरीतील बंदुकीसारखे धडाधडणारे क्रांतिकारकत्व बोथट होत गेले आहे.

जगदीश खेबुडकरांनी या कादंबरीचे सिनेमात रूपांतर करण्यासाठी पटकथालेखन केले आहे. अण्णा भाऊ हे डाव्या विचारांचे पाईक होते, तर जगदीश खेबुडकर हे उजव्या विचारसरणीत वाढले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आणि सावरकरांच्या विचारांचा पगडा त्यांच्यावर नकळतपणे होताच. त्यामुळे मूळ कादंबरीतील आणि कादंबरीविश्वातील सगळेच लाल धगधगते वास्तव काहीसे सौम्य होत गेले आहे. अण्णा भाऊंच्या कादंबरीत सत्तूभोवती गोळा झालेली सर्व पात्रे पारंपरिक अर्थाने गुन्हेगारी विश्वातून आलेली होती, पण त्यांचे गुन्हेगार होणे हा त्यांना लाभलेल्या व्यवस्थेचा परिणाम होता. ही माणसे जगण्यासाठी धडपडत आहेत, सन्मानाने आयुष्य कंठू पाहत आहेत, पण पापभीरूही आहेत. परंपरेने अनैतिक मानलेल्या गोष्टींपासून ते दूर आहेत. दिसत असलेल्या अन्यायाविरुद्ध व विषमतेविरुद्ध ते पेटून उठतात, त्यातूनच त्यांच्या वाट्याला हे दुर्दैवी आयुष्य आलेले आहे. चित्रपटात मात्र हे येत नाही. सूत्रनायक आहे म्हणून त्याला आदर्शवादी दाखवले आहे आणि तो ज्या टोळीच्या संपर्कात येतो, ती टोळी मूलत:च गुन्हेगारवृत्तीची दाखवली आहे. सत्तूच्या येण्यामुळे त्यांचे उत्थान होते, असे चुकीचे चित्र रंगवले गेले आहे. ज्या परिस्थितीविरुद्ध ही माणसे लढत आहेत, ती परिस्थिती स्पष्ट करणे पटकथालेखकाच्या दृष्टीने सोईचे नाही; कारण खुद्द तोच ही परिस्थिती लादणाऱ्या वर्गातून आला आहे. त्यामुळे प्रत्यक्ष पडद्यावर माणूसपण नाकारल्या गेलेल्या, तरीही माणूस म्हणून जगतानाही धडपडणाऱ्या या वर्गाचे विकृत चित्रण झाले आहे. कादंबरीमध्ये सत्तू आणि फकिरा यांच्या नात्याचे मनोज्ञ दर्शन होते, पण चित्रपटातून फकिरालाच टाळण्यात आलेले आहे. कादंबरीमध्ये सोनाच्या मनात सत्तूबद्दल उमलत जाणारे प्रेम हळुवारपणे दर्शवले आहे, तर चित्रपटात ते वीरांगनेच्या रूपात आणि आक्रमकपणे येते. सगळ्यात कहर म्हणजे, नाट्यात्मकता म्हणून सत्तूला- किंचित काळ अंधपणा येऊन जणू नागिणीच्या आगमनाबरोबर तो दूर होतो, अशी प्रचंड विनोदी नाट्यात्मकता दाखवली आहे. तीच गोष्ट दिग्दर्शकाची. दिग्दर्शक वसंत पेंटर हे खरे तर केवळ तंत्रज्ञ होते. कॅमेऱ्यातून सिनेमा कसा दिसेल, एवढ्यापुरतेच त्यांचे दिग्दर्शकीय कौशल्य मर्यादित आहे. दिग्दर्शनामागे बाकी इतर कुठलीही- विशेषत: सामाजिक व राजकीय- भूमिका त्यामुळे जाणवत नाही.

तसाच सत्तूही मूलत: रामोशी समाजातीलच एक वीर, त्याचा वावर कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा परिसरात

होता, त्याच्या मर्दुमकीच्या आणि माणुसकीच्या अनेक कथा या परिसरात प्रसिद्ध आहेत. अण्णा भाऊ साठेंच्या 'वारणेचा वाघ'मधला सत्तू भोसले हा मूळचा या परिसरातील असावा आणि त्यावरूनच अण्णा भाऊंनी आपला सत्तू हा नायक घेतला असावा असा अंदाज अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ.बाबूराव गुरव यांचा आहे.

या कादंबरीत एका तरुण तफडदार, अन्यायाच्या विरोधात लढणाऱ्या नायकाचे चित्र वाचकांपुढे उभे राहते. सत्तू भोसले हा या कादंबरीचा नायक. तो पिळवणूक करणाऱ्या सावकार, जमीनदार व ब्रिटिशांविरुद्ध बंड करतो. 'ब्रिटिशांच्या नजरेतून सत्तू हा नायक गुन्हेगार ठरला असला तरी वारणा खोऱ्यातील अनेक स्त्रिया त्याच्या बहिणी होऊन त्याला आयुष्य मिळावं अशी प्रार्थना करतात. या कादंबरीत पराक्रम, शौर्य, बंडखोर प्रवृत्ती आणि प्रेमभावनाही रेखाटली गेली. सत्तूसारखं व्यक्तिमत्त्व रेखाटून लोकनायकाचे गुण त्यात दर्शविले आहेत आणि वारणा खोऱ्यातील तरुणांपुढे आदर्शवादी व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. जसं सत्तूच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन तसंच वारणा खोऱ्याचा परिसर आणि परिसरातील संस्कृतीचे चित्र या कादंबरीत रेखाटले आहे.

सत्तूचा नायक म्हणून अधोरेखित करता बाकीची पात्रे खलनायक कशी दिसतील, असाच विचार चित्रपटाची पटकथा बनवताना झालेला दिसतो. खुद्द कादंबरीत परिस्थितीने एकत्र केलेली सत्तूची टोळी प्रत्यक्ष सिनेमात मात्र आधीच तयार खलप्रवृत्तीची टोळी म्हणून दाखविली जाते आणि एखाद्या स्त्रीला पळवून आणण्याइतपत ही टोळी खलनायकी टोक गाठते. सत्तू केवळ मूळच्याच श्रेष्ठत्वामुळे या टोळीला अशा दुर्गुणातून मुक्त करण्याला कारणीभूत ठरतो. अण्णा भाऊंच्या लेखात असा एकांगीपणा येत नाही. कादंबरीत ब्रिटिश सत्तेचे जुलमीपण स्पष्ट होते, तर सिनेमात ब्रिटिशांमार्फत मिशनऱ्यांमुळे ख्रिस्ती झालेल्या देशी लोकांचे खलनायकत्व ठळक केले जाते. कादंबरीचा व्यापकपट जो शोषक विरुद्ध शोषित असा आहे, तो चित्रपटात परकीय सत्तेचे रूपक वापरून शोषितांच्या अवनतीचा धार्मिक पाया त्याला जोडला जातो.

तरीही हा चित्रपट सर्वसामान्यांना आवडला, कारण लोकांच्या मनात असलेली अन्यायाविरुद्धची चीड, सत्तूच्या रूपाने नीट पकडली जाते. सत्तूचे नायकत्व श्रमिक वर्गाच्या श्रेष्ठत्वापेक्षा जातीव्यवस्थेच्या मुलाम्याखाली अहंकारित केले जाते. कथेच्या अनुषंगाने खलनायक ठरलेल्या राजा ऊर्फ डॅनियल यांचे ख्रिश्चन होणे अमानुष म्हणून ठसवले जाते. कादंबरीमध्ये अण्णा भाऊ त्याची मानसिकता, त्याची तगमग अतिशय विवेकशीलतेने मांडतात. पण चित्रपटात मात्र ते केवळ धर्मविद्वेषाचे एक प्रतीक ठरते.

एकंदरीत 'वारणेचा वाघ' या कादंबरीतील क्रांतिकारकत्व चित्रपटामध्ये केवळ धंदेवाईक होते. सत्तूचा समाजव्यवस्थेविरुद्धचा लढा हा चित्रपटात केवळ ब्रिटिश सत्तेविरुद्धचा लढा होता आणि वरच्या जातीतला माणूस पददलितांच्या उद्धारासाठीच असतो. असा एक पडदाशीन संदेश पेरला जाता. अण्णा भाऊंनी रंगविलेल्या मूळ नायकाचा रागरंगाचा गडदपणा चित्रपटात कमी झाला असला तरी नष्ट होत नाही. या अर्थाने अण्णा भाऊंचा 'वारणेचा वाघ' सर्कशीत आणता आला, पण पूर्णत: माणसाळता आला नाही, असेच म्हणावे लागेल. अण्णा भाऊ साठे हे व्यवस्था बदलू पाहणारे ताकदीचे लेखक होते हेच यातून स्पष्ट होते.

राजा शिरगुप्पे, आजरा, कोल्हापूर
rajashirguppe712@gmail.com
Mob. 9423287320

(लेखक व कार्यकर्ता अशा दुहेरी भूमिकेत वावरणाऱ्या राजा शिरगुप्पे यांनी केलेल्या महाराष्ट्र, बिहार, ईशान्य भारत या तीन प्रदेशांतील दुर्गम भागांच्या शोधयात्रांवरील तीन पुस्तके विशेष महत्त्वाची आहेत. सांगली येथे झालेल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.)

अण्णा भाऊ साठे
स्मृति अंक

अण्णा भाऊंचा पुतळा रशियात उभारला जातोय त्याची गोष्ट

संजय देशपांडे

अण्णा भाऊंचं जन्मशताब्दी वर्षं साजरं करायचं, असं महाराष्ट्र सरकारने मागील वर्षी घोषित केलं होतं. आमच्या मुंबई विद्यापीठानेही त्यानिमित्ताने अण्णा भाऊंना आदरांजली वाहावी, असा निर्णय घेतला. माझे वडील कम्युनिस्ट असल्यामुळे अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या आणि इतर साहित्याकडे कळत्या वयापासून मीही आकर्षित झालो होतो. पुढे माझ्या सासूबाईंनी अण्णा भाऊंचं जीवन आणि साहित्यावर नागपूर विद्यापीठातून पीएच.डी. केलेली होती. त्यामुळे वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर अण्णा भाऊंशी संबंध येतच होता. अण्णा भाऊंनी १९६१ मध्ये रशियाला भेट दिली होती आणि तिथे ते ४० दिवस राहिले होते. रशियातल्या त्यांच्या वास्तव्यावर आधारित 'माझा रशियाचा प्रवास' हे त्यांचं पुस्तक मी लहान वयातच वाचलेलं होतं. युरेशियन अभ्यास केंद्राचा संचालक आणि मुंबई विद्यापीठाच्या रशियन भाषा विभागाचा प्रमुख म्हणून मी गेली काही वर्षं काम पाहतो आहे. त्यामुळे मराठीतल्या साहित्यसृष्टीशी थेट संबंध कमी असला तरी सोव्हिएत जीवनाचं, रशियन समाजाचं टिपलं गेलेलं चित्रण म्हणूनही अण्णा भाऊंच्या या पुस्तकाचं महत्त्व मला वाटत होतं.

मातंग समाजाचे काही कार्यकर्ते २०१७ मध्ये मला भेटले. त्यांनी अण्णा भाऊंवर एखादा सेमिनार घेण्याविषयी सुचवलं होतं. मातंग ग्रुप डेव्हलपमेंट (एमजीडी) या त्यांच्या

त्या वेळी माझ्या मनात आणखीही एक कल्पना आली. रशियामध्ये 'मार्गारिटा रुडोमिनो ऑल रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचर' नावाचं एक खूप मोठं ग्रंथालय आहे. मी विद्यार्थी असताना अभ्यास करण्यासाठी अधून-मधून तिथे जात असे. मे महिन्यातल्या त्या रशिया भेटीदरम्यान माझ्या कुटुंबासोबत त्या ग्रंथालयाला भेट देण्यासाठी गेलो होतो. त्या ग्रंथालयाच्या समोर एक चौक आहे, तिथे अनेकांचे पुतळे आहेत. महात्मा गांधींचाही पुतळा त्यात आहे. तिथे मी अशी विचारणा केली की, 'अण्णा भाऊंचाही पुतळा या ठिकाणी आपल्याला बसवता येईल का?' त्या वेळी पहिल्यांदा त्यांच्याकडून नकारच आला. मॉस्कोहून परत आल्यानंतर मी याबाबत ई-मेलद्वारे बराच पाठपुरावा केला.

संघटनेमध्ये बरेच प्राध्यापक, इंटेलेक्च्युअल्स, उच्च पदस्थ सरकारी अधिकारी, समाजसेवक आहेत– होते. त्या सर्वांनी सेमिनारचा हा प्रस्ताव आमच्यापुढे ठेवला होता. त्या दृष्टीने मी चाचपणी सुरू केली आणि २०१७ च्या ऑक्टोबर महिन्यात मुंबईतील रशियन दूतावासामध्ये अण्णा भाऊंच्या कार्यावर एक मोठा सेमिनार आयोजित केला. त्या एकदिवसीय सेमिनारसाठी अडीचशे लोक उपस्थित होते.

माझ्या पेशामुळे दर वर्षी काही कामानिमित्ताने माझं रशियाला जाणं होत असतं. मागच्याच वर्षीच्या मे महिन्यात मला माझ्या कुटुंबासोबत मॉस्कोला जाण्याचा योग आला. दहा दिवस तिथे राहिलो. त्या वास्तव्यादरम्यान अण्णा भाऊ ज्या हॉटेलमध्ये राहिले होते, तिथे मी गेलो. त्या हॉटेलचं नाव 'हॉटेल सोव्हिएतस्काय'. जगभरातील नामवंतांनी तिथे भेट दिलेली असल्यामुळे ते एक ऐतिहासिक हॉटेल आहे. अण्णा भाऊंची काही सही वगैरे तिथे आहे का, तिथे ते कोणत्या खोलीत राहिले होते– या सगळ्याविषयी मला उत्सुकता होती. मात्र जवळपास ६० वर्षांपूर्वीची ही माहिती त्यांच्या अर्काइव्हमध्ये उपलब्ध झाली नाही. या हॉटेलमध्ये पूर्वीही आलेलो होतो. कधी काळी तिथे राहून गेलेल्या जगप्रसिद्ध व्यक्तींची तैलचित्रे त्या हॉटेलच्या लॉबीमध्ये लावण्यात आलेली आहेत. इंदिरा गांधी, मार्गारेट थॅचर, फिडेल कॅस्ट्रो यांच्यासह जगभरातील अनेक राजकारणी, नेते, कलावंतांची चित्रे तिथे आहेत. ती पूर्वी पाहिलेली होती; त्या क्षणी माझ्या मनात आलं की, अण्णा भाऊंचंही चित्र इथे असायला हवं. मी लगेचच हॉटेल व्यवस्थापनाशी या बाबतीत चर्चा केली. त्यांनी सांगितलं– 'तुम्ही तसा लेखी प्रस्ताव द्या आणि अण्णा भाऊंविषयीची माहितीही आम्हाला द्या.' भारतात परतल्यानंतर लगेचच मी त्यांना तसा प्रस्ताव पाठवला आणि अण्णा भाऊंच्या तिथल्या वास्तव्याविषयीची माहितीही पाठवली. त्यांनी लगेचच तो प्रस्ताव मान्य केला आणि अण्णा भाऊंचं चित्र तिथे लावण्याची तयारी दाखवली.

मे महिन्याच्या त्या वास्तव्यामध्ये मी आणखीही एक गोष्ट केली. पुश्किन स्टेट रशियन लँग्वेज इन्स्टिट्यूटशी मुंबई विद्यापीठातर्फे आम्ही करार केला होता. अण्णा भाऊंच्या नावावर एका आंतरराष्ट्रीय परिसंवादाचं आयोजन आम्ही करणार होतो. त्यासंदर्भात त्या इन्स्टिट्यूटतर्फे असं सुचवण्यात आलं की, अफानासी निकितिनचाही समावेश या परिसंवादात करावा. अफानासी निकितिन हा पहिला युरोपीय खलाशी जो 'वास्को द गामा'च्याही आधी भारतात आलेला होता. तो रशियन होता. तो भारतात १४६९ मध्ये आला आणि तीन वर्षं इथे राहिला. भारतातल्या अनुभवांवर आधारलेलं पुस्तक त्याने लिहिलेलं आहे. अफानासी निकितिन आणि अण्णा भाऊ अशा दोघांवर आम्ही तो परिसंवाद आयोजित केला. दि.१६ व १७ सप्टेंबर २०१९ रोजी पुश्किन स्टेट रशियन लँग्वेज इन्स्टिट्यूट, मॉस्को इथे हा सेमिनार झाला. त्यासाठी भारतातून जवळपास साडेतीनशे लोक गेलेले होते. त्यामध्ये महाराष्ट्रासह १६ राज्यांचे प्रतिनिधी हजर होते. त्याआधी या सेमिनारसाठी ४१ निबंध आम्ही तज्ज्ञांकडून लिहून घेतले होते आणि ते पुश्किन विद्यापीठाकडे पाठवले होते. पुश्किन विद्यापीठाने ते तिथे छापून प्रकाशित केले. त्यांचं प्रकाशन भारताचे रशियातील राजदूत डी.बी.व्यंकटेश वर्मा यांच्या हस्ते झालं. यादरम्यान १५ सप्टेंबरला हॉटेल सोव्हिएतस्कायच्या व्यवस्थापनाकडे अण्णा भाऊंचं तैलचित्र आम्ही सुपूर्त केलं. मुंबई विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ.रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते ते तैलचित्र आम्ही तिथे दिलं. नांदेडहून खास बनवून घेतलेल्या त्या तैलचित्राचा नांदेड ते मुंबई, मुंबई ते मॉस्को असा प्रवास घडला होता. आता ते तैलचित्र हॉटेल सोव्हिएतस्कायमध्ये विराजमान आहे.

त्या वेळी माझ्या मनात आणखीही एक कल्पना आली. रशियामध्ये 'मार्गारिटा रुडोमिनो ऑल रशिया स्टेट लायब्ररी फॉर फॉरेन लिटरेचर' नावाचं एक खूप मोठं ग्रंथालय आहे. मी विद्यार्थी असताना अभ्यास करण्यासाठी अधून-मधून तिथे जात असे. मे महिन्यातल्या त्या रशिया भेटीदरम्यान माझ्या कुटुंबासोबत त्या ग्रंथालयाला भेट देण्यासाठी गेलो होतो. त्या ग्रंथालयाच्या समोर एक चौक आहे, तिथे अनेकांचे पुतळे आहेत. महात्मा गांधींचाही पुतळा त्यात आहे. तिथे मी अशी विचारणा केली की, 'अण्णा भाऊंचाही पुतळा या ठिकाणी आपल्याला बसवता येईल का?' त्या वेळी पहिल्यांदा त्यांच्याकडून नकारच आला. मॉस्कोहून परत आल्यानंतर मी याबाबत ई-मेलद्वारे बराच पाठपुरावा केला. सप्टेंबरमध्ये काही मातंग बांधवांसोबत त्यांच्याशी प्रत्यक्ष चर्चाही झाली. अण्णा भाऊंचं लेखक म्हणून असलेलं स्थान आणि रशियन भाषेतही अनुवादित झालेलं त्यांचं साहित्य याविषयी मी त्यांना सांगितलं. अखेर मागील वर्षी जून महिन्यात ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाने पुतळ्याला परवानगी दिली. पुतळा ग्रंथालयाच्या आत ठेवायचा की



बाहेर, याविषयी भरपूर मतमतांतरे झाली. आमची मागणी होती की, तो पुतळा ग्रंथालयाबाहेर चौकात असावा. चर्चेअंती त्यांनी ते मान्य केलं. मातंग ग्रुप डेव्हलपमेंटमधील आमच्या मित्रांना मी याविषयी सांगितलं. त्यांनी आपणहून पैसे गोळा करून, काही लाखांमध्ये ज्याची किंमत आहे असा एक पुतळा तयार करून घेतला आणि तो आम्ही मॉस्कोला पाठवला. त्यामुळे मागच्या वर्षीच तो पुतळा रशियाला जाऊन पोहोचला आहे. या वर्षी जन्मशताब्दीचं औचित्य साधून ऑगस्टमध्ये त्याचं अधिकृत रीत्या अनावरण आम्ही करणार होतो. मात्र दरम्यान उद्भवलेल्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आम्ही तो कार्यक्रम पुढे ढकललेला आहे. सगळं व्यवस्थित होताच आम्ही पुन्हा तिथे जाणार आहोत आणि अधिकृत रीत्या तो पुतळा त्यांना सुपूर्त करणार आहोत. त्या ग्रंथालयाचे उपमहासंचालक या कार्यक्रमाला उपस्थित असणार आहेत. मागच्या वर्षी सप्टेंबरच्या परिसंवादाच्या कार्यक्रमासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना आमंत्रित करण्याची आमची कल्पना होती. मात्र १६-१७ तारखेला कार्यक्रम आणि १५-१६ तारखेलाच आचारसंहिता लागू झाली. त्यामुळे ते प्रत्यक्षात येऊ शकले नाहीत. मात्र पुतळ्याच्या लोकार्पणाच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्र्यांनी यावं, अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे. निदान एका दिवसासाठी तरी त्यांनी मॉस्कोला यावं, अशी विनंती आम्ही मुख्यमंत्र्यांना केलेली आहे. ग्रंथालयाच्या उपमहासंचालकांनीदेखील, 'महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू यांना आम्ही रीतसर आमंत्रण देऊ' असं सांगितलं आहे. या सगळ्या कामात मुंबई विद्यापीठाची मला मोठी मदत झाली आहे. 'या बाबतीत तुम्हाला योग्य वाटतील ते निर्णय तुम्ही घ्या' अशी मोकळीक विद्यापीठ प्रशासनाने मला दिली. मे महिन्यात, सप्टेंबरमध्ये रशियाला जाण्यासाठीच्या रजा उपलब्ध केल्या. लॉकडाऊनच्या काळात प्रत्यक्ष लोकार्पणाचा कार्यक्रम पुढे ढकलला गेला असला, तरी आम्ही दि.१ मेपासून फेसबुक लाईव्ह व्याख्यानमाला आयोजित केली आहे. दि.१ ऑगस्टला त्या व्याख्यानमालेच्या समारोपाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे येणार आहेत. त्याशिवाय ग्रंथालयाचे उपमहासंचालक पॅवेल कुझमिन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर, मुंबई दूतावासातील रशियाचे महावाणिज्यदूत अलेक्सेई सुरोवत्सेव, रशियन स्टेट युनिव्हर्सिटीतील प्राध्यापिका इंदिरा गाझीएव्हा आदी मान्यवर त्या व्याख्यानमालेत सहभागी होणार आहेत.

साहित्यातून आणि प्रत्यक्ष भेटीतून अण्णा भाऊंचा रशियाशी जुळलेला संबंध हा त्यांच्या कार्याचा पैलू आजवर काहीसा दुर्लक्षितच राहिलेला आहे. त्याची आठवण करून देणारं यथोचित स्मारक असावं, असं मला वाटलं. अण्णा भाऊंचं रशियावरील प्रेम आणि रशियन लोकांचं अण्णा भाऊंवरचं प्रेम पाहता, त्यांच्यासारख्या मोठ्या साहित्यिकाला त्याचा सन्मान मिळवून द्यावा, हे मला माझं कर्तव्य वाटलं. योगायोगानेच हे सगळं त्यांच्या जन्मशताब्दीला जुळून आलं. एक सत्कार्य प्रत्यक्षात उतरवण्यासाठी समन्वयकाची भूमिका मला करता आली याचा मला अभिमान वाटतो आणि खूप समाधानही...

(शब्दांकन : सुहास पाटील)

संजय देशपांडे, पुणे
deshsanjay2001@gmail.com
Mob. 9869316511

(मुंबई विद्यापीठात रशियन भाषा विभागाचे प्रमुख असलेले संजय देशपांडे हे युरेशिन स्टडीज या विषयातील विशेषज्ञ आहेत.)

१५ ऑगस्ट २०२० रोजी

साधना साप्ताहिक ७३ व्या वर्षात

पदार्पण करीत आहे.

त्यानिमित्ताने येणारा विशेषांक

तीन संपादकांच्या मुलाखती

एन. राम बोलत आहेत १४८ वर्षांची परंपरा असलेल्या The Hindu च्या वाटचालीबाबत..



शेखर गुप्ता बोलणार आहेत, The Indian Express मधील त्यांच्या स्वतःच्या कारकिर्दीबद्दल

नरेश फर्नांडिस बोलणार आहेत The Scroll या डिजिटल पोर्टलबाबत

तिन्ही संपादक इंग्रजी पत्रकारितेत आहेत, तीन वेगवेगळ्या पिढ्यांतील आहेत.
तीन वेगवेगळ्या माध्यमात त्यांनी काम केले आहे आणि तिघांच्याही दृष्टिकोनात फरक आहेत.
मात्र तिघांनीही गांभीर्याने पत्रकारिता केलेली आहे,
उल्लेखनीय व अनुकरणीय काम केलेले आहे.
आपल्या माध्यमाच्या ताकदीचे व मर्यादांचे भान तिघांनाही चांगले आहे..!

संपर्क

साधना साप्ताहिक

४३१, शनिवार पेठ, पुणे 411030 । Ph 02024451724 । weeklysadhana@gmail.com

kartavyasadhana.in

९ ऑगस्ट २०१९ रोजी सुरू झालेले

कर्तव्य साधना

एक वर्षांचे झाले

१

या डिजिटल पोर्टलवर मागील वर्षभर रोज एक लेख किंवा ऑडियो/व्हिडिओ प्रसिद्ध होत आला आहे. आठवड्यातून एकदा इंग्रजी लेख असे प्रमाणही राहिले आहे.

२

राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक विषयांवरील ताज्या घडामोडींच्या निमित्ताने लिहिले गेलेले विश्लेषणात्मक लेखन इथे प्राधान्याने प्रसिद्ध केले जाते.

३

साधना साप्ताहिकातील लेख कर्तव्यवर नसतात आणि कर्तव्यवरील लेख साधनात नसतात. म्हणजे स्वतंत्र अस्तित्व असलेली ही भावंडं आहेत.

४

कर्तव्यची लिंक रोज व्हॉट्सॲप वा इ-मेल द्वारे मिळावी असे वाटत असेल तर तुमचे नाव, गाव व फोन नंबर किंवा email id आम्हाला पाठवा आणि तसे कळवा.

५

सध्या हे डिजिटल पोर्टल वाचण्यासाठी/पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध आहे.
मात्र हे अधिकाधिक विकसित करण्यासाठी लहान वा मोठ्या देणग्यांचे स्वागत आहे.

संपर्क

कर्तव्य साधना Mob. 7058286750

४३१, शनिवार पेठ, पुणे 411030 । Ph. 02024451725 । kartavyasadhana@gmail.com

Registered Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting : 1-8-2020 / Date of Publication : 1-8-2020

सर्वत्र उपलब्ध



एका विचारप्रवर्तक पुस्तकाची

नवी आवृत्ती

झुंडीचे मानसशास्त्र

विश्वास पाटील
'नवी क्षितिजे'कार

पृष्ठे ३२६ (हार्ड बाऊंड)
किंमत ३५० रुपये । सवलतीत २५० रुपये
(ट.ख. ५० रुपये वेगळा)

१९७८ मध्ये या पुस्तकाची पहिली आवृत्ती
जनपद प्रकाशन, मुंबई यांच्याकडून आली.
दुसरी विस्तारित आवृत्ती २००० मध्ये
प्रभात प्रकाशन, मुंबई यांच्याकडून आली.
आणि आता तिसरी आवृत्ती
साधना प्रकशनाकडून आली आहे.

झुंडीचे मानसशास्त्र अवगत असणे,
ही गोष्ट अनेक लोकांच्या दृष्टीने फायद्याची असते.
जगातील मोठमोठे कर्तबगार पुरुष, धर्मप्रवर्तक,
साम्राज्यांचे संस्थापक, भिन्न-भिन्न विचारसरणींचे
निष्ठावंत अनुयायी, प्रसिद्ध राजकारणपटू
हे सर्वजण प्रच्छन्न मानसविशारद होते.
झुंडींची मानसिक जडण-घडण कशी असते,
हे या सर्वांना जणू जन्मत: कळते.
या उपजत आणि अचूक ज्ञानाच्या जोरावरच
ही मंडळी स्वत:चे श्रेष्ठत्व प्रस्थापित करू शकतात.
झुंडीचे मानसशास्त्र अवगत असणे, ही गोष्ट
राजकारणामध्ये पुढारीपण करू इच्छिणाऱ्यांना
निकडीची होऊन बसली आहे. हे ज्ञान असेल,
तरच झुंडींवर ताबा चालवता येणे शक्य असते.
अर्थात, ही गोष्ट वाटते तितकी सोपी नसते.
तथापि, हे ज्ञान असेल तर निदान ती व्यक्ती
झुंडीच्या आहारी तरी जात नाही.

संपर्क
साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph. 020 24459635
mediasadhan@gmail.com

also available at amazon.in